सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित




# प्रत्येक वर्षी वीजदर कमी होणार, मुख्यमंत्र्यांकडून गुडन्यूज

## 'वारी'च्या प्रकल्पाचे भूमिपूजन

**नागपूर, दि. १४ मार्च-**

पूर्वी वीजेचे दर प्रत्येक वर्षी ९ टक्क्यांनी वाढायचे. मात्र, २०२५ ते २०३० या पाच वर्षांमध्ये प्रत्येक वर्षी वीजेचे दर १.२ टक्क्यांनी कमी होणार आहेत. घरगुती वीजेसाठी आज जो दर आहे तो २०३० मध्ये २६ टक्क्यांनी तर औद्योगिक उपयोगासाठी लागणाऱ्या वीजेचा दर ९ टक्क्यांनी कमी झालेला असेल,' अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी दिली. वारी एनर्जीजच्या अतिरिक्त बुटीबोरी औद्योगिक क्षेत्रातील सोलर इनगॉट आणि वेफर उत्पादन प्रकल्पाचा भूमिपूजन सोहळा आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी मुख्यंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी व्यासपीठावर वारी एनर्जीजचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. हितेश दोशी, राज्यमंत्री ॲड. आशिष जैस्वाल, राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, खासदार श्यामकुमार बर्वे, वारी एनर्जीजचे संचालक किरीट दोशी, संचालक पंकज दोशी, माजी खासदार अजय संचेती, वीरेन दोशी यांची उपस्थिती होती.

अपारंपरिक ऊर्जेच्या क्षेत्रातील प्रगतीबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माहिती दिली. आज भारत सर्वात वेगाने पारंपरिक ऊर्जेकडून अपारंपरिक ऊर्जेकडे वळणारा देश ठरत आहे. पूर्वी आपण चीनमधून सोलर मोड्युल, वेफर, इनगॉट आयात करायचो. आता तसे राहीलेले नाही. मुख्यमंत्री सौरवाहिनी प्रकल्पाच्या माध्यमातून राज्यातील शेतकऱ्यांची १६ हजार मेगावॅट विजेची गरज पूर्ण करण्याचे काम वेगाने सुरू आहे. आतापर्यंत ५ हजार मेगावॅट क्षमता निर्माण झाली असून, वर्षाखेरपर्यंत हा आकडा १४ हजार मेगावॅटवर पोहोचेल, अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

थर्मल पॉवरद्वारे होणारे प्रदूषण रोखण्यासाठी ३०० कोटी झाडे लावावी लागली असती. मात्र, सौरऊर्जेमुळे एकही झाड न लावता हे प्रदूषण रोखणे शक्य झाले आहे. विशेष म्हणजे, सौर कृषीपंप योजनेअंतर्गत देशातील एकूण पंपांपैकी ६० टक्के पंप एकट्या महाराष्ट्रात बसवण्यात आले असून, एका महिन्यात सर्वाधिक पंप लावण्याचा जागतिक विक्रम (गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड) महाराष्ट्राने नोंदवला आहे, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

लोकं दावोसवर टीका करत असतात. मी त्या टीकेला कामाने उत्तर देत असतो. आज मी तीन प्रकल्पांचे भूमिपूजन केले आहे. त्यात न्यु ईरा क्लीनटेक, ग्रेटा एनर्जी आणि वारी एनर्जीज यांचा समावेश आहे. हे तीनही प्रकल्प दावोसच्या माध्यमातून साकारत आहेत, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.

### 'अठरा महिन्यात प्रकल्प कार्यान्वित करू'

२००७ मध्ये जेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी गुजरातचे मुख्यमंत्री होते तेव्हा आम्ही त्यांच्या प्रोत्साहनाने सोलर क्षेत्रात उतरलो. आज सोलर क्षेत्रातील सर्वात मोठी कंपनी म्हणून आम्ही उदयास आलो आहे. याच श्रृंखलेत नागपूर येथे उद्योग सुरू करण्याचा मानस होता. त्यानुसार, येथे हा प्रकल्प सुरू होत आहे. यामध्ये महाराष्ट्र सरकारचे संपूर्ण सहकार्य लाभले. तीन दिवसांत जागा मिळाली. पंधरा दिवसांत बांधकाम सुरू करून अठरा महिन्यांत हा प्रकल्प कार्यान्वित करू. यासाठी ३० हजार कोटींची गुंतवणूक आम्ही करणार आहोत. २ हजार लोकांना प्रत्यक्ष तर चार ते सहा हजार लोकांना अप्रत्यक्ष रोजगार मिळणार आहे. या प्रकल्पांतर्गत सोलर क्षेत्रातील संशोधन केंद्र, कौशल्य विकास केंद्र येथे होईल. पाचशे जणांना चीन येथे पाठवून त्यांना प्रशिक्षण देण्यात येईल, अशी माहिती प्रास्ताविकपर भाषणात वारी एनर्जीजचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. हितेश दोशी यांनी दिली.

# फास्टॅग वार्षिक पास
## १ एप्रिलपासून महाग होणार

**नवी दिल्ली, दि. १४ मार्च-**

पुढील महिन्यापासून म्हणजेच १ एप्रिलपासून राष्ट्रीय महामार्गांवर प्रवास करणाऱ्या वाहनधारकांना थोडा अधिक खर्च करावा लागणार आहे. केंद्राच्या रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने फास्टॅग वार्षिक पासच्या किमतीत २.५ टक्क्यांची वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आतापर्यंत ३००० रुपयांत मिळणारा हा पास आता ३०७५ रुपयांना मिळणार आहे. या पासच्या माध्यमातून कारधारकांना देशातील निवडक टोल प्लाझांवर थांबण्याची गरज न पडता सहज प्रवास करता येतो.




मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, फास्टॅग वार्षिक पास सुरू करतानाच त्याच्या अधिसूचनेत दरवर्षी किमतींचे पुनरावलोकन करण्याची तरतूद करण्यात आली होती. त्यानुसारच यंदा वार्षिक पुनरावलोकन करताना २.५ टक्के वाढ करण्यात आली आहे. देशभरातील महामार्गांवरील टोल दरांमध्ये बदल करण्यासाठी जे निश्चित सूत्र वापरले जाते, त्याच आधारावर ही वाढ करण्यात आल्याचेही अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

सरकारने हा विशेष वार्षिक पास १५ ऑगस्टपासून सुरू केला होता आणि त्याला वाहनचालकांकडून मोठा प्रतिसाद मिळाला आहे. आतापर्यंत देशभरातील ५२ लाखांहून अधिक कारधारकांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. लांब पल्ल्याचा प्रवास करणाऱ्या वाहनधारकांसाठी हा पास अत्यंत किफायतशीर मानला जातो. या पासचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे तो एका वर्षात कितीही वेळा रिचार्ज करता येतो, त्यामुळे वारंवार प्रवास करणाऱ्या चालकांना मोठा फायदा होतो.

दरम्यान, वाहनधारकांना जुन्या दरात पास घेण्याची संधी अद्याप उपलब्ध आहे. मंत्रालयाच्या माहितीनुसार, जे वापरकर्ते ३१ मार्चपर्यंत आपला पास रिचार्ज करतील किंवा नवीन पास खरेदी करतील, त्यांना तो ३००० रुपयांच्या जुन्या दरातच मिळेल. मात्र १ एप्रिलच्या सकाळपासून सिस्टममध्ये नवीन दर लागू केले जाणार असून त्यानंतर पाससाठी ३०७५ रुपये मोजावे लागतील. सध्या हा वार्षिक पास देशातील प्रमुख २०० टोल प्लाझांवर वैध आहे. त्यामुळे प्रवाशांना टोल नाक्यांवर थांबण्याची गरज राहत नाही आणि वेळेची बचत होते. तसेच वारंवार टोल टॅक्स कापण्याच्या त्रासातूनही वाहनधारकांना दिलासा मिळतो. भविष्यात या योजनेचा विस्तार करत आणखी टोल प्लाझांचा समावेश करण्याचे सरकारचे उद्दिष्ट असल्याचेही अधिकाऱ्यांनी सांगितले. यामुळे कॅशलेस व्यवहारांना चालना मिळण्याबरोबरच महामार्गांवरील प्रवास अधिक सुलभ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# नाशिक कुंभमेळ्यासाठी
## २२ हजार कोटींच्या कामांना मान्यता

**नाशिक, दि. १४ मार्च-**

त्र्यंबक-नाशिक मध्ये सिंहस्थ कुंभमेळ्याचे आयोजन २०२७ मध्ये करण्यात येत असून या कुंभमेळ्यात देश - विदेशातून करोडो भाविक येणार आहेत. कुंभमेळ्याच्या माध्यमातून येथे येणारा प्रत्येक भाविक भारताची पर्यायाने महाराष्ट्राचे प्रतिबिंब सोबत नेणार आहे. त्यामुळे याच्या यशस्वी आयोजनातून जगाला आकर्षण वाटणारा कुंभमेळा करावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

त्र्यंबक-नाशिक सिंहस्थ कुंभमेळाकरिता करण्यात येत असलेल्या विविध कामांसाठी २२ हजार १८१ कोटी रुपयांच्या कामांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली विधान भवनात आयोजित कुंभमेळा शिखर समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. यामध्ये पहिल्या टप्प्यातील ५ हजार १४० कोटी आणि दुसऱ्या टप्प्यातील १७ हजार ४१ कोटी रुपयांच्या कामांचा समावेश आहे. कुंभमेळा निमित्त सुरू असलेली आणि प्रस्तावित असलेल्या कामांमध्ये कुणी वाईट हेतूने किंवा मुद्दाम विलंब होण्याच्या हेतूने अडथळा आणत असेल, तर त्याची गय केली जाणार नाही. त्याच्याविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात येतील, असा इशाराही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिला. बैठकीला अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्र सिंह राजे भोसले, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, आमदार सीमा हिरे, आमदार देवयानी फरांदे, आमदार सरोज अहिरे, आमदार सर्वश्री पंकज भुजबळ, माणिकराव कोकाटे, दिलीप बनकर, हिरामण खोसकर, राहुल ढिकले, नाशिकच्या महापौर हिमगौरी आहेर उपस्थित होत्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, कुंभमेळा निमित्ताने करण्यात येणाऱ्या कामांकरिता लागणाऱ्या जमिनीच्या भूसंपादनाचा योग्य मोबदला शेतकऱ्यांना देण्यात यावा. नाशिक वर्तुळ मार्गातील अडथळे दूर करीत विशेष बाब म्हणून ५० टक्के भूसंपादन पूर्ण झाल्यानंतर रस्त्याच्या कामाला सुरुवात करावी. कुंभमध्ये स्वच्छता अत्यंत महत्वाची असून या कामांमध्ये करण्यात येणारी शौचालय दर्जेदार असावी. कुंभमेळ्याच्या निमित्ताने नाशिकच्या परिसरातील स्थानकांची पायाभूत सुविधांची कामे रेल्वेच्या माध्यमातून सुरू करण्यात येत आहेत. यामध्ये निफाड रेल्वे स्थानकाचाही समावेश करण्यात यावा, याबाबत रेल्वेने पडताळणी करून कार्यवाही करावी.

# युध्दामुळे महागणार विमान प्रवास ?

**नवी दिल्ली, दि. १४ मार्च-**

मध्य पूर्वेतील तणावाचे चटके आता विमान प्रवासालाही बसणार आहेत. इराण आणि अमेरिका-इस्रायल यांच्यात सुरू असलेल्या युद्धाचा परिणाम आता हवाई प्रवासावरही दिसू लागला आहे. देशातील सर्वात मोठी एअरलाइन कंपनी इंडिगोने १४ मार्चपासून देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय विमान तिकिटांवर अतिरिक्त इंधन अधिभार (फ्यूल सरचार्ज) लागू करण्याची घोषणा केली आहे. या निर्णयानंतर विमानप्रवास करणाऱ्या प्रवाशांना आता तिकिटांसोबत ४२५ ते २३०० रुपयांपर्यंत अतिरिक्त शुल्क भरावे लागणार आहे.

कंपनीने दिलेल्या माहितीनुसार, हा नवीन नियम १४ मार्चच्या रात्री १२ वाजल्यापासून लागू होणार असून त्या वेळेनंतर केलेल्या सर्व नवीन बुकिंगवर हा इंधन अधिभार आकारला जाईल. मध्य पूर्वेतील वाढत्या भू-राजकीय तणावामुळे जेट इंधनाच्या किमतींमध्ये मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे परिचालन खर्च वाढल्याने कंपनीला हा निर्णय घ्यावा लागल्याचे इंडिगोने स्पष्ट केले आहे.



कंपनीच्या मते, भारत आणि भारतीय उपखंडातील विमानप्रवासासाठी ४२५ रुपये इतका इंधन अधिभार आकारला जाईल. मध्य पूर्वेकडील उड्डाणांसाठी हा अधिभार ९०० रुपये असेल. तसेच दक्षिण-पूर्व आशिया, चीन, आफ्रिका आणि पश्चिम आशियातील उड्डाणांसाठी १८०० रुपये अतिरिक्त शुल्क आकारले जाईल. युरोपकडे जाणाऱ्या विमानप्रवासासाठी प्रवाशांना २३०० रुपये इतका इंधन अधिभार भरावा लागणार आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय मार्गांवरील प्रवास अधिक महाग होण्याची शक्यता आहे.

एअरलाइन कंपन्यांच्या एकूण खर्चात एव्हिएशन टर्बाइन फ्यूल (ढऋ) म्हणजेच जेट इंधनाचा मोठा वाटा असतो. इंडिगोच्या मते, एटीएफचा हिस्सा एअरलाइनच्या एकूण परिचालन खर्चाच्या सुमारे ४० टक्के असतो. मध्य पूर्वेतील वाढत्या तणावामुळे या इंधनाच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. इंटरनॅशनल एअर ट्रान्सपोर्ट असोसिएशनच्या जेट फ्यूल मॉनिटरनुसार या प्रदेशात इंधनाच्या किमती ८५ टक्क्यांपेक्षा जास्त वाढल्या आहेत.

कंपनीने असेही सांगितले की, इंधनाच्या वाढत्या किमतींचा संपूर्ण परिणाम थेट तिकिटांच्या भाड्यात जोडला असता तर विमानप्रवास आणखी महाग झाला असता. त्यामुळे प्रवाशांवरील आर्थिक भार काही प्रमाणात कमी ठेवण्यासाठी मर्यादित स्वरूपात इंधन अधिभार आकारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दरम्यान, इंडिगोच्या आधी एअर इंडिया आणि एअर इंडिया एक्सप्रेस यांनीही विमान तिकिटांवर इंधन अधिभार लागू करण्याची घोषणा केली होती. त्यामुळे वाढत्या इंधन दरांचा परिणाम आता भारतातील हवाई प्रवासावर स्पष्टपणे दिसू लागला आहे. आगामी काळात मध्य पूर्वेतील परिस्थिती कायम राहिली तर विमानप्रवासाचे दर आणखी वाढण्याची शक्यता तज्ज्ञांकडून व्यक्त केली जात आहे.

## बॉलिवूड अभिनेत्री मधू मल्होत्रा यांचं निधन

**मुंबई, दि. १४ मार्च-**

७० आणि ८० च्या दशकातील आपल्या बोलक्या डोळ्यांनी आणि सहज अभिनयानं प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या ज्येष्ठ अभिनेत्री मधू मल्होत्रा यांचं शुक्रवारी म्हणजेच १३ मार्च रोजी मुंबईत निधन झालं. वाढत्या वयानुसार उद्भवलेल्या काही आरोग्य समस्यांमुळे त्यांनी वयाच्या ७२ व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनानं बॉलिवूडमधील एका अनुभवी कलाकाराची एक्झिट झाली असून चित्रपटसृष्टीत शोककळा पसरली आहे.

मधू मल्होत्रा यांनी त्यांच्या कारकिर्दीत अनेक सुपरहिट चित्रपटांमध्ये महत्त्वाच्या भूमिका साकारल्या होत्या. विशेषतः 'सहाय्यक अभिनेत्री' म्हणून त्यांनी आपली एक वेगळी ओळख निर्माण केली होती. त्यांनी अमिताभ बच्चन, ऋषी कपूर यांसारख्या दिग्गज कलाकारांसोबत काम केले. सत्ते पे सत्ता (१९८२) या चित्रपटातील त्यांच्या भूमिकेचे विशेष कौतुक झालं होतं. तसंच सुभाष घई यांच्या कर्ज (१९८०) या चित्रपटात त्यांनी महत्त्वाची भूमिका साकारली होती.१९७८ मध्ये आलेल्या विश्वनाथ सिनेमात शत्रुघ्न सिन्हा यांच्यासोबत काम केलं होतं. हा चित्रपट त्यांच्या करिअरमधील एक महत्त्वाचा टप्पा ठरला.आमिर खान स्टारर गुलाल या चित्रपटातही त्यांनी काम केलं होतं. यानंतर रिश्ता कागज का, कयामत, हिरो यांसारख्या अनेक चित्रपटातही त्यांनी भूमिका साकारल्या आहेत.







## महत्वाचे...



### गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या अभिष्टचिंतन निमित्त गोशाळेला चारा भेट

**गंगापूर, दि. १४ मार्च-**

अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर चे शिल्पकार परम पूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे (गुरुमाऊली) यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्याच्या निमित्ताने शुक्रवारी गंगापूर येथील गोकुळधाम गोशाळेत, श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र गंगापूर यांच्या वतीने गौमातेला चारा देण्यात आला. यावेळी दिंडोरी प्रणित, श्री स्वामी सम र्थ सेवा मार्गाचे, जिल्हा निरीक्षक झुंजारराव काकडे पाटील (मामा), तालुका प्रतिनिधी गोपीनाथ प्रधान सर ,सेवा मार्गाचे कायदेशीर सल्लागार शांतीलाल जाधव साहेब, रवींद्र पाटील , वाल्मीक टेमकर, दिलीपराव धाट आदी उपस्थित होते.




### वर्ल्ड किडनी डे निमित्त किडनी दात्यांचा सन्मान

**छत्रपती संभाजीनगर, दि. १४ मार्च-**

वर्ल्ड किडनी डे २०२६ निमित्त कमलनयन बजाज हॉस्पिटलच्या नेफ्रोलॉजी विभागातर्फे नर्सिंग कॉलेज ऑडिटोरियम येथे किडनी आरोग्य जनजागृती व किडनी दात्यांचा सत्कार कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाला सुमारे ३०० हून अधिक किडनी प्रत्यारोपण रुग्ण, दाते व नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून पोलिस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड तर विशेष पाहुणे म्हणून महापौर समीर गजुंदर उपस्थित होते. यावेळी हॉस्पिटलचे सीईओ डॉ. जॉर्ज फर्नांडिस, मेडिकल डायरेक्टर डॉ. अजय रोटे, डायरेक्टर (रिसर्च अँड अकॅडेमिक्स) डॉ. मिलिंद वैष्णव, कन्सल्टंट नेफ्रोलॉजिस्ट व किडनी ट्रान्सप्लांट फिजिशियन डॉ. समीर महाजन तसेच डॉ. निखिल इंगळे उपस्थित होते. सकाळी योग सत्र व वृक्षारोपणाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर किडनी आरोग्यावरील तज्ज्ञांचे मार्गदर्शन, पोस्टर सादरीकरण, प्रश्नमंजुषा, टॅलेंट उपक्रम तसेच किडनी दात्यांचा सत्कार करण्यात आला. उपस्थितांसाठी मोफत आरोग्य तपासणी व तज्ज्ञांचे मार्गदर्शनही देण्यात आले. यावेळी किडनीचे आजार टाळण्यासाठी नियमित तपासणी, निरोगी जीवनशैली आणि अवयवदानाचे महत्त्व याबाबत जनजागृती करण्यात आली. किडनी दात्यांच्या निःस्वार्थ योगदानाचा गौरव करताना किडनी प्रत्यारोपणानंतरही निरोगी व सामान्य जीवन जगता येते हा संदेश कार्यक्रमातून देण्यात आला.

### एआय पल्स २ भारतात लॉन्च, बजेट स्मार्टफोनमध्ये दमदार पर्याय


**मुंबई, दि. १४ मार्च-**




एआय पल्स २ हा स्मार्टफोन भारतात लॉन्च झाला आहे. लॉन्चच्या दिवशी बेस व्हेरिएंटची किंमत ५,९९९ असून हा फोन बजेट स्मार्टफोन सेगमेंटमध्ये आकर्षक पर्याय ठरतो.फोनची मुख्य वैशिष्ट्ये म्हणजे ६,०००एमएएच बॅटरी, जी दिवसभर टिकते. १८डब्ल्यूफास्ट चार्जिंगसह हा फोन वापरासाठी तयार आहे, त्यामुळे बॅटरी संपण्याची चिंता कमी होते.कॅमेरा बाबतीत ५०एमपी ड्युअल एआय रिअर कॅमेरा आणि ८एमपी फ्रंट कॅमेरा देण्यात आला आहे. मागील मॉडेलमधील ५चझ फ्रंट कॅमेर्यापेक्षा हा मोठा अपग्रेड आहे. ६.७४५-इंच एचडी+ डिस्प्ले १२०हर्ट्झ रिफ्रेश रेटसह स्मूथ अनुभव देतो.

### डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर ठरवेल नेतृत्व - मंत्र जयकुमार रावल

**छत्रपती संभाजीनगर, दि. १४ मार्च-**



भारताच्या डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चरविषयक महत्त्वाकांक्षांना सीआयआय डेटासेंटर ब्लूप्रिंट समिट २०२६ च्या ७व्या आवृत्तीत विशेष अधोरेखित करण्यात आले. या परिषदेत वरिष्ठ सरकारी नेते आणि उद्योग क्षेत्रातील दिग्गजांनी भारताला एआय-आधारित डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चरचे जागतिक केंद्र बनवण्यासाठी महत्त्वाकांक्षी रोडमॅप मांडला. चर्चेत कृत्रिम बुद्धिमत्ता (ख), क्लाऊड तंत्रज्ञान आणि डिजिटल अर्थव्यवस्थेच्या वेगवान विस्तारामुळे निर्माण होणाऱ्या संधींवर भर देण्यात आला, तसेच डेटा सेंटर्स, शाश्वत ऊर्जा आणि उच्च-गती कनेक्टिव्हिटीमध्ये मोठ्या गुंतवणुकीची गरज अधोरेखित करण्यात आली.

### मानसी जोशी रॉय यांच्या अभिनयाची चर्चा

**छत्रपती संभाजीनगर, दि. १४ मार्च-**

झी टीव्हीवरील 'लक्ष्मी निवास' मालिकेत लक्ष्मीची भूमिका साकारणाऱ्या मानसी जोशी रॉय यांच्या प्रभावी अभिनयाची सध्या जोरदार चर्चा होत आहे. अलीकडील भागात त्यांनी सुमारे दोन पानांहून अधिक लांबीचे भावनिक स्वगत सलग ३ मिनिटे २९ सेकंदांत एका टेकमध्ये सादर केले. या दृश्याने प्रेक्षकांच्या मनाला स्पर्श करत सोशल मीडियावरही कौतुकाची लाट उसळली. याबाबत बोलताना मानसी जोशी रॉय म्हणाल्या की, या स्वगताची भावनिक खोली समजून घेण्यासाठी त्यांनी दोन दिवस तयारी केली. संवादलेखिका स्नेहा देसाई यांच्या प्रभावी लेखनामुळे हा प्रसंग अधिक ताकदीने साकारता आला. मानसी जोशी रॉय व राजेंद्र चावला यांच्या अभिनयामुळे मालिका अधिक रंगतदार होत आहे. 'लक्ष्मी निवास' दर सोमवार ते शुक्रवार सायंकाळी ७ वाजता झी टीव्हीवर प्रसारित होते.

# दीक्षा कल्याणक उत्साहात; जिनालय मानस्तंभ शुध्दी शोभायात्रा

**तभा वृत्तसेवा,**
**छत्रपती सभाजीनगर दि. १४ मार्च-**

भक्तामर कलश तीर्थ येथे आयोजित १००८ आदिजिन पंचमेरू मानस्तंभ पंचकल्याणक प्रतिष्ठा महोत्सवाच्या अंतर्गत शुक्रवारी (दि.१३) दीक्षा कल्याणक महोत्सव भक्तिभावपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. महोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी जिनालय मानस्तंभ शुद्धी व प्रतिष्ठा अभिषेक, मानस्तंभ जिनालय शुद्धी शोभायात्रा आदी धार्मिक कार्यक्रम उत्साहात पार पडले.

भांडगाव येथील भक्तामर कलश तीर्थ येथे बुधवारी (दि.११) पासून पंचकल्याणक प्रतिष्ठा महोत्सवाची सुरुवात झाली आहे. महोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी मोठ्या संख्येने श्रावक-श्राविकांनी उपस्थिती दर्शवली. पुणे जिल्ह्यासह महाराष्ट्र आणि इतर राज्यांतूनही भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले. महोत्सवामुळे संपूर्ण भक्तामर कलश तीर्थ परिसरात आध्यात्मिक आणि मंगलमय वातावरण निर्माण झाले होते.

शुक्रवारी महोत्सवाची सुरुवात पहाटे शांतिजप आणि जिनदर्शनाने झाली. त्यानंतर सकाळी ६ वाजता जिनेंद्राभिषेक, शांतिधारा, नित्य व जन्मकल्याणक पूजा विधान आणि शांती हवन संपन्न झाले. पुढे सकाळी साडेआठ वाजता भोगोपभोग सामग्री स्थापना व वागदान कार्यक्रम पार पडला.

सकाळी ९ वाजता आचार्य संघाची प्रवचन सभा आयोजित करण्यात आली. या प्रसंगी परम पूज्य जगद्गुरू गणाधिपती गणधराचार्य कुंथुसागर महाराज तसेच पुष्पगिरी प्रणेते गणाचार्य पुष्पदंतसागरजी महाराज यांनी आपल्या प्रवचनांद्वारे श्रावक-श्राविकांना मार्गदर्शन केले.

यानंतर मानस्तंभ जिनालय शुद्धी शोभायात्रा काढण्यात आली. शोभायात्रेनंतर जिनालय मानस्तंभ शुद्धी व प्रतिष्ठा अभिषेक विधी संपन्न झाली. दुपारच्या सत्रात राजसभा, षटकर्म शिक्षण, सतानोत्पत्ती राज्याभिषेक भेट तसेच वैराग्य प्रसंगांचे सादरीकरण करण्यात आले.

दीक्षा कल्याणकाचे महत्त्व

दीक्षा कल्याणक ही भगवान महावीर स्वामी यांच्या जीवनातील तिसरी महत्त्वपूर्ण घटना मानली जाते. या प्रसंगी त्यांनी सांसारिक सुखांचा त्याग करून मुनि दीक्षा स्वीकारली होती. परंपरेनुसार हा प्रसंग मार्गशीर्ष कृष्ण दशमीशी संबंधित मानला जातो. याच दिवशी त्यांनी राजवैभवाचा त्याग करून कुंडग्राम (क्षत्रियकुंड) येथे आत्मसाधनेचा मार्ग स्वीकारला होता.

महोत्सवाच्या अंतर्गत विविध धार्मिक विधी, आचार्य संघाची प्रवचन सभा आणि आरती संपन्न झाली. सायंकाळी आरती, शास्त्र स्वाध्याय तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत भरत-बाहुबली नाटिका सादर करण्यात आली.

महोत्सवाबाबतची माहिती भक्तामर तीर्थ पंचकल्याणक समितीचे किशोर जिनदत्त शाह (चंदूकाका सराफ), डॉ. सारंग शरदकुमार शाह, श्रीमती सुजाता निरंजन शाह, डॉ. स्वप्निल महावीर शाह (पुणे), अतुल गांधी (बारामती), मिलिंद फडे, चेतन शाह (बारामती), वीरकुमार शाह आणि सुरेंद्र बडजात्या यांनी दिली.

संपूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी हा महोत्सव मुख्य संयोजक प्रकाश अजमेरा आणि अध्यक्ष किशोर शाह यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात येत आहे. कार्यक्रमाचे कार्याध्यक्ष महावीर पाटणी, प्रमोद ठोले, उपाध्यक्ष सुजाता शाह, महामंत्री सारंग शाह, कोषाध्यक्ष स्वप्निल शाह तसेच नीता ठोले, विपीन पाडे, वर्धमान कासलीवाल आणि काजू कासलीवाल यांच्या मार्गदर्शनाखाली महोत्सव पार पडत आहे.

## आज सुदृढ बालक स्पर्धा; बालकांच्या संपूर्ण विकासावर मार्गदर्शन

**तभा.वृत्तसेवा,**
**छत्रपती संभाजीनगर, दि. १४ मार्च-**



बालकांचे आरोग्य उत्तम असेल तरच आपण सशक्त भावी पिढी निर्माण करु शकतो. बालकांच्या खाण्यापिण्याबद्दल तसेच इतर सवयींबद्दल समाजात अनेक समज-गैरसमज आहेत. पहिल्या ६ महिन्यात काय द्यावे, त्यानंतर अन्नपदार्थ कसे सुरु करावेत, याचे योग्य नियोजन केल्यास अचूकवेळी शरीराचे भरण पोषण होते. बाळ सुदृढ तर समाज सुदृढ या विचाराने जयस्वाल हॉस्पिटलच्या संयुक्त विद्यमाने आदर्श विद्या निकेतन सोसायटीने १५ मार्च (रविवार) रोजी सुदृढ बालक स्पर्धेचे आयोजन केले आहे. सकाळी ९ ते १२ यावेळात ही स्पर्धा घेण्यात येईल. टिव्ही सेंटर येथील बचपन प्ले स्कूलमध्ये ही स्पर्धा होईल, अधिकाधिक नागरिकांनी आपल्या मुलांना या स्पर्धेत सहभागी करावे, असे अवाहन चंचल पियुष जयस्वाल यांनी केले आहे.

याविषयाची माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेला आदर्श विद्या निकेतन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. सुरेश जयस्वाल उपस्थित होते. चंचल म्हणाल्या, सुदृढ बालक आपले भविष्य आहे. वजनदार बाळ म्हणजे आरोग्यदायी असे नाही. तर योग्य वजन, योग्य उंची अचूक आहार आणि सर्वांगिण विकास महत्त्वाचा आहे. डॉ. जयस्वाल म्हणाले, मुलांच्या सर्वांगिण विकासाच्या दृष्टीने आम्ही प्रयत्नरत असतो. या स्पर्धेतून पालकांना आपल्या बाळाच्या आरोग्याच्या सध्यस्थितीची माहिती होईल. आगामी काळात मुलांना वाढवताना काय करावे याविषयीही मार्गदर्शन केले जाईल. या स्पर्धेनंतर याच ठिकाणी आमदार प्रदीप जैस्वाल, महापौर समीर राजूरकर, उपमहापौर राजेंद्र जंजाळ या मान्यवरांच्या हस्ते तीन विजेत्या बालकांना बक्षीस देण्यात येणार आहे. याशिवाय सर्व सहभागी बालकांसाठीही विशेष भेटही देण्यात येणार आहे. औपचारिक उदघाटन सोहळ्यानंतर मान्यवरांचा संवाद सोहळा होईल. बचपन प्ले स्कूलमधील नवीन तंत्रज्ञान आणि त्याचा बालकांच्या विकासावर होणारा परिणाम याबद्दल चर्चा केली जाणार आहे.

## एमजीएममध्ये महिला धोरणांवर आधारित उद्या चर्चासत्राचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**छत्रपती संभाजीनगर, दि.१४ मार्च-**

महात्मा गांधी मिशन विद्यापीठाचा शिक्षणशास्त्र विभाग, एमजीएम रेडिओ आणि यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त 'धोरण कुठंवर आलं ग बाई!' या विषयावरील चर्चासत्राचे सोमवार, दिनांक १६ मार्च २०२६ रोजी दुपारी ३ वाजता आईनस्टाईन सभागृह येथे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात अंगणवाडीमध्ये काम करणाऱ्या सेविकांचाही मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात येणार आहे.

कार्यक्रमाला महानगरपालिका आयुक्त जी.श्रीकांत हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ हे असणार आहेत. विकास अध्ययन केंद्राच्या प्रोग्राम डायरेक्टर रेणुका कड आणि अधिष्ठाता डॉ.रेखा शेळके या प्रमुख वक्त्या म्हणून या चर्चासत्रात सहभागी होणार आहेत.

एमजीएम विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, महिला व बालविकास विभागाचे विभागीय उपायुक्त कृष्णा राठोड, बालविकास प्रकल्प अधिकारी गणेश पुंगळे, मराठवाडा कॅन्सर हॉस्पिटलचे संचालक डॉ. वरुण नागोरी, चाटे होमिओपॅथी क्लिनिकचे डॉ. अमोल, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे मानद कार्यक्रम व्यवस्थापक दत्ता बाळसराफ आणि अधिष्ठाता डॉ. जॉन चेल्लादुराई यांची या चर्चासत्रास प्रमुख उपस्थिती असणार आहे.९९४ ते २०२४ या ३० वर्षांच्या कालावधीत राज्यात चार महिला धोरणे राबवण्यात आली आहेत. या धोरणांमुळे महिलांच्या जीवनात झालेले चांगले बदल, अंमलबजावणी करताना आलेल्या अडचणी तसेच उपाययोजना यावर या चर्चासत्रात चर्चा केली जाणार आहे.

## जिल्हास्तरीय इस्रो सहल निवड परीक्षेत क्रांती गावडे तालुक्यातून प्रथम

**तभा.वृत्तसेवा,**
**सोयगाव, दि. १४ मार्च-**



सोयगाव जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सोयगाव येथील वर्ग ५ वी मधील विद्यार्थिनी कु.क्रांती निलेश गावडे या विद्यार्थिनीने जिल्हास्तरीय इस्रो सहल निवड परीक्षेमध्ये सोयगाव तालुक्यातून प्रथम क्रमांक मिळवून सहलीसाठी निवड झालेली आहे.कु.क्रांती ने यापूर्वी जिल्हास्तरीय वकृत्व स्पर्धेत ही प्रथम क्रमांक मिळावलेआ आहे. तसेच सैनिकी स्कुल सातारा निवड परीक्षेतही उत्कृष्ट गुण प्राप्त करून निवड झालेली आहे.जिल्हास्तरीय इस्रो सहल निवड परीक्षेत सोयगाव तालुक्यातील प्रथम क्रमांक मिळविल्या बद्दल कु.क्रांतीचे व मार्गदर्शक वर्गशिक्षक तथा मुख्याध्यापक किरणकुमार पाटील यांचे जिल्हा परीषद सदस्या पुष्पाताई काळे,नगराध्यक्षा आशाबी तडवी,उपनगराध्यक्षा सुरेखाताई काळे,पचायत समिती सदस्या जयश्री पवार, सविता गव्हाडे गटशिक्षणाधिकारी सचिन शिंदे,शिक्षण विस्तार अधिकारी सचिन पाटील, सोयगाव केंद्र प्रमुख फिरोज तडवी,भागवत गायकवाड,रविंद्र काळे,हर्षल काळे,राजेंद्र दुतोंडे,अण्णा वाघ,रगनाथ लोखंडे तसेच तालुक्यातील सर्वच शिक्षक संघटना तसेच शिक्षकांनी तसेच शाळेतील मुख्याध्यापक किरणकुमार पाटील, सुरेखा चौधरी,पंकज रगडे,रामचंद्र महाकाळ,मंगला बोरसे,सविता पाटील,गणेश बाविस्कर, अंकुश काळे,प्रतिभा कोळी,नंदा म्हस्के,पाडूरंग बारगजे,विखार शेख,बिलाल बागवान,विवेक महाजन,अनिल देसाई, तानाजी चव्हाण,शुभम देसले,पूनम लाड यांनी अभिनंदन केले आहे.

## पूर्णगिरी ते मोनगिरी पायी दिंडी सोहळा



**तभा वृत्तसेवा,**
**खुलताबाद, दि. १४ मार्च-**

पूर्णगिरी ते मोनगिरी पायी दिंडी सोहळा खुलताबाद भद्रा मारुती या ठिकाणी दिंडी सोहळ्याचे जोरदार स्वागत. निल्लोड तालुका सिल्लोड जिल्हा छत्रपती संभाजी नगर या ठिकाणाहून मठपती गुरुवर्य अनतगिरी जी महाराज यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली दि ११ मार्च रोजी निघालेला पायी दिंडी सोहळा श्री क्षेत्र कोपरगाव या ठिकाणी १६ मार्च रोजी पोहोचणार आहे या भव्यदिंडी सोहळ्यात संतश्रेष्ठ जगद्गुरु जनार्दन स्वामी (मोनगिरी महाराज) बाबाजींची पालखी सोहळा बाबाजींचा जयजयकार करत. आज खुलताबाद या ठिकाणी भद्रा मारुती ची आरती पूजा करून. पालखीची महाआरती व बाबाजींच्या जयजयकार करून श्री क्षेत्र कोपरगाव जिल्हा अहिल्यानगर या देवस्था कडे जाण्यासाठी मार्गस्थ झाली. यावेळी खुलताबाद येथील संतोष करपे पाटील ज्योती संतोष करपे स्वप्निल (बाळू )सोमवंशी राजवीर करपे यांनी जनार्दन स्वामी यांच्या पालखीचे पूजन करून गुरुवर्य आनंद गिरीजी महाराज यांचे संत पूजन करण्यात आले.

## देवगिरी अभियांत्रिकी महाविद्यालयात पालक-शिक्षक सभा



**तभा वृत्तसेवा,**
**छत्रपती संभाजीनगर, दि. १४ मार्च-**

देवगिरी अभियांत्रिकी महाविद्यालयात तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या पालकांसाठी पालक-शिक्षक सभा उत्साहात संपन्न झाली. या बैठकीचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांच्या करिअरची संधी, प्लेसमेंटची तयारी आणि पालकांची भूमिका याबाबत सविस्तर चर्चा करणे हा होता. या सभेला पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमात संस्थेचे संचालक डॉ. सुभाष लहाने यांनी पालकांना मार्गदर्शन करताना सांगितले की, विद्यार्थ्यांचे यशस्वी करिअर घडवण्यासाठी संस्था, विद्यार्थी आणि पालक यांचे संयुक्त प्रयत्न अत्यंत महत्त्वाचे आहेत. महाविद्यालय विद्यार्थ्यांना विविध प्रशिक्षण कार्यक्रम, कौशल्य विकास उपक्रम आणि उद्योग क्षेत्राशी जोडणाऱ्या प्लेसमेंटच्या संधी उपलब्ध करून देत आहे. पालकांनीही विद्यार्थ्यांना योग्य प्रोत्साहन व पाठबळ देणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी विद्यार्थ्यांच्या करिअर विकास व प्लेसमेंट तयारीमध्ये पालकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचेही अधोरेखित करण्यात आले. पालकांनी आपल्या पाल्यांना सतत प्रोत्साहन देऊन त्यांचा आत्मविश्वास वाढवावा तसेच अभ्यास, प्रशिक्षण आणि कौशल्य विकासासाठी योग्य वातावरण निर्माण करावे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबाबत नियमित संवाद साधणे, इंटर्नशिप, प्रशिक्षण कार्यक्रम आणि विविध उपक्रमांमध्ये सहभाग घेण्यासाठी त्यांना प्रेरित करणे हीदेखील पालकांची महत्त्वाची जबाबदारी असल्याचे सांगण्यात आले.

तसेच महाविद्यालयाचे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी प्रा. दीपक पवार यांनी विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या प्रशिक्षण कार्यक्रमांची, उद्योगांशी असलेल्या संधींची तसेच आगामी प्लेसमेंट प्रक्रियेची सविस्तर माहिती पालकांना दिली. त्यांनी विद्यार्थ्यांनी कम्युनिकेशन स्किल्स, टेक्निकल स्किल्स आणि व्यक्तिमत्त्व विकासावर भर देण्याचे आवाहन केले. आजच्या स्पर्धात्मक युगात संवाद कौशल्य, तांत्रिक ज्ञान आणि व्यक्तिमत्त्व विकासावर भर देण्यासाठी पालकांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे गरजेचे असल्याचेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्या शेवटी पालकांनी विद्यार्थ्यांच्या प्रगतीबाबत आपली मते मांडली तसेच संस्थेने राबविलेल्या प्लेसमेंट व प्रशिक्षण उपक्रमांचे स्वागत केले. या संवादात्मक बैठकीमुळे पालक, शिक्षक आणि संस्था यांच्यात अधिक समन्वय निर्माण झाला असून विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित झाले.

या पालक-शिक्षक सभेमुळे पालकांना विद्यार्थ्यांच्या करिअर तयारीविषयी अधिक स्पष्ट माहिती मिळाली असून कार्यक्रमाला मोठ्या संख्येने पालक उपस्थित होते व संपूर्ण कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या यशस्वी विशेष कार्यक्रमाबद्दल मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. आ. श्री. प्रकाशदादा सोळुंके, सचिव मा. आ. श्री. सतीश चव्हाण, उपाध्यक्ष श्री. शेखसलीम शेख अहमद, कोषाध्यक्ष श्री. किरण आवरगावकर, कार्यकारिणी सदस्य श्री. विश्वास येळीकर, श्री. प्रदीप चव्हाण तसेच महाविद्यालयाचे संचालक डॉ. सुभाष लहाने यांनी शुभेच्छा दिल्या.

**जाहीर प्रगटन / सायटेशन नोटीस** — कि.दि.अर्ज क्र.१५७/२०२६

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क स्तर न्यायालय**
**गंगापूर, ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

**१) श्रीमती भारतीबाई बाळकृष्ण मुळे,**
वय - ७६ वर्षे, धंदा - गृहिणी,
रा. ब्राम्हण गल्ली, गंगापुर ता. गंगापुर
जि. छत्रपती संभाजीनगर
**२) राजाराम बाळकृष्ण मुळे,**
वय - ५१ वर्षे, धंदा - वकीली,
रा. ब्राम्हण गल्ली, गंगापुर
ह.मु. फ्लॅट नं.७. कासलीवाल सुवर्णयोग अपार्टमेन्ट,
वेंकटेश मंगल कार्यालयासमोर गारखेडा परिसर,
छत्रपती संभाजीनगर
**३) सोमनाथ बाळकृष्ण मुळे,**
वय - ४६ वर्षे, धंदा - व्यापार
रा. हनुमान मंदिराजवळ, ब्राम्हण गल्ली,
गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर
**४) अंजली पि. बाळकृष्ण मुळे,**
वय - ५२ वर्षे, धंदा - गृहिणी,
रा. हिंगणी ता. जि. हिंगोली

— **अर्जदार**

विरुध्द

**गैरअर्जदार :- निरंक**

**प्रकरण :- हेअरशिप प्रमाणपत्र (वारसप्रमाणपत्र) मिळणे बाबत.**

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ड. श्री. ए.बी. कुलकर्णी यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र.२ ते ४ हे आपसांत नात्याने सख्खे भाऊ व बहिण असुन अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ ते ४ यांची आई आहे. अर्जदार क्र.१ चे पति व अर्जदार क्र.२ ते ४ यांचे वडील नामे बाळकृष्ण पंडीतराव मुळे हे गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथील रहिवाशी होते, ते दिनांक ०७/१२/२०२० रोजी गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहे. मयत बाळकृष्ण पंडीतराव मुळे अर्जदार क्र.१ ते ४ हे कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतिरीक्त मयत बाळकृष्ण पंडीतराव मुळे यांना इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे नमुद करुन या न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुद्‌तीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. सदर प्रकरणात पुढील तारीख दि.२७/०४/२०२६ रोजीची ठेवण्यात आली आहे.

करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक १३/०३/२०२६ रोजी दिले.

**सही/-**
**वरीष्ठ/कनिष्ठ लिपीक**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय क स्तर गंगापूर**

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## आ.अमित देशमुख यांनी घेतल्या नागरिकांच्या भेटी

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १४ मार्च : आ. अमित विलासराव देशमुख यांनी शनिवारी बाभळगाव येथील आपल्या निवासस्थानी लातूर शहर व जिल्ह्यातील नागरिक, विविध संस्थांचे पदाधिकारी आणि काँग्रेस कार्यकर्त्यांच्या भेटी घेतल्या.यावेळी आ. देशमुख यांनी प्रत्येकाशी संवाद साधून त्यांच्या अडीअडचणी आणि समस्या सविस्तरपणे जाणून घेतल्या.

नागरिकांनी दिलेल्या विविध निमंत्रणांचा त्यांनी स्वीकार केला, तसेच नागरिकांच्या प्रलंबित कामांबाबत आणि समस्यांबाबत संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. लातूर शहर महानगरपालिकेत महापौर जयश्री सोनकांबळे, उपमहापौर स्नेहल उटगे, गटनेते विजयकुमार साबदे, यानंतर स्थायी समिती, परिवहन समिती तसेच स्वीकृत सदस्यांची निवड झाल्याच्या निमित्ताने शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष ड. किरण जाधव, जिल्हा काँग्रेस अध्यक्ष अभय साळुंखे व शहर आणि जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांनी आ. देशमुख यांचे आभार मानले. यावेळी सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून त्यांना आगामी कारकिर्दीसाठी सर्वांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संतोष देशमुख, ट्वेंटीवन शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, हमीद शेख, डॉ. अरविंद भातांब्रे, अजित माने, भालचंद्र सोनकांबळे,

नगरसेवक इसरार सगरे, नगरसेवक अभिषेक पतंगे, व्यंकटेश पुरी, मुख्तार शेख, सचिन सूर्यवंशी, मनोज स्वामी, राजकुमार पाटील, दत्ता सोमवंशी, संभाजी सिंदगे, रवी सिंदगे, खंडू पाटील यांच्यासह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### विविध वृत्त...

## नांदगाव येथे रेशीम शेतकरी, रीलर्स मेळावा उत्साहात संपन्न

त.भा. वृत्तसेवा,

लातूर दि.१४ मार्च : शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावा आणि ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊन गावांची प्रगती व्हावी, यासाठी शासन कटिबद्ध आहे. याच भूमिकेतून लातूर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात 'रेशीम शेती क्लस्टर' उभारण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातील, असे जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब वाघ यांनी सांगितले. लातूर तालुक्यातील नांदगाव येथील कौसल्या सिल्क रीलिंग (जयराम मठ) येथे आयोजित आधुनिक तंत्रज्ञान, समृद्ध रेशीम उद्योग या विषयावरील रेशीम शेतकरी व रीलर्स मेळाव्यामध्ये ते बोलत होते.

या कार्यक्रमाला लातूरचे रेशीम विकास अधिकारी एस. बी. वराट, केंद्रीय रेशीम मंडळाचे (धारवड) डॉ. विराज सोमकुंवर, 'पोखरा' योजनेचे तंत्र अधिकारी जयसिंग जगधने, सेवानिवृत्त अधिकारी नरसिंग बावगे, रेणापूर पंचायत समितीचे उपसभापती शरद दरेकर, कौसल्या सिल्क रीलिंगचे संचालक ऋषिकेश कराड आणि बीड जिल्ह्यातील आदर्श सरपंच कालिदास नवले यांची प्रमुख उपस्थिती होती.

शेतकऱ्यांनी जुन्या रुढीवादी विचारांतून बाहेर पडून धाडसाने नवीन प्रयोग केले पाहिजेत. ज्या गावात पैशांची खेळती आवक नसते, ते गाव समृद्ध होऊ शकत नाही. रोजगारासाठी होणारे स्थलांतर थांबवण्यासाठी रेशीम शेती हा एक शाश्र्वत आधार आहे. रेशीम कोशांच्या दरात मोठी घसरण होत नसल्याने हे पीक आर्थिकदृष्ट्या सुरक्षित आहे, असे वाघ यावेळी म्हणाले.

रेशीम शेतीसाठी १०० टक्के अनुदान : एस. बी. वराट

लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी रेशीम कार्यालय सातत्याने प्रयत्नशील आहे. मनरेगा योजनेतून रेशीम शेतीसाठी शेड आणि आवश्यक साहित्यासाठी १०० टक्के अनुदान उपलब्ध करून दिले जाते. रेशीम शेतीला अत्यल्प पाण्याची गरज असल्याने किमान आठ ते दहामाही पाणी सिंचनाची सुविधा असलेल्या शेतकऱ्यांसाठी हा उत्तम पर्याय आहे. एकरी वार्षिक अडीच ते तीन लाख उत्पादन मेळत असल्याने नगदी पीक म्हणून रेशीम पीक पुढे येत आहे. शेतकऱ्यांनी पारंपरिक पिकांऐवजी रेशीम शेतीकडे वळून याला एका जनचळवळीचे स्वरूप द्यावे, असे आवाहन रेशीम विकास अधिकारी एस. बी. वराट यांनी यावेळी केले.

यावेळी रेशीम शेतीत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व प्रशिक्षण पूर्ण केलेल्या शेतकऱ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच रेशीम धागा प्रक्रिया प्रशिक्षण पूर्ण केलेल्या कविता साळुंके व प्रियंका कांबळे यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक केंद्रीय रेशीम मंडळाचे डॉ. विराज सोमकुंवर यांनी केले. सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार कौसल्या सिल्क रीलिंगचे संचालक ऋषिकेश कराड यांनी मानले. या मेळाव्याला लातूर जिल्ह्यातील सरपंच, ग्रामस्थ आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ग्रंथोत्सवामुळे वाचन संस्कृतीच्या संवर्धनास मदत : आ. विक्रम काळे

## औसा येथे दोन दिवसीय ग्रंथोत्सवाचे दिमाखात उद्घाटन; ग्रंथप्रेमींचा मोठा प्रतिसाद





त.भा. वृत्तसेवा,

लातूर दि.१४ मार्च : ग्रंथ वाचनाने माणसाचे मस्तक समृद्ध होते आणि समृद्ध झालेले मस्तक कोणापुढेही सहज नतमस्तक होत नाही, हा महापुरुषांचा विचार आजच्या डिजिटल युगात रुजविण्याची गरज आहे, असे प्रतिपादन आमदार विक्रम काळे यांनी केले. औसा येथील श्री मुक्तेश्र्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये आयोजित दोन दिवसीय लातूर जिल्हा ग्रंथोत्सव व ग्रंथ प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे होते.

यावेळी व्यासपीठावर उपजिल्हाधिकारी सायली ठाकूर, जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर, मराठवाडा साहित्य परिषदेचे जिल्हाध्यक्ष योगीराज माने, ग्रंथ मित्र राम मेकले, प्रभाकर कापसे, प्राचार्य एस. एम. जलसगरे, संजय सूर्यवंशी, प्रा. अंकुश नाडे, शिवलिंग औटी, रविअप्पा चट्टे आणि राजकुमार जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

युवा वर्गामध्ये वाचनाची ओढ निर्माण करण्यासाठी ग्रंथ प्रदर्शन आणि ग्रंथोत्सवासारखे उपक्रम महत्वपूर्ण ठरतात. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी, यासाठी मराठवाड्यातील आपण सुमारे ३५० शाळा व महाविद्यालयांना प्रत्येकी ३६ हजार रुपयांची ग्रंथसंपदा उपलब्ध करून दिल्याचे आ. काळे यांनी सांगितले. तसेच वाचकांना दर्जेदार ग्रंथ वाचनासाठी उपलब्ध करून देवून सार्वजनिक वाचनालयांनी या वाचन चळवळीत सक्रिय सहभाग नोंदवणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

ग्रंथ हे भविष्याचे दिशादर्शक: प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे

दरवर्षी वेगवेगळ्या तालुक्यांमध्ये ग्रंथोत्सव आयोजित केल्यास सर्वसामान्य वाचकांना तालुक्याच्या ठिकाणी पुस्तके विकत घेण्याची संधी मिळते. ग्रंथोत्सवाला येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने येथील स्टॉलवरून किमान एक तरी पुस्तक विकत घेऊन जावे. ग्रंथ माणसाला प्रेरणा देतात, स्वाभिमानी बनवतात. जगभरातील अनेक महान व्यक्तींना ग्रंथांमुळे प्रेरणा मिळाली आणि त्यांच्या कार्याला ग्रंथांमुळेच दिशा मिळाली. ग्रंथ हे पिढ्यानपिढ्याचे ज्ञान जपून ठेवतात, भूतकाळ व वर्तमानकाळ समजावून सांगतात आणि भविष्याचा दिशादर्शक म्हणून काम करतात, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे यांनी यावेळी केले.

ग्रंथ मानवी जीवनातील ताणतणाव दूर करतात. वाचन संस्कृतीला चालना देण्यासाठी सतत प्रयत्न होणे गरजेचे आहे. ज्ञान आपल्याला विवेकशील व सुसंस्कृत बनवते. ग्रंथ आणि ग्रंथालये हे ज्ञानाचे खरे भंडार आहेत. आजच्या डिजिटल काळातही ग्रंथांना पर्याय नाही. आजही ग्रंथ वाचनाची आवड जपणाऱ्यांची संख्या अधिक आहे, असे डॉ. रोडे यांनी सांगितले.'

उपजिल्हाधिकारी सायली ठाकूर यांनी ग्रंथोत्सव आयोजनाचा हेतू स्पष्ट करताना वाचन चळवळीला चालना देण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे सांगितले. प्रारंभी जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर यांनी प्रास्ताविक केले. तसेच या दोन दिवसीय ग्रंथोत्सवात विविध प्रकाशकांचे स्टॉल, पुस्तक प्रदर्शन, चर्चासत्रे व इतर सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले असून, वाचकांनी मोठ्या संख्येने सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. सूत्रसंचालन पी. सी. पाटील यांनी केले, तर राजेंद्र कोरे यांनी आभार मानले.

ग्रंथोत्सवानिमित्त सकाळी ग्रंथ दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. श्रीरंग गहिनीनाथ यांच्या हस्ते ग्रंथपूजन करून ग्रंथदिंडीला सुरुवात झाली. या ग्रंथदिंडीत वारकरी वेशभूषा केलेला विद्यार्थ्यांचा चमू , मुक्तेश्र्वर विद्यालय, आजीम हायस्कूल, वीरभद्रेश्र्वर विद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर, उपमुख्यमंत्री अजित पवार, माजी खासदार जे. एम. वाघमारे, माजी आमदार गंगाधर पटणे यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

प्रत्येकाने वाचनाची आवड जोपासायला हवी : जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

औसा येथे आयोजित दोन दिवसीय लातूर ग्रंथोत्सवाला जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा ठाकूर-घुगे यांनी भेट दिली. यावेळी त्यांनी ग्रंथोत्सवातील विविध पुस्तक दालनांची पाहणी केली. तसेच वाचक, नागरिक तसेच ग्रंथप्रेमींशी संवाद साधला. आजच्या डिजिटल युगातही ग्रंथ वाचन हे माणसाच्या व्यक्तिमत्त्व विकासाचे, ज्ञानार्जनाचे आणि मानसिक स्वास्थ्याचे सर्वोत्तम साधन आहे. प्रत्येक व्यक्तीने, विशेषतः युवा पिढीने वाचनाची आवड जोपासली पाहिजे. ग्रंथ वाचनामुळे माणूस विवेकशील, सुसंस्कृत आणि स्वावलंबी बनतो. ताणतणाव कमी होतो आणि जीवनाकडे सकारात्मक दृष्टिकोन विकसित होतो, असे जिल्हाधिकारी म्हणाल्या.

ग्रंथोत्सवासारख्या उपक्रमांमुळे सर्वसामान्य नागरिकांना विविध विषयांवरील दर्जेदार पुस्तके एकाच ठिकाणी उपलब्ध होतात. नागरिकांनी ग्रंथ दालनाला भेट देऊन किमान एक तरी पुस्तक खरेदी करावे. वाचन हा छंद नव्हे तर जीवनाचा भाग बनवावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केल.

## लातूर विभागीय महसूल आयुक्तालय निर्माण कृती समिती आक्रमक

त.भा. वृत्तसेवा,

लातूर दि. १४ मार्च : शुक्रवारी लातूर विभागीय महसूल आयुक्तालय निर्माण कृती समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. महाराष्ट्र शासनाचे चालू असलेल्या अधिवेशन काळात महसूल आयुक्तालयाचे विभाजन करण्याचे संकेत महसूलमंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत दिले आहेत.तसे विविध बातम्या



वृत्तपत्रात छापून ही आलेल्या आहेत. गुणवत्ता, बहुसंख्य विभागीय कार्यालय , कार्यालयासाठी उपलब्ध असलेली प्रशासकीय इमारत आणि मराठवाड्याचा सर्वांगीण विकास यामुळे नवीन स्वतंत्र विभागीय 'हसूल आयुक्तालय लातूर येथेच झाले पाहिजे,या प्रमुख मागणीच्या अनुषंगाने पुढील दिशा ठरवण्यासाठी अत्यंत महत्त्वाची बैठकीचे आयोजन बाबासाहेब परांजपे फाउंडेशन,क्रीडा संकुल लातूर येथे आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीच्या अध्यक्षस्थानी समितीचे कार्याध्यक्ष जेष्ठ विधिज्ञ व्यंकटराव बेद्रे होते तर बैठकीस अशोक गोविंदपूरकर,कॉम्ब्रेड विश्र्वंभर भोसले, ओमप्रकाश आर्य,रामकुमार रायवाडीकर,अँड विजय जाधव,अशोक कांबळे, पांडुरंग देडे,अँड प्रदिपसिंह गंगणे,संजय व्यवहारे,शाम वरयानी,अँड मधुकर कांबळे,दिलीप आरळीकर,भाऊसाहेब उमाटे,प्रा संजय मोरे,कांबळे शिवाजी,अँड डी एन भालेराव,अनिल देशपांडे,ताहेर सौदागर,सुधाकर डिसले आदी उपस्थित होते बैठकीत सर्वानुमते चर्चा करून जिल्हयातील लोकप्रतिनिधीची शिष्टमंडळाद्वारे भेट घेऊन लातूरला विभागीय महसूल आयुक्तालय निर्माण करण्यासाठी मदत घेण्यासाठी विनंती करण्यात येणार असल्याची माहिती दिली आहे.

## 'दयानंद कला'मध्ये करिअर मार्गदर्शन



त.भा. वृत्तसेवा,

लातूर दि.१४ मार्च : दयानंद कला महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी 'महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या विविध स्पर्धा पर-ीक्षा तयारी व करिअर मार्गदर्शन' या विषयावर विशेष मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षांविषयी जागरूकता निर्माण करणे तसेच त्यांना योग्य दिशा देणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून गट विकास अधिकारी शिवकुमार पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड होते. यावेळी प्रा. चैतन्य शिंदे, प्रा. आदित्य शिरोळे उपस्थित होते.

यावेळी पाटील यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या विविध स्पर्धा परीक्षांचे स्वरूप, अभ्यासाची पद्धत, वेळेचे योग्य नियोजन तसेच आवश्यक संदर्भ ग्रंथ याबाबत सविस्तर माहिती

दिली. त्यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसाठी सातत्यपूर्ण अभ्यास, संयम, सकारात्मक दृष्टिकोन आणि शिस्तबद्ध तयारी यांचे महत्त्व पटवून दिले. विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनीही आत्मविश्र्वास, चिकाटी आणि जिद्द यांच्या बळावर स्पर्धा परीक्षांची तयारी केल्यास निश्र्चित यश मिळवता येते. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. गायकवाड यांनी विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांना करिअरचा एक सक्षम व प्रतिष्ठित पर्याय म्हणून स्वीकारून सातत्याने अभ्यास करावा, असे मार्गदर्शन केले. अशा प्रकारचे मार्गदर्शनपर कार्यक्रम विद्यार्थ्यांमध्ये प्रेरणा निर्माण करून त्यांच्या आत्मविश्र्वासात वाढ करतात.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. संतोष पाटील यांनी केले. सूत्रसंचालन देवांश पाचंगे यांनी केले. प्रा. गजानन वायाळ यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. मार्गदर्शन सत्रादरम्यान विद्यार्थ्यांनी विविध प्रश्र्न विचारून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले.

## पक्षाचा विचार, आदर्श जोपासण्याचे काम पदाधिकारी कार्यकर्त्यांनी करावे : अजित पाटील



त.भा. वृत्तसेवा,

लातूर दि.१४ मार्च: भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष मा.आ.रविंद्रजी चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पार्टी शहर जिल्ह्याच्यावतीने पंडित दिनदयाल उपाध्याय प्रशिक्षण अभियानाने आयोजन करण्यात आलेले आहे. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून संघटनात्मक क्षमता वाढविणे, पक्षाची विचारधारा व आदर्शाची ओळख निर्माण करणे, कार्यकर्त्यांना सक्षम बनविणे, भविष्यातील कार्यक्रम व जनसंपर्काची तयारी करून आगामी निवडणुकांसाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांना सक्रीय व सक्षम बनवण्याचे कार्य सुरू आहे. त्यामुळे या प्रशिक्षणाच्या माध्यमातून व पक्षीय संघटनाच्या माध्यमातून पक्षाचे विचार व आदर्श जोपासण्याचे कार्य पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकजुटीने करावे, असे आवाहन भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी केले.

यावेळी ते जेएसपीएम शैक्षणिक संकुल, लातूर येथील परिसरामध्ये आयोजित पंडित दिनदयाल उपाध्यक्ष प्रशिक्षण अभियानाच्या शुभारंभप्रसंगी ते बोलत होते. यावेळी या प्रशिक्षण कार्यक्रमाला विरोधी पक्षनेते देविदास काळे, नगरसेविका तथा महामंत्री रागिणी यादव, सरचिटणीस संजय गिर, संगिता शिंदे, तुकाराम गोरे, प्रदीप मोरे, व्यंकटेश कुलकर्णी, सुधीर धुत्तेकर, राहुल भुतडा, सूरेश जाधव, मनोज सूर्यवंशी, दिग्विजय काथवटे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना अजित पाटील कव्हेकर म्हणाले की, पंडित दिनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान हा एक प्रशिक्षण व सुदृढीकरण उपक्रम असून या माध्यमातून भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांना विचारधारा, संघटनात्मक कार्यपध्दती, नेतृत्वक्षमता आणि कार्यकुशलतेबाबत मार्गदर्शन देण्याचा उद्देश आहे. पंडित दिनदयाल उपाध्याय यांच्या एकात्म मानववाद आणि अंत्योदय या आदर्श विचारावर आधारीत हा प्रशिक्षण कार्यक्रम आहे. पहिल्याच दिवशी होत असलेल्या या प्रशिक्षणाला महात्मा बसवेश्वर मंडल व श्री सिध्देश्वर मंडल अंतर्गत येणार्या सहा प्रभागामधील कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देण्याचे कार्य केलेले आहे. त्यामुळे लातूर शहर जिल्ह्यामध्ये पक्षाचे विचार तळागाळापर्यंत पोहचण्यासाठी मोठी मदत होणार असल्याचा विश्वासही अजित पाटील कव्हेकर यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला.

# विकासाला नव्हे भाजपाच्या भ्रष्टाचाराला विरोध

## जिल्हा नियोजन समितीच्या २६ कोटींच्या कामांना स्थगिती लातूर शहर काँग्रेसने केली भाजपाची पोलखोल



त.भा. वृत्तसेवा,

लातूर दि.१४ मार्च : जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून लातूर शहर महापालिकाअंतर्गत विकास कामे करण्यासाठी २६ कोटी रुपये मंजूर केले आहेत. या कामांच्या निविदा स्पर्धात्मकरितीने पुर्णत्वास येण्याऐवजी यात भ्रष्टाचार करण्याच्या उद्देशाने भाजपाच्या आमदार आणि पदाधिकाऱ्यांनी निविदा तुकड्या तुकड्यांत मंजूर केल्या. त्यामुळे महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत या कामांना तात्पुर्ती स्थगिती देऊन याची चौकशी करण्याचा निर्णय सभागृहाने घेतला. यात विकास कामांना विरोध नव्हे तर भाजपाच्या भ्रष्टाचाराला आमचा विरोध असून लातूरच्या जनतेशी आम्ही बांधील असल्यामुळेच आमची भावना जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी हा निर्णय घेतल्याचे लातूर शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष तथा नगरसेवक अ‍ॅड. किरण जाधव यांनी शुक्रवारी येथे पत्रकार परिषदेत स्पष्ट केले.

येथील काँग्रेस भवन येथे झालेल्या पत्रकार परिषदेस लातूर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष अभय सा ळ्ुंके, महापौर जयश्री सोनकांबळे, उपमहापौर अ‍ॅड. स्नेहल उटगे, मनपाचे सभागृह नेते विजयकुमार साबदे, नगरसेवक अहेमदखान पठाण, अ‍ॅड, दीपक सूळ, सचिन बंडापल्ले, इसरार सगरे, पवन सोलंकर, आतिष चिकटे, विकास कांबळे, गिरीश व्याळे, सचिन गायकवाड, प्रविण सूर्यवंशी यांची उपस्थिती होती.

लातूर शहर महानगरपालिकेच्या निवडणुकीत काँग्रेस वंचित बहुजन आघाडीने लातूरकरांसाठी दिलेल्या जाहिरनाम्याच्या पुर्ततेसाठी आमचे प्रयत्न सुरु आहेत, असे नमुद करुन अ‍ॅड. किरण जाधव म्हणाले, २६ कोटी रुपयांच्या विकास कामांविषयी भाजपाकडून बालीश आरोप केले जात आहेत. जिल्हा नियोजन समितीच्या माध्यामातून विविध विकास कामांना निधी दिला जातो. तसा प्रस्ताव प्रशासनाच्या मान्यतेस्तव जिल्हा नियोजन समितीकडे पाठवावा लागतो. त्यात नागरिकांच्या सूचनांचा अंतर्भाव असावा लागतो. परंतु, कुठलाही संवैधानिक अधिकार नसताना लातूर शहराबाहेरील भाजपाच्या आमदारांनी कामे सुचवली आणि या कामांच्या तुकड्या-तुकड्यांमध्ये निविदा करण्यात आल्या. भाजपा पदाधिका-यांच्या पत्राच्या अनुषंगाने नाली दलितोत्तर योजना, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनांना तुकडवा तुकड्यांत मान्यता देण्यात आली. त्याला मनपा प्रशासनाने घाईगडबडीत मान्यताही दिली. हे सर्व चुकीच्या पद्धतीने झाल्याने या कामांना मनपा सभागृहाने तात्पुर्ती स्थगिती दिली आहे. या निविदांची नगर विकास विभागाच्या वतीने चौकशी करुन सत्य बाहेर यायला काहींच अडचण नाही. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ७५ फुट उंचिच्या पुतळ्याचे काम असो की, दिवंगत नेते शिवराज पाटील चाकुरकर यांच्या स्मारकाचे काम असो आमच्यासाठी हा राजकीय नव्हे तर भावनिक मुद्दा आहे. त्यामुळे लातूरकरांच्या विश्र्वासाला कदापीही तडा जाऊ देणार नाही, असेही ते म्हणाले.

यावेळी बोलताना महापौर जयश्री सोनकांबळे म्हणाल्या, शहराच्या सर्वांगिण विकासाचे आमचे प्रयत्न आहेत. निवडणुकीत आम्ही लातूरकरांना स्वच्छ, भ्रष्टाचारमुक्त आणि पारदर्शक कारभाराचे वचन दिले आहे. त्यास बांधिल राहून शहराचा विकास करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. उपमहापौर अ‍ॅड. स्नेहल उटगे म्हणाले, निवडणुकीत आम्ही नारिकांना जाहिरनामा दिलेला टक्केवारी बुडत असल्याने अकांडतांडव जिल्हा नियोजन समितीच्या विकास कामांत तुकड्या, तुकड्यात प्रशासकीय मान्यता देणे, तुकड्या, तुकड्यात निविदा करुन भ्रष्टाचार करणे हा भाजपा आमदारांचा आणि पदाधिकाऱ्यांचा एकमेव अजेंडा आहे. केवळ टक्केवारी बुडत असल्यामुळे विकास कामांना खोडा वगैरे, असा अकांड तांडव केला जात आहे, असे नमुद करुन काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके म्हणाले, या कामांची निविदा प्रक्रिया घाईत झाली वर्क ऑर्डर काढताना कायद्याच्याबाबी दुर्लक्षीत करण्यात आल्या. विशेष म्हणजे केवळ १० दिवसांची स्थगिती असताना भाजपा आणि त्यांच्या पदाधिकाऱ्यांना पोटशूळ उठण्याचे कारण काय?, होऊ द्या चौकशी, येऊ द्या सत्य समोर, असे सांगीतले आहे. त्याच्या पुर्ततेसाठी काम सुरु आहे. शहरातील वाहतुक नियंत्रिक करणे, रस्त्यांवरील खड्डे बुजवणे यासह प्रत्येक्ष जागेवर जाऊन उपाययोजना केल्या जात आहेत.

## अग्रलेख...

# अविश्वासाचा निरर्थक प्रयोग

विरोधी पक्षांनी लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांच्याविरुद्ध मांडलेला अविश्वास प्रस्ताव अपेक्षेप्रमाणे फेटाळला गेला. अविश्वास प्रस्ताव फेटाळला जाणार याची विरोधी पक्षांना कल्पना नव्हती, असे नाही. पण हात दाखवून अवलक्षण करून घेण्याची खोड विरोधी पक्षांना जडली असेल तर त्याला कोण काय करणार? ओम बिर्ला यांच्याविरुद्ध मांडण्यात आलेला अविश्वास प्रस्ताव अनावश्यक तसेच खोडसाळपणाचा होता. त्याची काहीही गरज नव्हती. पण विनाशकाले विपरीत बुद्धी या उक्तीप्रमाणे विरोधी पक्षांनी, विशेषत: काँग्रेसच्या सदस्यांनी बिर्ला यांच्याविरुद्ध अविश्वास प्रस्ताव सादर करीत आपले हसे करून घेतले, असे या प्रस्तावावर झालेली भाषणे ऐकून वाटायला लागले.

संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू आणि गृहमंत्री अमित शाह यांच्यासह भाजपाच्या अनेक सदस्यांनी आपल्या घणाघाती भाषणात राहुल गांधी आणि काँग्रेस पक्षाच्या भूमिकेचे वाभाडे काढले. कुठून आपण बिर्ला यांच्याविरुद्ध अविश्वास आणला, असे चेहरे राहुल गांधी आणि अन्य काँग्रेस सदस्यांचे झाले होते. किरेन रिजिजू आणि अमित शाह यांनी काँग्रेसचे पुरते वस्त्रहरण करून टाकले. अविश्वास प्रस्तावावर भाषण करताना विरोधी पक्षांच्या अनेक सदस्यांनी बिर्ला यांचे लोकसभेतील सर्वच सदस्यांशी, विशेषत: विरोधी पक्षांच्या सदस्यांशी व्यक्तिगत जिव्हाळ्याचे संबंध असल्याचा निर्वाळा दिला. एकप्रकारे काँग्रेसच्या सदस्यांनी अविश्वास प्रस्ताव सादर करताना सभापती म्हणून बिर्ला यांच्याविरुद्ध जे आरोप केले, त्यांची हवा परस्पर काढून टाकली गेली.

लोकसभेच्या कामकाजाचे संचालन करणे, ही सभापती म्हणून बिर्ला यांची जबाबदारी आहे. लोकसभेच्या कामकाजाचे संचालन बिर्ला यांना मनमानी पद्धतीने करता येत नाही. संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या कामकाजाचे संचालन करण्याचे नियम आणि परंपरा आहेत. काही पायंडे- संकेत आहेत. त्यानुसारच सभागृहांच्या कामकाजाचे संचालन करावे लागते. सभागृहात गोंधळ घालणाऱ्या सदस्यांना वेळप्रसंगी रागावावे लागते, समज द्यावी लागते. वारंवार सांगूनही सदस्य ऐकत नसतील, घोषणाबाजी करीत असतील, तर नाईलाजाने सभागृहाचे कामकाज स्थगितही करावे लागते. काही वेळा असंसदीय आणि नियमबाह्य वर्तन करणाऱ्या सदस्यांना निलंबितही करावे लागते. निलंबनाचा कालावधी हा त्या सदस्याच्या गोंधळाच्या तीव्रतेवर अवलबूंन असतो. अनेकवेळा विरोधी पक्ष सदस्यांचे सभागृहातील वर्तन पाहून वर्गातील नाठाळ आणि उनाड विद्यार्थ्यांची आठवण येते. वर्गात गोंधळ घालणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांना गुरुजी छडीने मारू शकतात. महाविद्यालयात गोंधळ घालणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षकांना छडीने मारता येत नाही. ओम बिर्ला यांची स्थिती अनेकदा महाविद्यालयातील शिक्षकासारखी असते. नाईलाजाने त्यांना शाब्दिक मार द्यावा लागतो. विरोधी पक्षांतील उनाड आणि नाठाळ सदस्यांवर त्याचा फारसा परिणाम होत नाही. राज्यसभेत निवडून येणारे प्रतिनिधी थेट लोकांमधून निवडून येत नसतात, तर अप्रत्यक्ष पद्धतीने निवडून येत असतात. पण लोकसभेत निवडून येणाऱ्या प्रतिनिधींची स्थिती तशी नसते. दहा ते वीस लाख मतदारांचे प्रतिनिधित्व हे सदस्य करत असतात. लोकशाहीच्या सर्वोच्च मंदिरात आपले प्रश्न आणि समस्या मांडण्यासाठी जनतेने या लोकांना निवडून दिले असते, पण हे सदस्य ते काम करण्याऐवजी पक्षनेतृत्वाला खुश करण्यासाठी सभागृहात गोंधळ घालत असतात. मात्र, असे वागून आपण आपल्या मतदारसंघातील जनतेची फसवणूक करतो, त्यांचा विश्वासघात करतो, याची जाणीव त्यांना राहत नाही.

भाजपा २०१४ पासून सत्तेत आहे, त्याआधी प्रदीर्घ काळ या पक्षाला विरोधी बाकांवर बसावे लागले. भाजपाचे सदस्यही विरोधी पक्षांत असताना सभागृहात गोंधळ घालत होते, घोषणाबाजी करत होते. पण आपल्या कृतीने आपल्या मतदारसंघातील जनतेला मान खाली घालावी लागेल, अशी कृती त्यांनी केली नाही. त्या तुलनेत राहुल गांधी यांनी विरोधी पक्षनेतेपदाचे पार अवमूल्यन करून टाकले आहे. त्यांच्या आधी अनेकांनी विरोधी पक्षनेतेपद भूषवले, ते त्या पदाची प्रतिष्ठा आणि आब राखून. राहुल गांधी यांची सभागृहातील कृती ही अनेकवेळा अनियंत्रित आणि बेजबाबदारपणाची असते. सभागृहात बसले असताना डोळा मारणे, आपली जागा सोडून सत्ता पक्षाच्या बाजूला जाणे, पंतप्रधानांची गळाभेट घेणे असे पोरकट आणि आचरट चाळे राहुल गांधीच करू शकतात. घटनेने आपल्याला अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिले असले तरी त्याचा दुरुपयोग राहुल गांधी यांनी आतापर्यंत जेवढा केला, तेवढा खचीतच दुसऱ्या कोणी केला असेल. त्यांचे सभागृहातील वर्तन आता साऱ्यांना सरावाचे झाले आहे. नको ते बोलून आणि आवाज वाढवून ते स्वत:कडे लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न करतात खरे; पण त्यांच्या वर्तन वैशिष्ट्यांची ओळख असलेले विरोधी पक्षांतील सदस्य आणि राहुल गांधींच्या काँग्रेस पक्षातील सदस्यही त्यांना फारशा गांभीर्याने घेत नाहीत. आम्ही कोणते पाप केले म्हणून असा नेता आमच्या पदरी पडला, असे त्यांना वाटत असावे. त्याचीच पुढची पायरी म्हणजे पदरी पडले पवित्र झाले, अशी स्वत:ची ते समजूत करून घेत असतील.

मला सभागृहात बोलू दिले जात नाही, असे रडगाणे राहुल गांधी अखंड गात असतात. पण आपल्याला बोलू का दिले जात नाही, याचे आत्मपरीक्षण करण्याची मात्र त्यांची तयारी नसते. असे आत्मपरीक्षण केले असते, तर आपल्या प्रश्नाचे उत्तरही त्यांना सहजपणे मिळाले असते. आतापर्यंत अनेक मान्यवरांनी विरोधी पक्षनेतेपद भूषवले, पण त्यांच्यावर कधीच असे रडगाणे गाण्याची वेळ आली नाही. मला सभागृहात बोलण्यासाठी कोणाच्या परवानगीची गरज नाही, असे राहुल गांधी म्हणत असतात. याचा अर्थ असा की, पाचव्यांदा लोकसभेत निवडून आल्यानंतरही राहुल गांधींना संसदीय नियम काय असतात, लोकसभेचे कामकाज कसे चालते, हे समजलेले नाही. लोकसभेत कामकाज संचालनाचे सर्वोच्च अधिकार लोकसभेच्या सभापतींचे असतात. संसदभवन परिसरा राजाही लोकसभेचा सभापतीच असतो. त्यांनी परवानगी दिली नाही तर विरो पक्षनेताच काय, पण सभागृहाचे नेते असलेले पंतप्रधानही बोलू शकत नाही एवढे सामान्य ज्ञान विरोधी पक्ष नेते असलेल्या राहुल गांधींना असायला पाहि त्यामुळेच राहुल गांधींना संसदीय नियम शिकविण्याची आवश्यकता असल्य भाजपा नेते आणि माजी केंद्रीय मंत्री रविशंकर प्रसाद यांनी म्हटले आहे, अतिशय योग्य म्हणावे लागेल. अजूनही वेळ गेली नाही, राहुल गांधी या संसदीय नियमांची बाराखडी शिकून घ्यावी. संसदेचे ग्रंथालय पालथे घालून जु काळचे विरोधी पक्षनेते कसे आणि काय बोलत होते, याचे वाचन करावे. अर्थ त्यासाठी त्यांना सवड मिळायला हवी. कारण अनेकदा ते भारतात क महत्त्वाचे सुरू असताना विदेशात असतात. आपल्या काँग्रेस पक्षातही रा गांधी स्वत:बद्दल फार चांगली भावना निर्माण करू शकलेले नाहीत. त्य काँग्रेसजन ऐकतात, कारण ते गांधी आहेत. ते सोनिया गांधी यांचे पुत्र आहे त्या घराण्याचे नसते तर राहुल गांधी इथवर देखील आले नसते. राहुल गां यांच्यापेक्षा प्रियांका वढेरा या जास्त चांगल्या विरोधी पक्षनेत्या ठरल्या असत असे किरेन रिजिजू यांनी उपरोधाने म्हटले असले तरी ते सत्य बोलून गेले आहे राहुल गांधींना सद्बुद्धी यावी, अशी प्रार्थना काँग्रेसचे सदस्य दिवसरात्र क असतील, आपणही त्यात सहभागी व्हायला हरकत नाही. कारण राहुल गांधी ज्या दिवशी सद्बुद्धी येईल, तो दिवस काँग्रेस पक्षासाठी लाखमोलाचा ठरण आहे. संसदीय लोकशाहीच्या चांगल्या भविष्यासाठी राज्यकर्ते कर्तबगार हवे तसेच विरोधी पक्षनेता हा अतिशय बुद्धिमान व संयमी असला पाहिजे. अविश्व प्रस्तावाच्या निरर्थक प्रयोगातून काँग्रेसने स्वत:चे हसे करून घेतले. रा गांधींचे त्याहून जास्त हसे झाले, हे त्यांना काँग्रेसजनांनी कधी तरी सांगित पाहिजे.

## यंगिस्तान

# मुंबई साखळी बॉम्बस्फोट; जखमा अजूनही ताज्या

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

मुंबईच्या इतिहासातील १२ मार्च १९९३ हा काळा दिवस आहे. या दिवसाच्या जखमा आजही मुंबईकरांच्या आणि संपूर्ण देशाच्या मनात आहेत. आता भीषण घटनेला ३३ वर्षे उलटली आहेत, तरीही त्या साखळी बॉम्बस्फोटांची आठवण आजही अंगावर शहारे आणते. दुपारी १.३० च्या सुमारास मुंबई शेअर बाजाराच्या इमारतीत पहिला स्फोट झाला आणि त्यानंतर पुढच्या दोन तासांत मुंबईच्या विविध भागांत, ज्यात एअर इंडिया इमारत, झवेरी बाजार, प्लाझा सिनेमा, माहिम कॉजवे आणि वरळी येथील सी-रॉक हॉटेल अशा १२ महत्त्वाच्या ठिकाणी बॉम्बस्फोट झालेत. या स्फोटांनी केवळ मुंबईच नव्हे, तर संपूर्ण जगाला हादरवून सोडले. आरडीएक्स या अत्यंत विध्वंसक स्फोटकाचा भारतात पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या प्रमाणावर वापर करण्यात आला होता, ज्यामुळे या हलल्याची भीषणता अधिकच वाढली. या अमानुष हल्ल्यात २५७ निष्पाप नागरिकांचा बळी गेला, ७०० हून अधिक लोक कायमचे अपंग झाले आणि हजारो कुटुंबांचे आयुष्य उद्ध्वस्त झाले. या हल्ल्याने मुंबईच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनावर खोलवर परिणाम केला, ज्यातून सावरण्यासाठी शहराला अनेक वर्षे लागली.

या संपूर्ण कटाचा मुख्य सूत्रधार होता दाऊद इब्राहिम कासकर. एक मराठी मुसलमान... मनसे प्रमुख मराठी मुसलमानांची नेहमीच भलावण करतात. तर त्यांना या खुंखार मराठी मुसलमानाच्या नावाची आठवण करून द्यायला हवी. दाऊदचा जन्म मुंबईत झाला. पण जिथे जन्माला आला, तिथल्याच भूमीसोबत त्याने गद्दारी केली. आपल्याच शहराला आणि देशाला रक्ताच्या थारोळ्यात पाडण्याचे अक्षम्य पाप केले. दाऊद आणि त्याचा साथीदार टायगर मेमन यांनी पाकिस्तानच्या आयएसआय या गुप्तचर संस्थेच्या मदतीने हा कट रचला होता. या कटामागे केवळ सूडाची भावना नव्हती, तर भारताला अस्थिर करण्याची आणि मुंबईच्या आर्थिक राजधानीला लक्ष्य करून देशाची अर्थव्यवस्था खिळखिळी करण्याची व्यापक योजना होती. धक्कादायक बाब म्हणजे, या स्फोटांसाठी लागणारी स्फोटके आणि शस्त्रास्त्रे भारतात आणण्यासाठी आणि ती विविध ठिकाणी पेरण्यासाठी अनेक स्थानिक गुन्हेगारांनी मदत केली होती. हे गुन्हेगार भारतीय नागरिक होते, त्यांनी याच देशाचे अन्न खाल्ले होते, येथील मातीच्या कुशीत ते वाढले होते, पण त्यांची निष्ठा मात्र पाकिस्तानसोबत होती. धर्मांधता आणि जिहादी मनोवृत्तीमुळे आंधळे झालेल्या या नराधमांनी आपल्याच मायभूमीशी गद्दारी केली. अशा देशद्रोही कृत्यांसाठी त्यांना कधीही माफ केले जाऊ शकत नाही आणि त्यांची जागा केवळ इतिहासाच्या काळ्या पानातच नव्हे, तर नरकाच्या खोल गर्तेत असायला हवी.

दहशतवाद हा केवळ गोळ्या आणि बॉम्बपुरता मर्यादित नसतो, तर तो एका विषारी विचारधारेतून जन्म घेतो. जिहादी मनोवृत्ती ही अशीच एक घातक विचारधारा आहे, जी तरुणांच्या मनात आपल्याच देशाविरुद्ध द्वेष पेरते आणि त्यांना हिंसेच्या मार्गावर ढकलते. या मनोवृत्तीमुळे व्यक्ती आपल्या राष्ट्रीय अस्मितेपेक्षा एका हिंसक विचारधारेला श्रेष्ठ मानू लागते. भारताबाहेर राहणारे दहशतवादी आका आणि भारतात राहणारे त्यांचे हस्तक यांच्या समन्वयामुळे देश वारंवार संकटात सापडतो.

या स्लीपर सेल्सच्या माध्यमातून शांततापूर्ण वातावरणात विष कालवण्याचे काम केले जाते, जे देशाच्या अंतर्गत सुरक्षेसाठी अत्यंत धोकादायक आहे. ही जिहादी प्रवृत्ती केवळ सीमेवरच नाही, तर आता शहरांमधील सुशिक्षित वर्गातही व्हाईट कॉलर जिहादच्या स्वरूपात शिरकाव करत आहे. आता दिल्लीत जिहादी डॉक्टरांनी केलेला स्फोट ताजाच आहे. हे लोक कायद्याचा आणि प्रशासकीय यंत्रणेचा वापर करून देशाला आतून पोखरण्याचा प्रयत्न करतात. अशा अदृश्य शत्रूंना ओळखणे आणि त्यांचा नायनाट करणे हे आपल्या सर्वांपुढील मोठे आव्हान आहे.

१९९३ च्या स्फोटांनंतर भारताने अनेकवेळा दहशतवादाचा सामना केला आहे. २००१ मध्ये भारतीय संसदेवर झालेला हल्ला हा थेट भारतीय लोकशाहीच्या मंदिरावर केलेला आघात होता, ज्याने आपल्या लोकशाही मूल्यांना आव्हान दिले. २००६ मध्ये मुंबई लोकल ट्रेनमध्ये झालेल्या साखळी स्फोटांनी पुन्हा एकदा मुंबईला लक्ष्य केले, ज्यात १८९ निष्पाप प्रवाशांचा बळी गेला. २६/११ (२००८) चा मुंबईवरील भीषण हल्ला तर भारताच्या इतिहासातील सर्वांत क्रूर आणि सुनियोजित हल्ल्यांपैकी एक होता, ज्यात १६६ लोकांचा बळी गेला आणि मुंबईची शान असलेल्या ताज हॉटेलसारख्या प्रतिष्ठित इमारतींना लक्ष्य करण्यात आले. या हल्ल्याविषयीची माहिती व दृश्य आदित्य धर दिग्दर्शित धुरंधर या चित्रपटात दाखवण्यात आले होते. ते दृश्य पाहून प्रत्येक हिंदूच्या मुठी आवळल्या गेल्या. या हल्ल्यांमागे पाकिस्तानस्थित दहशतवादी संघटनांचा हात होता आणि त्यांना भारतातील काही फितुरांनी मदत केली होती हे स्पष्ट झाले आहे. याव्यतिरिक्त, जम्मू-काश्मीरमधील उरी (२०१६) आणि पुलवामा (२०१९) येथील हल्ल्यांनी आपल्या शूर जवानांना लक्ष्य केले, ज्यात अनेक जवान हुतात्मा झाले. हे सर्व हल्ले भारताच्या सार्वभौमत्वाला आणि अखंडतेला आव्हान देणारे होते, ज्यातून दहशतवादाचे क्रूर आणि अमानुष स्वरूप पुन्हा पुन्हा समोर आले आहे.

जे लोक धर्माच्या नावाखाली निष्पाप लोकांचे रक्त सांडवतात, त्यांना माणूस म्हणणेही चुकीचे ठरेल. दहशतवाद्यांना मदत करणारे, त्यांना आश्रय देणारे आणि मानवतावादाच्या नावाखाली त्यांचे समर्थन करणारे हे देशाचे खरे शत्रू आहेत. जेव्हा एखादा दहशतवादी मारला जातो, तेव्हा त्याच्यासाठी अश्रू ढाळणारे किंवा त्याच्या अंत्ययात्रेला गर्दी करणारे लोक हे जिहादी मनोवृत्तीचेच पाईक आहेत. अशा लोकांची लायकी केवळ आणि केवळ फासावर जाण्याची आणि गोळ्या लागून तडफडून मरण्याचीच आहे. जे लोक भारताच्या भूमीवर राहून पाकिस्तानचे गुणगान गातात किंवा भारतीय लष्करावर दगडफेक करतात, त्यांनी हे लक्षात ठेवावे की, भारत आता बदलला आहे. आता भारत केवळ निषेध नोंदवत नाही, तर घरात घुसून मारण्याची ताकदही ठेवतो. अशा देशद्रोही शक्तींना वेळीच ठेचणे हे देशाच्या सुरक्षेसाठी अत्यंत आवश्यक आहे.

३३ वर्षांपूर्वी मुंबईने जे सोसले, ते पुन्हा कधीही घडू नये, हाच प्रत्येक भारतीयाचा संकल्प असायला हवा. १९९३ च्या स्फोटातील मृतांना खरी श्रद्धांजली तेव्हाच मिळेल, जेव्हा आपण या देशाला दहशतवादमुक्त आणि गद्दारमुक्त करू. दाऊद इब्राहिमसारखे गुन्हेगार आजही पाकिस्तानच्या आश्रयाला आहेत. भारताची अखंडता, सार्वभौमत्व आणि सुरक्षा याच्याशी तडजोड करणारा कोणताही घटक हा नष्ट होण्यास पात्र आहे. आपण सर्वांनी मिळून अशा जिहादी प्रवृत्तींचा नायनाट करण्याचा विडा उचलायला हवा आणि एक सुरक्षित, समृद्ध भारताची निर्मिती करायला हवी. या लढ्यात आपण सर्व एक आहोत आणि एकजूट होऊनच आपण विजय मिळवू शकतो.

जय हिंद!


writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**अनिल उमाकांत फेकरीकर**

# रक्तगट गोंदवा स्वत:ला वाचवा!

सकाळी घरातून निघालेली व्यक्ती सायंकाळी सुखरूप परत येईल व याची हमी कुणीही देऊ शकत नाही. एवढी वाहतूक व्यवस्था हाताबा गेली आहे. या स्थितीत समजा तुम्ही अपघातग्रस्त झाला अन् तुम्हा रक्ताची गरज भासल्यास करणार काय? त्यावेळी डॉक्टरांना प्रथमत: तुम रक्तगट नेमका कोणता हे तपासून घ्यावा लागेल. यात ४० मिनिटे वाया जाती दरम्यान, रक्तगट कळल्यावर त्यानुसार रक्त मिळविण्यासाठी वेळ वाया जाई तिकडे सुवर्णकाळ संपल्याने तोवर तुम्ही यमाघरी जाल. हीच भीती लक्षात घे शरीरावर रक्तगट गोंदवा अन् स्वत:सह लोकांना वाचवा अशा स्वरूपा अभिनव संकल्पना पुण्यातील भारतीय स्वास्थ्य चिंतनचे राष्ट्रीय संयोजक अशोक काळे यांनी मांडली आहे. त्यांनी याकरिता गेल्या ३० वर्षांपासून ल लढाच सुरू केला आहे. त्यात यश येणे पृथ्वीतलावरील प्रत्येक व्यक्तीसा लाभदायक ठरणार आहे. माणूस कुठलाही असो, त्याचा रक्तगट आयुष्य कायमच असतो. तोच धागा पकडून पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धात सहभा सैनिकांच्या शरीरावर त्यांचा रक्तगट गोंदविण्यात आला होता. युद्ध असल्य शेकडो सैनिक जखमी होणार होते. त्यानंतर जखमींवर उपचार करणे क्रमप्रा होते. तेव्हा जखमींना तातडीने सर्व उपचार मिळावेत म्हणून रक्त गोंदविण्याची योजना फलदायी ठरली. जखमी सैनिकांना यामुळे नवजीवन प्राप्त झाले. मग तीच संकल्पना सामान्य माणसाकरिताही लागू का केली जात नाही, असाच विचार करून डॉ. अशोक काळे या लढाईचे नेतृत्व करीत आहेत. रक्तविषयातील तज्ज्ञ डॉ. अशोक काळे समाजभान जपणारे व्यक्तिमत्त्वाचे धनी आहेत. पुणे मेडिकल कॉलेजमध्ये असताना त्यांनी अनेक अपघातग्रस्तांना तडफडून मरताना पाहिले. तेव्हाच त्यांनी यावर उपाय करण्याचा संकल्प सोडत रक्तगट गोंदवा अन् आयुष्य वाचवा याकरिता स्वत:ला झोकून दिले आहे.



वस्तुत: अपघातग्रस्तांना वाचविण्यासाठी एक तासाचा सुवर्णकाळ मान जातो. तो सुवर्णकाळ रक्तगट तपासणीतच वाया गेल्यास अपघातग्रस्त तडफ यमाघरी जातो. सर्व यंत्रणा तेव्हा हतबलतेने फक्त पाहात असते. सम अपघातग्रस्ताच्या शरीरावर टॅटूऐवजी रक्तगट गोंदविलेला दिसला असता नक्कीच डॉक्टरांनी त्याच गटाचे रक्त त्याला देत नवजीवन मिळवून दिले अस हीच संकल्पना लोकांमध्ये रुजावी, प्रत्येक अपघातग्रस्त बरा व्हावा अशी उद भावना मनात ठेवत डॉ. अशोक काळे यांचा पुढाकार नक्कीच लोकहिताचा अ वर्तमानात युवक आणि युवती नको तिथे टॅटू गोंदवून घेतात. शरीर त्यांचे असल्य ते त्यावर काहीही करू शकतात. यासंदर्भात कुणाचेही दुमत नाही. पण त्य त्याशिवाय स्वत:चा रक्तगट गोंदविला तर नक्कीच त्याचा लाभ सर्वांनाच होई याकरिता संपूर्ण देशभरात एकवाक्यता ठरवायला हवी. त्यानुसार उज कानाच्या मागे रक्तगट गोंदविण्याची पद्धत सर्वत्र लागू व्हायला हवी. उज किंवा डाव्या कानामागे रक्तगट इंग्रजीत गोंदविल्याने तो कुणाच्याही सौंद कुरूपता आणणार नाही. लहानपणी नाही का आपली आई आपल्या कानाम टिका लावून दुर्जनशक्तींपासून वाचविण्यासाठी प्रार्थना करायची. अगदी तस इलाज हा ठरणार आहे. भारतात २०२५ मध्ये ४ लाख ८० हजार अपघात झा याचा अर्थ दररोज १३१५ अपघात घडले. महाराष्ट्रात २०२५ मध्ये ४ हजारपेक्षा जास्त अपघात झाले. त्यात १५५५० लोकांचा हकनाक मृत्यू झा एवढे अपघात पाहता भविष्यात आपलाही अपघात कुठेही होऊ शकतो, सर्वांनीच लक्षात ठेवायला हवे. रस्त्यावर धावणाऱ्या यमांपासून कुणीही वाच नाही, एवढी दाहक परिस्थिती कायमच राहणार आहे. मग आपल्यावर तशी वे आल्यास करणार काय, याचा विचार करून स्वत:ला वाचविण्यासाठी तरी अ रक्तगट गोंदविणे फलदायी ठरू शकते. अपघातमुक्त भारत ही संकल्पना मां सोपे आहे. पण ती संकल्पना खऱ्या अर्थाने पूर्णत्वास जाणे कठीण आहे. का रस्त्यावर वाहन चालविणारा अनेक चुका वारंवार करीत आहे. मोबाईलवर ब नका, असे सांगितल्यावरही चालक त्याचा सर्रास वापर करतात. शिवाय दो चालकांना फाशी होत नसल्याने भविष्यात अपघातांची संख्या वाढतच जाण आहे. ते कटू वास्तव पाहता त्या गोंधळात स्वत:ला वाचवून आपले कुटुंब सुरक्षित ठेवायचे झाल्यास आजच उजव्या कानामागे आपला रक्तगट गोंद घ्या. हातावर, पायावर आणि नको त्या जागेवर भलते सलते चित्र टॅटूच्या रूप गोंदविण्यापेक्षा रक्तगट इंग्रजीत टाकणे नक्कीच फलदायी ठरेल. शेवटी, आप जीव ज्याला प्यारा असेल त्याने यावर अंमल करावा, हीच माफक अपेक्षा.

९८८१७१७८

## मुंबई वार्तापत्र

# डिजिटल फसवणूक आणि तत्काळ कारवाई!

**नागेश दाचेवार**

भारताच्या डिजिटल विकासाच्या प्रक्रियेत गेल्या अनेक वर्षांपासून आपण डिजिटल फसवणुकीकडे हताशपणे पाहत होतो. जितक्या वेगाने आपण डिजिटली पैसे वळवत गेलो तितक्याच वेगाने सायबर गुन्हेगार त्यामागे जात राहिले. यूपीआय, फिनटेक ॲप्स आणि इन्स्टंट पेमेंटद्वारे व्यवहार जसजसे वाढले, तसतसे फसवणुकीचे प्रमाणही वाढले. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील डिजिटल इंडियासाठी व्यापक प्रयत्न सुरू झाले, पोलिसिंगनंतर सायबर सुरक्षिततेला केंद्र सरकारने प्राधान्य दिल्यानंतर आता राज्यांकडून सायबर गुन्ह्यांवर फक्त प्रतिक्रिया येत नाहीत तर तेदेखील ॲक्शन मोडवर आले आहेत. राज्य सरकारने ४३ कोटी रुपयांची तरतूद सायबर गुन्ह्यांवर प्रतिबंध लावण्यासाठींच्या उपाययोजनांवर केली आहे. त्यामुळे आता डिजिटल फसवणूक, सायबर गुन्ह्यांच्याबाबतीत तत्काळ कारवाई हा रामबाण उपाय ठरणार असल्याचे दिसते.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या नेतृत्वाखाली गृह मंत्रालयाने अंतर्गत भारतीय सायबर गुन्हे समन्वय केंद्र सुरू केले. त्यानंतर प्रत्येक डिजिटल गुन्हा एका सिस्टिमद्वारे या समन्वय केंद्राद्वारे हाताळला जाऊ लागला. गृह मंत्रालय वारंवार राज्ये आणि केंद्रीय तपास यंत्रणांमधल्या समन्वयावर भर देत असल्याने, सायबर गुन्ह्यांकडे केवळ आर्थिक त्रास म्हणून नव्हे तर अंतर्गत सुरक्षेचे आव्हान म्हणून पाहिले जात आहे.

याचे परिणाम आकडेवारीत दिसून येतात. २०२५-२६ मध्ये, १४ सी यंत्रणेने एक सूक्ष्म पण लक्षणीय काम केले आहे. त्यामुळे ज्या जगात नुकसान वाढत आहे, अशा जगात सायबर गुन्ह्यांचा वेग कमी झाला आहे. एफबीआयच्या इंटरनेट क्राईम कंप्लेंट सेंटरनुसार, २०२४ मध्ये जागतिक स्तरावर नोंदवलेले सायबर गुन्ह्यांमध्ये १६ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त नुकसान झाले असले तरी, भारताने घरातील फसवणुकीचा वेग रोखण्यात यश मिळवले. २०२४ मध्ये सायबर-फसवणुकीचे नोंदवलेले प्रमाण २२ हजार ८४९ कोटी रुपयांवरून २०२५ मध्ये २२ हजार ५०४ कोटी रुपयांपर्यंत कमी झाले, जे उच्च वाढीच्या डिजिटल अर्थव्यवस्थेत एक माफक घट मानली जाते.

डिजिटल अरेस्टसारखे फसवणुकीचे काही घोटाळे झाले, पण ते मानसिकदृष्ट्या हाताळणीचे होते. पीडितांना असे वाटण्यास भाग पाडले गेले की त्यांची चौकशी सुरू आहे. त्यांना धमकावून वेगळे केले गेले आणि नंतर त्यांची बचत हिरावून घेतली गेली. २०२३-२४ दरम्यान अशा गुन्ह्यांच्या नुकसानात फार वाढ झाली. २०२५ मध्ये, डिजिटल अरेस्टच्या प्रकरणांमध्ये ८६ टक्क्यांनी घट झाली आणि आर्थिक नुकसान तब्बल ६६ टक्क्यांहून अधिक घटले. हे एका रात्रीत घडले नाही. तपास यंत्रणांनी डेटा ॲनालिटिक्सचा वापर करून हॉटस्पॉट्स मॅप केले, मूळ अकाऊंट नेटवर्क नष्ट केले, बेकायदेशीर सीम बॉक्स जप्त केले आणि सीमापार दुवे ट्रॅक केले. समन्वयावर भर देण्यात आला. त्यामुळे गुप्तचर माहितीचे जलदपणे सामायिकीकरण आणि संयुक्त कारवाई शक्य झाली. हे गृह मंत्रालयाच्या धोरणात्मक प्रयत्नांचे प्रतिबिंब आहे. अमित शाह यांनी वारंवार अधोरेखित केले आहे की, सायबर गुन्हे, आता केवळ एक परिघीय आर्थिक गुन्हा राहिला नाही तर राष्ट्रीय सुरक्षेसाठी आणि भारताच्या डिजिटल पायाभूत सुविधांवरील जनतेच्या विश्वासासाठी धोका आहे.

लाखो नवीन इंटरनेट वापरकर्ते जोडणाऱ्या भारतासारख्या देशात, तांत्रिक सुरक्षा उपायांइतकेच वर्तणुकीशी संबंधित सावधगिरीदेखील महत्त्वाची आहे. त्यामुळे सार्वजनिक संदेश हा या धोरणाचा एक महत्त्वाचा भाग बनला आहे. जेव्हा पंतप्रधानांनी नागरिकांना सावध करण्यासाठी मन की बातचा वापर केला आणि थांबा, विचार करा, कृती करा हा डिजिटल व्यवहारांसाठी सुरक्षामंत्र तयार केला, तेव्हा सायबरविषयक जागरूकता पोलिसांच्या एका विशिष्ट सल्ल्यामधून राष्ट्रीय चर्चेत रूपांतरित झाली.

सुरुवातीला राष्ट्रीय सायबर गुन्हे अहवाल पोर्टलवर दाखल केलेल्या तक्रारी अनेकदा एफआयआरमध्ये रूपांतरित होत नव्हत्या. औपचारिक नोंदणी होत नसल्याने तपास थांबायचा. दिल्ली, राजस्थान आणि मध्य प्रदेशसारख्या राज्यांमध्ये ई-झीरो एफआयआर पद्धती लागू केली गेल्याने यामध्ये संरचनात्मक सुधारणा झाली. आर्थिक सायबर तक्रारींचे शून्य एफआयआरमध्ये स्वयंचलित रूपांतर झाल्यामुळे रूपांतरण दर ०.६४ टक्क्यांवरून ९ टक्क्यांपर्यंत वाढला. पोलिसांच्या भाषेत सांगायचे तर, हे डिजिटल गुन्हे मध्येच गायब होण्याऐवजी औपचारिक न्यायव्यवस्थेत प्रवेश करणाऱ्या हजारो अतिरिक्त प्रकरणांमध्ये परावर्तित झाले.

हुशार हॅकर्सद्वारे करण्यात आलेले सायबर गुन्हे तपासाकरिता अल्पकालीन असतात. भाड्याने घेतलेले, तडजोड केलेले किंवा बनावट बँक खात्यात त्यांनी उडवलेले पैसे जमा होतात. नंतर तेथून ते काढले जातात. सप्टेंबर २०२५मध्ये, अशी बनावट ४२ टक्के खाती एका आठवड्यापेक्षा जास्त काळ सक्रिय राहिली. जानेवारी २०२६पर्यंत त्यांची संख्या कमी झाली. फक्त ३ टक्के खाती इतके दिवस टिकून राहिली. अशा खात्यांमधून पैसे पुन्हा मिळवणे जिकरीचे असते. परंतु तत्पर कारवाईमुळे २४ तासांत अशा गुन्ह्यांचा तपास करण्याचे प्रमाण ३९ टक्क्यांवरून ८८ टक्क्यांपर्यंत वाढले. वेळेचे हे गणित साधणे अत्यंत महत्त्वाचे आहे. फसवणूक ही पीडिताची तक्रार आणि गुन्हेगाराने पैसे काढणे यांच्यातली शर्यत आहे. ४३ प्रमुख बँका आणि एनपीसीआय-एपीआयच्या एकत्रीकरणाद्वारे, जवळजवळ ८० टक्के व्यवहार आणि ९५ टक्के वादग्रस्त रक्कम आता रिअल टाईममध्ये परत मिळवली जाते. काही बँका जलद लीन मार्किंगमुळे फसवणुकीच्या रकमेपैकी ३५ टक्क्यांपर्यंत बचत करत असल्याचे समजते. एनसीआरपी-सीएफसीएफआरएमएस प्रणालीमध्ये एम्बेड केलेली फायनान्शियल किल चेन ओळखल्या जाणाऱ्या लाभार्थी खात्यांवर १०० टक्के लीन किंवा होल्ड सक्षम करते. त्यामुळे प्रतिसाद प्रतिबंधात बदलतो. भारताच्या दीर्घकालीन प्रशासनिक आव्हानांपैकी एक म्हणजे केंद्र आणि राज्यांमधील विखंडन. सायबर गुन्हे त्या सीमांचे पालन करत नाहीत. दिल्लीतील सायहॉक, केरळमधील सायहंट आणि गुजरातमधील मूलहंटसारख्या ऑपरेशन्सवरून असे दिसून येते की, समन्वयामुळे हजारो लोकांना सायबर गुन्ह्यांपासून वाचवण्यात आले, शेकडोंना अटक करण्यात आली आणि शेकडो कोटी संघटित नेटवर्कशी जोडले गेले. कंबोडिया, चीन, तैवान, पाकिस्तान आणि नेपाळशी सीमापार संबंध असलेले सिम बॉक्स सिंडिकेट नष्ट करण्यात आले आणि हजारो सिम ब्लॉक करण्यात आले.

### राज्यात 'महासायबर'


डिजिटल फसवणूक, बनावट दूरध्वनी केंद्रे आणि आर्थिक गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात अत्याधुनिक 'महासायबर' व्यवस्था आणि सायबर तपास प्रयोगशाळांचे जाळे अधिक मजबूत करण्यावर भर दिला आहे. सायबर गुन्ह्यांवर तत्काळ कारवाई व्हावी यासाठी 'सुवर्ण क्षण' या संकल्पनेवर आधारित जलद प्रतिसाद, १९३० या मदत क्रमांकाचा प्रभावी वापर, शालेय अभ्यासक्रमातून सायबर सुरक्षिततेबाबत जनजागृती आणि पोलिस दलाचे आधुनिकीकरण यांसारख्या उपाययोजना राबविण्यात येत आहेत. तसेच सायबर गुन्हे रोखण्यासाठी विशेष कक्ष बळकट करून सुमारे एक हजार पोलिस कर्मचाऱ्यांना या कामासाठी सज्ज करण्यात येत आहे.

९२७०३३३८८६

### पर्यावरण आणि पशु-पक्ष्यांचे संरक्षण आवश्यक...

पर्यावरण म्हणजे आपल्या आजूबाजूचे नैसर्गिक वातावरण. हवा, पाणी, जमीन, झाडे-झुडपे, पशु-पक्षी आणि माणूस हे सर्व पर्यावरणाचे महत्त्वाचे घटक आहेत. पर्यावरण आणि पशु-पक्षी यांचा एकमेकांशी खूप जवळचा संबंध आहे. निसर्गाचा समतोल राखण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतात. मानवाच्या जीवनासाठी पर्यावरण अत्यंत महत्त्वाचे आहे. जर पर्यावरण स्वच्छ आणि संतुलित राहिले तरच पृथ्वीवरील जीवन सुरक्षित राहू शकते. त्यामुळे पर्यावरणाचे जतन आणि पशु-पक्ष्यांचे संरक्षण करणे ही आजच्या काळाची मोठी गरज आहे.

प्राचीन काळापासून माणूस, प्राणी आणि पक्षी एकत्र निसर्गात राहात आले आहेत. जंगल, नद्या, पर्वत आणि झाडे ही त्यांची नैसर्गिक घरे आहेत. पशु-पक्षी पर्यावरणातील विविध कामे करतात. काही पक्षी बिया पसरवतात, काही प्राणी जंगलाचे संतुलन राखतात. त्यामुळे निसर्गाची साखळी टिकून राहते. जंगलतोड झाल्यामुळे अनेक पक्ष्यांचे निवासस्थान नष्ट होत आहे. हवा, पाणी आणि जमिनीचे प्रदूषण वाढल्यामुळे त्यांचे जीवन धोक्यात येत आहे. यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत आहे आणि अनेक पक्षी नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत.



आजकाल वाढते प्रदूषण, जंगलतोड आणि मानवी हस्तक्षेप यामुळे अनेक पशु-पक्ष्यांचे जीवन धोक्यात आले आहे. अनेक प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. पशु-पक्षी नष्ट झाले तर पर्यावरणाचा समतोल बिघडेल. म्हणून जंगलांचे संरक्षण, झाडे लावणे आणि प्रदूषण कमी करणे ही आपली जबाबदारी आहे. प्रत्येकाने पर्यावरण आणि प्राण्यांबद्दल दयाळू व जागरूक राहिले पाहिजे. पर्यावरण आणि पशु-पक्षी हे एकमेकांवर अवलंबून आहेत. त्यांचे रक्षण केल्याशिवाय पृथ्वीवरील जीवन सुरक्षित राहू शकत नाही. म्हणूनच आपण सर्वांनी पर्यावरणाचे जतन करणे आणि त्यांचे संरक्षण करणे आवश्यक आहे. निसर्गाचे संतुलन राखण्यासाठी हीच काळाची गरज आहे. जर आपण आज काळजी घेतली तर भविष्यातील पिढ्यांना सुंदर आणि निरोगी पर्यावरण मिळेल. पर्यावरणाचे जतन आणि पशु-पक्ष्यांचे संरक्षण करणे ही आपली सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. आपण आजपासूनच छोटे-छोटे प्रयत्न केले तर पृथ्वी अधिक सुंदर, हिरवीगार आणि जीवनासाठी सुरक्षित राहील.

**श्रीकांत संभाजी मगर**/९६८९११७१६९

## वाचक पत्रे

### माहितीपूर्ण तरुण भारतचे स्वागत

आम्ही सुरुवातीपासून तरुण भारतचे वाचक आहेत कारण हे वृत्तपत्र दैनंदिन सत्य घडामोडी प्रसिद्ध करते. त्यामुळे वाचकांचा विश्वास बसला आहे. राजकारण, देश-विदेशातील घडामोडी, कला, क्रीडा, आरोग्य, मनोरंजन, विज्ञान, सामान्य ज्ञान, धार्मिक, आध्यात्मिक, अर्थविषयक, शेती, हवामान इत्यादी असे सर्व विषय या वृत्तपत्रात आहे. हे वृत्तपत्र आपला देश, धर्म आणि संस्कृती या विचारांनी पुरेपूर आहे. त्यामानाने किंमत कमी आहे. इतर दैनिक वृत्तपत्रे जाहिरातींनी भरलेली असतात. म्हणून वाचकांना तरुण भारत हे दैनिक वृत्तपत्र वाचावयास आवडते. तरुण भारतचे वाचक, विक्रेते, वार्ताहर, संपादक आणि बाकीचे कर्मचारी यांचे मनापासून आभार आणि हार्दिक शुभेच्छा.

**देविदास पाठक**/पुणे

### सिनेसृष्टीची माहितीपूर्ण सफर

गेली काही महिने तरुण भारतच्या आसमंत पुरवणीत 'सिनेसृष्टी' हे सदर प्रकाशित होत आहे. सिनेसृष्टीला समृद्ध करणाऱ्या अगणित व्यक्तित्वांच्या कार्यकर्तृत्वाचा वेध घेणारे हे सदर वाचताना वाचक अभावितपणे अचंबित होतो. रमेश पोफळी यांनी त्यात केलेले सिनेमातील कलाकार, संगीतकार, गायक, दिग्दर्शक आणि गाणी यातील बारकावे, त्याचे विवेचन अतिशय माहितीपूर्ण असते. बरेचदा असे वाटते की, 'अ सिनेमा बघताना किंवा गाणे ऐकताना हे तर आपल्या लक्षात आलं नाही.' या स्तंभासाठी तरुण भारतचे अभिनंदन.

**प्रसाद दत्तात्रेय पोफळी**/९८२२५६९६४८

### ऐतिहासिक स्थळांची माहिती असावी

पुणे ही संत, समाजसुधारक आणि क्रांतिकारकांची भू आहे. ऐतिहासिक स्थळे, परंपरा आणि सांस्कृतिक चळव यावर सखोल लेख असावेत. भारतीय संस्कृतीचा गौरव जा आधुनिकतेशी सुसंगत लेख प्रसिद्ध व्हावे, ही अपेक्षा.

**सम्राट खाडिलकर**/पुणे

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# विरोधकांनी घाणेरडे राजकारण करू नये : शंकर देशमुख

## आंतरराष्ट्रीय परिस्थितीमुळे गॅस पुरवठ्यावर परिणाम

तभा. वृत्तसेवा

**बीड** | आंतरराष्ट्रीय परिस्थितीमुळे गॅस पुरवठ्यावर परिणाम – विरोधकांनी घाणेरडे राजकारण करू नये असे भाजप बीड जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे

अमेरिका-इराणमधील वाढत्या तणावपूर्ण परिस्थितीमुळे आणि जागतिक स्तरावर निर्माण झालेल्या अस्थिरतेमुळे इंधन व एलपीजी गॅस पुरवठ्याच्या साखळीवर परिणाम होत आहे. याचा परिणाम भारतासह अनेक देशांवर होत असून आपल्या देशातही काही ठिकाणी गॅस उपलब्धतेवर तात्पुरता परिणाम जाणवत आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकार या परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे. नागरिकांना गॅसचा पुरवठा सुरळीत राहावा यासाठी आवश्यक ती सर्व उपाययोजना करण्यात येत आहेत. आयात व्यवस्थापन, वितरण व्यवस्था आणि पर्यायी स्रोत याबाबतही केंद्र सरकार सक्रियपणे काम करत आहे. तसेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य सरकारही परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे आणि नागरिकांना कोणतीही अडचण येऊ नये यासाठी प्रशासनाला आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत.



अशा संवेदनशील परिस्थितीत सर्वांनी एकत्र येऊन देशहिताला प्राधान्य देणे आवश्यक आहे. मात्र काही विरोधी पक्ष या विषयावर तथ्यांऐवजी गैरसमज पसरवून आणि लोकांमध्ये भीती निर्माण करून घाणेरडे राजकारण करत आहेत. देश संकटाचा सामना करत असताना अशा प्रकारचे राजकारण अत्यंत गैरजबाबदार आहे. भारतीय जनता पार्टीच्या वतीने आम्ही सर्व नागरिकांना आवाहन करतो की, अफवांवर विश्वास ठेवू नये, संयम राखावा आणि प्रशासनाला सहकार्य करावे. विरोधी पक्षांनीही राजकारण न करता देशहिताचा विचार करावा.

## दहावीच्या केंद्रात विद्यार्थिनीवर हल्ला

**बीड** | बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील डोईठाण येथील परीक्षा केंद्रावर दहावीच्या विद्यार्थिनीला एका तरुणाने थेट वर्गात घुसून मारहाण केल्याची संतापजनक घटना घडली. जेव्हा सर्व विद्यार्थी परीक्षेसाठी आपापल्या जागी बसले होते, तेव्हा देसूर येथील एका तरुणाने अचानक हॉलमध्ये प्रवेश करून बीडसांगवी येथील एका विद्यार्थिनीवर हल्ला केला आणि तिथून पळ काढला. या अनपेक्षित प्रकारामुळे पीडित विद्यार्थिनी प्रचंड भयभीत झाली असून तिने रडत केंद्र संचालकांना सर्व हकीकत सांगितली. विशेष म्हणजे केंद्रावर पोलीस बंदोबस्त तैनात असतानाही हा तरुण थेट हॉलपर्यंत पोहोचलाच कसा, असा संतप्त सवाल पालकांनी उपस्थित केला आहे.

## बीडमध्ये मुबलक गॅस आणि डिझेलचा साठा : जिल्हाधिकारी

तभा वृत्तसेवा

**बीड** | आखाती युद्धाच्या पार्श्वभूमीवर इंधन टंचाई निर्माण होऊ नये, यासाठी बीड जिल्हा प्रशासनाने आवश्यक उपाययोजना सुरू केल्या आहेत. जिल्ह्यात पेट्रोल, डिझेलचा साठा दहा दिवस तसेच घरगुती गॅसचा ३० दिवस पुरेल इतका साठा असून नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे.

याबाबत जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीस जिल्हा पुरवठा अधिकारी शिवकुमार स्वामी, सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी वसुधा रघाटाटे,निरीक्षण अधिकारी प्रशांत सुपेकर, सहा. महसूल अधिकारी प्रकाश तांबडे, कीर्तीमाला कुलकर्णी तसेचतेल कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थतीत बैठकीत पेट्रोल, डिझेल आणि एलपीजी गॅसच्या पुरवठ्याचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

सध्या बीड जिल्ह्यात सुमारे ३० दिवस पुरेल एवढा एलपीजी गॅसचा साठा उपलब्ध असून पेट्रोल व डिझेलचाही १० दिवसांपेक्षा अधिक साठा उपलब्ध असल्याची माहिती प्रशासनाने दिली. तसेच तेल कंपन्यांच्या डेपोमध्येही सुमारे ३० दिवसांचा साठा शिल्लक असल्याने टंचाई निर्माण होण्याची शक्यता नसल्याचे स्पष्ट करण्यात आले. जिल्ह्यात पेट्रोल, डिझेल व घरगुती गॅसचा पुरवठा सुरळीत सुरू असून नागरिकांनी भीतीपोटी इंधनाचा अनावश्यक साठा करू नये तसेच गॅस एजन्सीवर गर्दी करू नयेदरम्यान, काही ठिकाणी गॅस टंचाईचे कारण सांगून ग्राहकांकडून जादा पैसे घेणे, घरगुती गॅसचा व्यावसायिक वापर करणे, ग्राहकांना उशिरा पुरवठा करणे अशा तक्रारी प्राप्त होत असल्याने त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी विशेष पथके गठीत करण्यात आली आहेत. ही पथके वेळोवेळी गॅस एजन्सीची तपासणी करून ग्राहकांशी संपर्क साधणार आहेत.

# मतदारसंघातील महत्त्वाच्या प्रश्नांवर आ.क्षीरसागर आक्रमक

## लक्षवेधी मुद्दा : राजूरी महामार्ग, सार्वजनिक बांधकाम विभागातील अनियमितता मांडली

तभा वृत्तसेवा

**बीड** | राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ खरवंडी ते नवगन राजुरी रस्त्यासंबधी आ.संदीप क्षीरसागर यांनी लक्षवेधी मुद्दा उपस्थित करीत या रस्त्याचे काम मागील अनेक वर्षापासून रखडले आहे. हा रस्ता पूर्ण होणार की, नाही ? रस्त्याचे झालेले काम निकृष्ट दर्जाचे असून याची आयआयटी मार्फत चौकशी करण्याची मागणी केली. तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २ चे प्रभारी कार्यकारी अभियंता कृष्णा पानसंबळ यांची चौकशी करण्याची मागणीही आ.क्षीरसागर यांनी लक्षवेधी सूचनेद्वारे केली.




राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ चे काम पूर्ण करण्याचा कालावधी हा १८ महिन्यांचा होता. मात्र ९ वर्ष झाले तरी हा रस्ता अपूर्ण असून, आजही २५ टक्के काम राहिलेले आहे. तसेच या रस्त्याचे काम करणाऱ्या कंत्राटदाराला ६० टक्क्यांपेक्षा जास्त रकम देण्यात आली आहे. काम रखडण्याचे कारण कोरोना आणि भूसंपादन असल्याचे सांगितले जात आहे. पण कोरोना काळ हा दोन वर्षांचा होता, तर १० टक्के भूसंपादन राहिले आहे. राष्ट्रीय महामार्गाची वर्क ऑर्डर निघण्याआधी पूर्ण होत असते तरीही यात हलगर्जीपणा झाला आहे. १० टके भूसंपादन ९ वर्षात पूर्ण करु न शकणारे अधिकारी, कर्मचारी याला कारणीभूत असल्याच सांगितले आहे. तसच अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी घेतल्या मात्र त्याचा मोबदला ही मिळाला नसल्याचे आ. क्षीरसागर यांनी म्हटले आहे. तसेच त्यांनी या लक्षवेधी सूचनेत सांगताना रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असून यापेक्षा पाणंद रस्ता बरा असे सांगत याची आयआयटी मार्फत चौकशी करण्यात यावी, यासोबतच हे काम कधीपर्यंत पूर्ण होणार आणि कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकण्याची मागणी केली. यावर मंत्र्यांनी उत्तर देताना भूसंपादन मावेजासाठी केंद्राकडे निधीची मागणी करण्यात आली असून, येत्या मे महिन्यात या रस्त्याचे काम पूर्ण तसेच दोषींवर कडक कारवाई करण्यात येईल, असे सांगितले. तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २ चे प्रभारी कार्यकारी अभियंता कृष्णा पानसंबळ यांच्याकडे पदवी नसतानाही कार्यकारी अभियंता पदाचा, अतिरिक्त पदभार देण्यात आला आहे. यामुळे यासंदर्भात सखोल चौकशी करण्याची मागणी आ. संदीप क्षीरसागर यांनी केली. याला उत्तर देताना सार्वजनिक बांधकाम विभागाचे मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी यासंदर्भात सविस्तर चौकशी करण्याचीही घोषणा केली.

### छत्रपती संभाजी महाराज पुतळ्याची उंची वाढवून सुशोभीकरण करण्याची केली मागणी

बीड शहरापासून जाणाऱ्या बायपास रस्त्यावरील महालक्ष्मी चौकात छत्रपती संभाजी महाराज पांचा पुतळा उभारण्यात आला आहे. याठिकाणी काही दिवसांत उड्डाणपूल होणार आहे. त्यामुळे छत्रपती संभाजीनगर येथील क्रांती चौकाच्या धर्तीवर या पुतळ्याची उंची वाढवून सुशोभीकरण करण्याची मागणी आ. संदीप क्षीरसागर यांनी याच लक्षवेधी मांडताना केली. याला ही सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

## कर्णकर्कश सायलेन्सर लावणाऱ्यांना दंड

**आष्टी** | आष्टी शहरात कर्णकर्कश सायलेन्सरअसलेल्या चार बुलेट चालकांना पोलिसांनी कारवाईचा दणका दिला असून त्यांच्याकडून १० हजार रुपयांचा दंड वसूल केला आहे.

आष्टी शहरासह तालुक्यात ठिकठिकाणी कर्णकर्कश सायलेन्सर बुलेट बुलेटला लावले असून त्यामुळे नागरिकांच्या कानठाळ्या बसत असून शहरातील ध्वनी प्रदूषणात वाढ झाली होती. पोलिसांनी अशा ४ चालकांवर कारवाई करत सायलेन्सर जप्त केले असून इतर काही वाहनांवरही दंडात्मक कारवाई करून चालकांकडून एकूण १० हजार रुपयांचा दंड वसूल केला आहे.यापुढे कोणीही बुलेटला अनधिकृत व कर्णकर्कश सायलेन्सर लावू नयेत. अन्यथा यापेक्षाही कडक कारवाई करण्यात येईल, असा इशारा पोलिस निरीक्षक शरद भुतेकर यांनी दिला आहे.

## किट्टी आडगावात भव्य महाराजस्व शिबिर : सरपंच रुक्मानंद खेत्रे

तभा. वृत्तसेवा

**माजलगाव प्रतिनिधी** | महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या वतीने 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर' अंतर्गत किट्टी आडगाव येथे भव्य महाराजस्व शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर दि. १४ मार्च २०२६ रोजी शनिवार सकाळी १० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मंडळ अधिकारी कार्यालय परिसर, किट्टी आडगाव येथे होणार आहे.नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन किट्टी आडगावचे मंडळाधिकारी संतोष हंगे, सरपंच रुक्मानंद खेत्रे यांनी केले आहे.

या शिबिराच्या अध्यक्षस्थानी माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रकाशदादा सोळंके राहणार आहेत. तर प्रमुख अतिथी म्हणून जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रेहमान तसेच उपजिल्हाधिकारी अश्विनी जिरंगे (अंबाजोगाई) उपस्थित राहणार आहेत. यावेळी उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले, तहसीलदार संतोष रुईकर,

गटविकास अधिकारी ज्योत्स्ना मुळीक यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. या शिबिरात नागरिकांच्या विविध महसूल विषयक समस्या, दाखले, नोंदी, जमीनविषयक तक्रारी आदींचे तात्काळ निवारण करण्यासाठी संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित राहणार आहेत. महसूल मंडळ किट्टी आडगाव व ग्रामपंचायत कार्यालय किडी आडगाव यांच्या वतीने या शिबिराचे आयोजन करण्यात आले असून परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शिबिराचा

## पद्मश्री डॉ. लहानेंच्या हस्ते होणार एकता मराठी संमेलनाचे उद्घाटन

**बीड** | एकता फाउंडेशन, म.सा. परिषद व समस्त पाडळीकरांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ८ वे एकता मराठी साहित्य संमेलन पाडळी येथे मार्चच्या शेवटच्या आठवड्यात संपन्न होणार असून या संमेलनाच्या उद्घाटकपदी सुप्रसिद्ध नेत्रतज्ज्ञ पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने यांची एकमताने निवड करण्यात आल्याची घोषणा साहित्य संमेलन समन्वय समितीने केली आहे.

गेल्याच आठवड्यात पाडळीतील गावकऱ्यांसमवेत झालेल्या बैठकीत संमेलनाच्या अध्यक्षपदी माजी आमदार ॲड. उषाताई दराडे यांची सर्वानुमते निवड करण्यात आलेली असून संमेलनाचे पुढील नियोजन करण्यासाठी येत्या रविवारी गावातील सर्वच प्रतिष्ठित नागरिकांसोबत एका महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले

असल्याची माहिती एकता फाउंडेशन आणि मराठवाडा साहित्य परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी प्रसार माध्यमांना दिली. दि.२४ मार्च रोजी संमेलनाची सुरवात संमेलनाध्यक्ष मा. आ. उषाताई दराडे यांच्या उपस्थितीत सकाळी ८ वाजता निघणाऱ्या ग्रंथदिंडीने होत असून यात खालापुरी केंद्रातील लिंबा शाळेमधल्या विद्यार्थीनींसह पाडळीकर ग्रामस्थांचे लेझीम पथक, प्रा. शाळा पाडळी व पाडळी हायस्कूलच्या विद्यार्थ्यांसह परिसरातील शाळांचे महापुरुषांच्या वेशातील अश्वारूढ विद्यार्थी अन् कलशधारी विद्यार्थीनी पथक, विठ्ठल वारकरी संस्थेच्या विद्यार्थ्यांसह गावकऱ्यांचे भजनी मंडळ, साहित्यप्रेमी नागरिक यांचा समावेश असेल. तद्नंतर मान्यवरांच्या उपस्थितीत सकाळी १० वाजता उद्घाटन समारंभ सुरू होईल. याच सत्रात जागतिक किर्तीचे

व्यंगचित्रकार सुहास पालिमकर आणि दिपक महाले यांच्या व्यंगचित्र प्रदर्शनाचे व अनुराधा प्रकाशनाच्या पुस्तक प्रदर्शनाचे उद्घाटन होणार आहे. तत्पूर्वी जीवनगौरव, राज्यस्तरीय उत्कृष्ट साहित्यकृती, आदर्श शिक्षक, समा जसेवक, पत्रकार, कर्तुत्ववान महिला पारितोषिक वितरण सोहळा पार पडेल. भोजनानंतर डॉ. अनिलसिंह तिवारी हे महाराष्ट्राची लोकधारा कार्यक्रम सादर करणार असून नंतर लेखक आपल्या भेटीला, निमंत्रितांचे कविसंमेलन (भाग-१) तर सायंकाळच्या सत्रात तागडगाव केंद्रातील प्राथमिक शाळांच्या सांस्कृतिक कार्यक्रमाने पहिल्या दिवसाची सांगता होईल.

## श्री संस्कार इंग्लिश स्कूल च्यावतीने जागतिक महिला दिन उत्साहत साजरा

### परिसरातील कृतत्वान महीलांचा सन्मान संपन्न

तभा. वृत्तसेवा

**केज / प्रतिनिधी** | केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील ग्रामीण भागात अल्पावधीतच नावारूपाला आलेल्या श्री संस्कार इंग्लिश स्कूल व श्री संस्कार कॉम्प्युटर एज्युकेशन च्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.




याविषयी सविस्तर वृत्त असे कि ग्रामीण भागातील कृतत्वान महिलांचा आदर सत्कार व्हावा या सामाजिक बांधीलकिने श्री संस्कार एज्युकेशन ग्रुप च्या वतीने परिसरातील कृतत्वान महिलांचा सन्मान चिन्ह देऊन विषेश सन्मान करण्यात आला. यामध्ये प्रामुख्याने या कार्यक्रमाच्या अध्यक्षा चिंचोली माळी च्या कर्तव्य दक्ष सरपंच सौ. रोहिणीताई सुनिल देशमुख, प्रमुखपाहुण्या केज पंचायत समितीच्या प्रशासकीय अधिकारी श्रीमती सविता शेप मॅडम, श्रीमती डॉ. शीला कांबळे वैध्यकीय अधिकारी, प्रा. आ. केंद्र चिंचोली, सौ. पुष्पा साबळे मॅडम, शाखा व्यवस्थापक, महाराष्ट्र ग्रामीण बँक चिंचोली माळी, कु. दिपाली राजेंद्र राऊत,यशस्वी युवा उद्योजीका, सौ. शुभांगी गोविंद ढवारे, जिएसटी अधिकारी, नवीन मुंबई, श्रीमती सुप्रिया बनकर, कनिष्ठ सहाय्यक प. स. केज, सौ. सोनाली राजाभाऊ राऊत, ग्रामविकास अधिकारी मैंदवाडी घागरवाडा, सौ. प्रतिभा महारुद्र लिगाडे, सामाजिक कार्यकर्त्या, श्रीमती अनुसया वायबसे, बीड जिल्हाध्यक्ष अंगणवाडी संघटना. तसेच उपस्थित सर्व माता पालकांचा व श्री संस्कार इंग्लिश स्कूल च्या सर्व महिला कर्मचाऱ्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी सर्वप्रथम स्वराज्य जननी राजमाता जिजाऊ, स्त्री शिक्षणाच्या शिल्पकार क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले,

# गैरप्रकारांना आळा घाला ; अंबाजोगाईतील धार्मिक स्थळांचे पावित्र्य अबाधित ठेवा : राणा चव्हाण

तभा. वृत्तसेवा

**अंबाजोगाई** | अंबाजोगाई शहराच्या मंदिर परिसरातील गैरप्रकारांचा बंदोबस्त करून, त्यांना आळा घालून धार्मिक स्थळांचे पावित्र्य राखण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यात याव्यात अशी मागणी अखिल भारतीय मराठा महासंघाचे बीड जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण यांनी व हिंदू धर्मीय भाविक भक्तांकडून अपर जिल्हाधिकारी यांना शुक्रवारी दिलेल्या निवेदनातून केली आहे.

सदरील निवेदनावर बीड जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण, ॲड.दत्तप्रसाद रांदड, रोहित देशमुख, पत्रकार अभय जोशी, पत्रकार राहुल देशपांडे, प्रज्ज्वल देशपांडे, श्रेयस गोस्वामी, सागर दिक्षीत, गजानन देशपांडे, योगेश मुळे, सुदाम देवकर, लक्ष्मीकांत गोस्वामी, पद्माकर सेलमोहकर, उपेंद्र गोस्वामी, राऊ पुराणिक, अक्षय देशपांडे, आशिष जोशी, शशीकुमार देशपांडे, दादाहरी केकाण, दिनेश कुलकर्णी, सचिन साळुंके, कृष्णकुमार देशपांडे, किरण शेलमुकर, ओमकार चव्हाण यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



निवेदन देताना सामाजिक कार्यकर्ते डॉ.अतुलदादा देशपांडे, अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद - शाखा अंबाजोगाईचे अध्यक्ष बालाजी खैरमोडे आदींसह इतरांची उपस्थिती होती.

अंबाजोगाई शहर व परिसरातील हिंदू धर्मीय भाविक भक्तांशी झालेल्या चर्चेतून अखिल भारतीय मराठा महासंघाचे बीड जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण यांनी अपर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांना शुक्रवार, दिनांक १३ मार्च २०२६ रोजी दिलेल्या निवेदनातून एका अत्यंत महत्त्वाच्या विषयाकडे शासन व प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. जिल्हाध्यक्ष चव्हाण व हिंदू धर्मीय भाविक भक्तांच्या उपस्थितीत शुक्रवारी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, अंबाजोगाई शहराला शिक्षणाचे माहेरघर म्हटले जाते तसेच या शहराला धार्मिकतेचा वसा आणि वारसा आहे. या ठिकाणी अनेक ऐतिहासिक, साहित्यिक व आध्यत्मिकदृष्ट्या पारंपारिक जुने अशी अनेक मंदिरं आहेत. या मंदिरांची जोपासणा करणे ही काळाची गरज आहे. यात बरीच मंदिरं आणि परिसराभोवती प्रकाश व्यवस्थेचा अभाव असल्याने सायंकाळ नंतर असामाजिक तत्त्वांकडून गुन्हेगारी स्वरूपाच्या कृत्यांना वाव मिळत आहे. यात आद्यकवी मुकुंदराज स्वामी मंदिर, बुट्टेनाथ मंदिर, नागनाथ मंदिर, दासोपंत समाधी मंदिर परिसर, रेणुकाई मंदिर, सकलेश्वर (बाराखांबी) मंदिर, अमलेश्वर मंदिर, काशी विश्वनाथ मंदीर परिसर, नागझरी परिसर महादेव मंदिर आदी अनेक मंदिरे आहेत. यातील काही भागात सर्रास गैरप्रकार होतात. संत कवी सर्वज्ञ दासोपंत यांच्या समाधी परिसरात काही समाजकंटकांकडून मद्यप्राशन, मांसाहार, अस्वच्छता, तोडफोड व नासधूस यांसारखे गैरप्रकार सातत्याने घडत आहेत. नृसिंह मंदिर तीर्थ अस्वच्छता या बद्दल दासोपंत समाधी बचाव समितीने उपजिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांना ५ फेब्रुवारी २०२६ रोजी निवेदन दिलेले आहे. विविध गैरप्रकारांमुळे हिंदू धर्मीय धार्मिक पवित्र स्थळांची मोठ्या प्रमाणावर हानी होत आहे व असामाजिक तत्त्वांकडून गुन्हेगारी कृत्यांना वाव मिळत आहे. त्यामुळे पुढील उपाययोजना तात्काळ करण्याची गरज आहे, त्या अशा की, १) सदरील ठिकाणी दररोज नियमित पोलीस गस्त वाढवून गैरप्रकारांना आळा घालावा., २) पोलीस कंट्रोल रूमशी संलग्न सी.सी.टी.व्ही.कॅमेरे बसविण्यात यावेत., ३) मंदिरांच्या संपूर्ण परिसराभोवती संरक्षक भिंत उभारून अतिक्रमणास प्रतिबंध करावा.,४) स्वच्छता व देखभाल यासाठी स्थानिक प्रशासनाकडून कायमस्वरूपी व्यवस्था करावी.

# आता पेटवा चुली व तंदूर बट्ट्या : नवनाथ अण्णा शिराळे पाटील

तभा. वृत्तसेवा

**बीड प्रतिनिधी** | सध्या देशांमध्ये सिलेंडरचा तुटवडा भासत आहे असे काही अधिकारी यांनी सांगितले आहे त्या अनुषंगाने जिल्ह्याच्या वतीने बार संघटना माजी अध्यक्ष यांनी खानावळ हॉटेल्स बियर बार परमिट रूम इत्यादी इत्यादी चालक व मालक यांना असे आवाहन केलेले आहे की सध्या आपल्या स्वतंत्र भारत देशामध्ये गॅस सिलेंडरचा तुटवडा भासत आहे तरी ही काही दिवसांनी आपल्याला गॅस आपल्याला आपल्या भारत देशामध्ये व सर्व ठिकाणी मुबलक उपलब्ध होणार आहेत असे आपले भारताचे लोकप्रिय मा पंतप्रधान देव देश आणि धर्म यासाठी सातत्याने देशासाठी कार्य करणारे मा पंतप्रधान मा श्री नरेंद्रजी भाई मोदी साहेब व महाराष्ट्राचे कुशल अभ्यासू मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस उर्फ देवा भाऊ महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब तसेच महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा ताई पवार व महाराष्ट्र राज्याच्या कर्तव्यदक्ष



पशुसंवर्धन व बीड जिल्ह्याच्या तात्कालीन पालकमंत्री नामदार पंकजाताई मुंडे यांनी आपणास माध्यमाच्या माध्यमातून सांगितले आहे की चार दिवस गॅस सिलेंडरची टंचाई देशामध्ये भासेल परंतु येणाऱ्या भविष्य काळामध्ये आपल्याला मुबलक असे गॅस सिलेंडर उपलब्ध होणार आहेत तरी ही गैरसोय होऊ नये या करता म्हणून आपण लाकडाच्या चुली व तंदूर भट्ट्या पेटवाव्यात शासनाला व प्रशासनाला आपण आपल्या ग्राहकांना ग्राहकांना सेवा कशी देता येईल गॅस भट्ट्या पेटून त्याद्वारे स्वयंपाक तयार करून व खाण्याचे सर्व पदार्थ तयार करून चहा इत्यादी पदार्थ तयार करून त्यांना खाण्यापिण्याची व्यवस्था आपल्या हॉटेल द्वारे करून धाब्याद्वारे करून त्यांना जेवण उपलब्ध करून देऊन आपल्याला आपल्या जनतेची होणारी गैरसोय दूर होईल आणि त्यांची सोय होईल याची आपण दक्षता घ्यावी म्हणून शासन प्रशासन यांना आपले सहकार्य मिळेल व याच्यातून आपल्याला देश सेवा जनसेवा घडेल खूप मोठे पुण्य मिळेल आणि खूप चांगल्या प्रकारे देशसेवा जनसेवा घडेल आपण सहकार्य करावे असे आव्हान अध्यक्ष बार संघटना माजी नवनाथ जी अण्णा शिराळे पाटील यांनी दिलेल्या एका प्रसिद्धी पत्रकाच्या माध्यमातून जनतेला आव्हान केले आहे

> अमेरिका आणि इराण यांचे सध्या जे युद्ध चालू आहे ते युद्ध मोदी साहेब मध्यस्थी करून काही दिवसांनी मिटवणार आहेत म्हणून त्यासाठी कोणीही घाबरून जाण्याचे कारण नाही आणि अफवा यावरती कुठलाही देशाच्या नागरिकांनी विश्वास ठेवू नये असे ही आव्हान यावेळी करण्यात आले आहे .

## मराठी व फारसी भाषेचा जवळचा संबंध : डॉ. जाकेर पठाण

तभा वृत्तसेवा

**चौसाळा** | भाषा ही लवचिक असते, ती सतत नाविन्याचा स्वीकार करते. महाराष्ट्रात बराच काळ फारसी ही प्रशासनाची भाषा असल्यामुळे, तिचा मराठी भाषेवर प्रभाव जाणवतो त्यामुळे मराठी व फारशी भाषा यांचा अत्यंत जवळचा संबंध आहे असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. जाकेर पठाण यांनी केले. कला व विज्ञान महाविद्यालय चौसाळा येथील मराठी विभागातर्फे मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. मराठी व फारसी भाषा यांचा संबंध या विषयावर




ते बोलत होते. पुढे बोलताना डॉ. पठाण म्हणाले की, प्रशासनावरील फारसी भाषेचा प्रभाव कमी करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठी राज्यव्यवहार भाषा कोश याची निर्मिती केली होती. अध्यक्षीय भाषण करताना प्राचार्य डॉ. पंडित खाकरे म्हणाले की, नवनवीन शब्दाला स्वीकारूनच खरे तर मराठी भाषा आज पर्यंत जिवंत राहिली आहे. व्यासपीठावर पदव्युत्तर संचालक प्रा. डॉ. सुधाकर वनवे,इतिहास संशोधन केंद्राचे प्रमुख प्रोफेसर डॉ. प्रशांत साबळे यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा. सुधीर माने यांनी केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
https://epaper.dainiktarunbharat.com/



# जिल्हा परिषदेचे नवनिर्वाचित सदस्य महादेव मस्के यांचा सत्कार सोहळा संपन्न





तभा वृत्तसेवा

लातूर दि. १४ मार्च : जिल्हा परिषद मधील महाराणा प्रताप नगर गटातून कॉंग्रेस तर्फे नवनिर्वाचित झालेले सदस्य महादेव प्रभाकर मस्के यांचा सत्कार राज्य बहु जन शिक्षक महासंघा आणि शिक्षक मित्र परिवारातर्फे आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाराष्ट्र राज्य बहुजन शिक्षक महासंघाचे राज्य अध्यक्ष गौतम टाकळीकर तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हाध्यक्ष दिनेश कांबळे .कोषाध्यक्ष शिवाजी पात्रे . निलंगा तालुकाध्यक्ष संतोष माने, कास्ट्राईब संघटनेचे रविकुल ' औसा तालुका शिक्षक सहकारी पतसंस्थेचे संचालक महेश कांबळे . व्यंकटजी दंतराव, माजी नगरसेवक अंगद कांबळे, जयराज कसबे, सतीश जाधव, कातपूर गावचे सरपंच मनोज देशमुख, शाळा व्यवस्थापन समिती जिल्हा परिषद कातपूर अध्यक्ष पांडुरंग मस्के, चाकूर तालुका वनाधिकारी सुरेश मस्के, नाना दंतराव, मातंग शक्ती संघटना जिल्हाध्यक्ष दत्ता पुंड उपस्थित होते.

प्रास्ताविक करताना आनंद पुंड म्हणाले की कोणाला लवकर संधी मिळत नसते . मस्के यांनी मिळलेल्या संधीचे सोने करावे . नात्यांनी ते माझे जावाई असून त्यांच्यावर मला गर्व आहे . महादेव प्रभाकर मस्के हे विक्रमी मताने निवडून आलेले आहेत. त्यामुळे त्यांच्याकडून महासंघा ला मोठ्या अपेक्षा आहेत प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना माजी नगर-सेवक आनंद कांबळे म्हणाले की . ज्या पक्षातर्फे आपण काम करत आहात त्या पक्षाशी एकनिष्ठ राहिल्यामुळे आज आ-पली जि.प . सदस्य प दी वर्णी लागलेली असून आपण फक्त पुंड सरांचे जावाई नाहीत तर पूर्ण औशे करांचे जावाई आ-हात . त्यामुळे आपल्या हातून चांगले कार्य घडो.

अध्यक्षीय समारोप करताना गौतम टाकलीकर म्हणाले की, पुंड सर आमच्या संघाचे सभासद जरी असले तरी ते मला लहान भावासारखे असल्याने मस्के हे माझे ही जावाई झाले आम्ही महासंघाचे असल्यामुळे मस्के हे महासंघाचे जा-वाई झाले त्यामुळे महासंघाचे म्हणजेच सासऱ्यांचे काम जावायांनी करून आमचा मान वाढवावा जावाई - सासऱ्यांमध्ये योग्य समन्वय साधून आम्हाला . आमच्या कामांना योग्य न्याय द्यावा.

सत्काराला उत्तर देताना महादेव मस्के म्हणाले की . हा सत्कार सासरवाडीत होत असल्याने सासऱ्यांचा योग्य तो मान कसा होईल याची काळजी घेतली जाईल . नाहीतर तुमची लेक मला स्वस्थ थोडी बसू देईल . तुमच्या महासंघाचे कसलेही काम असेल तर तडक माझ्याशी संपर्क करा.

या कायेक्रमाचे सूत्रसंचालन संतोष माने यांनी तर उपस्थितांचे आभार पात्रे यांनी मानले या कार्यक्रमासाठी महासंघाचे कार्यकर्तेआनंद पुंड चे मित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.शेवटी भोजना ने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# मानवाच्या कल्याणासाठी संतांचा जन्म : डॉ. अरविंद भातांब्रे



तभा वृत्तसेवा

दैठणा दि.१४ मार्च : : येथील भव्य अखंड हरिनाम बीजोत्सव सप्ताह मोठ्या उत्साहात संपन्न होत असून, महान संत गुरुवर्य ह.भ.प. भागवत आण्णा महाराज अपसंगेकर यांच्या दिव्य सानिध्यात आणि ह.भ.प. जनक आण्णा महाराज अपसंगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा सप्ताह पार पडत आहे.

या प्रसंगी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. अरविंद भातांब्रे व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार पक्ष)चे प्रदेश सचिव महादेव आवाळे यांनी मित्रमंडळासह उपस्थित राहून गुरुवर्यांचे सत्कार करून दर्शन घेतले.

यावेळी बोलताना डॉ. भातांब्रे म्हणाले की, संतांनी मानवजातीवर अनंत उपकार केले आ-हेत. संतांचा जन्म हा मानवाच्या कल्याणासाठीच झालेला आहे. जर संत जन्माला आले नसते तर समाजाची आजची परिस्थिती कशी असती, हे सांगणेही कठीण आहे. संत ज्ञानेश्र्वर, संत तुकाराम, निवृत्तीनाथ, सोपानदेव, संत नामदेव, मुक्ताबाई, जनाबाई यांसारख्या संतांनी आपल्या वाड्मयातून समाजप्रबोधन केले आणि समाजाला योग्य दिशा दिली.

आज लाखो भाविक जात-धर्म विसरून हजारो किलोमीटर पायी चालत भगवान पांडुरंगाचे दर्शन घेतात, हे संतांच्या शिकवणीमुळेच शक्य झाले आहे. आपल्या भागात गुरुवर्य भागवत आण्णा अपसंगेकर महाराज यांसारखे संत लाभले हे आपले भाग्य असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. संतांचे दर्शन मानवाला आनंद, समाधान आणि चांगले कार्य करण्याची प्रेरणा देते, असेही ते म्हणाले.

तसेच जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक व्यंकटराव बिरादार यांच्या निवासस्थानी डॉक्टर अरविंद भातांबरे यांच्याकडून जनक आण्णा अपसंगेकर यांचे दर्शन घेऊन शाल व पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आले.

या सत्कार प्रसंगी शिरूर अनंतपाळ येथील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार पक्ष)चे प्रदेश सचिव महादेव आवाळे, अशोक कोरे, व्यंकट हांद्राळे, आसिफ उजेडे, अखंड हरिनाम सप्ताह समितीचे पदाधिकारी, ज्येष्ठ समाजसेवक सुखदेव पाटील, दैठणा गावचे विद्यमान उप चार सरपंच आशिष गोविंदराव बिरादार, हरिश्र्चंद्र बिरादार, विनोद बिरादार, पत्रकार आर.बी. मुळे, विश्र्वनाथ तोटे, गणेश बिरादार, पत्रकार राजनारायण बिरादार तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तेरणेच्या संरक्षण भिंतीची राष्ट्रवादीच्या प्रवक्त्यांकडून पाहणी



तभा वृत्तसेवा

औसा दि. १४ मार्च : तालुक्यातील उजनी येथील ते-रणा नदीलगत होत असलेल्या एक कोटी ४८ लाख रुपयांच्या संरक्षण भिंतीच्या कामाची पाहणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रवक्ते तथा प्रदेश सरचिटणीस सुरज चव्हाण, जिल्हा कार्याध्यक्ष रवी धुमाळ यांनी पाहणी केली.

बाजार समितीचे माजी सभापती योगीराज पाटील, सरपंच युवराज गायकवाड, जिल्हा उपाध्यक्ष राज पाटील, मजहर पठाण, प्रकाश जबडे, वडजीचे बरकतअली पठाण, चेअरमन दगडू मुळे, चेअरमन साहेब पिंपरे उपस्थित होते.

तेरणेला महापुर आल्यानंतर उजनी गावातील व्यसायिकांची व कुटुंबाची नुकसान होवू नये. यासाठी संरक्षण भिंत उभारण्यात येत आहे. तसेच पात्रातून नदीकाठच्या शेतकय़ांना ये जा करण्यासाठी विशेष सोय व्हावी. यासाठी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडून विशेष तरतूद करुन देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे प्रवक्ते सुरज चव्हाण यांनी सांगितले.तसेच या भिंतीसाठी पैसा कमी देणार नसल्याचे यावेळी स्पष्ट केले.

उजनीतील मुस्लिम अल्पसंख्यांक वस्तीतील सिमेंट रस्ते, नाली व इतर सुविधासाठी निधी उप-लब्ध करुन द्यावा. अशी मागणी राज पाटील यांनी यावेळी केली. तसेच गावअंतर्गत विकासासाठी सिमेंट रस्तेची मागणी करण्यात आली.

अल्पसंख्यांक मंत्री यांची भेट घेऊन तुमच्या मागणीबाबत पाठपुरावा करणार आहे. यासाठी लवकरात लवकर निधी उप-लब्ध व्हावा. यासाठी उपमुख्यमंत्री यांच्याकडे पाठपुरावा करणार असल्याचे प्रदेश सरचिटणीस चव्हाण यांनी सांगितले. व होत असलेल्या कामाबद्दल समाधान व्यक्त केले.

# राष्ट्रीय महामार्गावर गतिरोधक बसवावेत

त.भा. वृत्तसेवा,

जळकोट दि.१४ मार्च : येथील महामार्ग क्रमांक एनएच ५० नांदेड कंधार जांब-जळकोट घोणसी- उदगीर-बिदर जाणाऱ्या महामार्गावर गतिरोधक नसल्यामुळे सातत्याने जीवितहानी होत असून, या महामार्गावरील गावांजवळ गतिरोधक बसवावेत, अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा जळकोट तालुका काँग्रेस पक्षाच्या वतीने शुक्रवारी देण्यात आला आहे.

जळकोट तालुक्यात मागील आठवड्यात अपघात होऊन काहींना जीव गमवावा लागला आहे तर अनेकजण गंभीर जखमी झाले आहेत. त्यामुळे तालुक्यातील जळकोट, पाटोदा, कोळनूर, पाटोदा खुर्द, डोंगरगाव पाटी, तिरुका, खंबाळवाडी, घोण-सी या गावांमध्ये गतिरोधक बसविण्यात यावेत, अशी मागणी तालुकाध्यक्ष मारुती पांडे यांनी केली आहे. याबाबत तहसीलदार राजेश लांडगे, सहाय्यक पोलिस निरीक्षक श्रीराम मोचेवाड यांना निवेदन देण्यात आले आहे.

निवेदनावर तालुकाध्यक्षांसह जि.प.चे माजी सदस्य बाबुराव जाधव, शहराध्यक्ष महेश धुळशेट्टे, युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष धनराज पाटील, सभापती सुनीता कोसंबे, उपसभापती माधव वाघमारे, मेहताब बेग, बालाजी पाटील, गोविंद केंद्रे, नूर पठाण, मंगेश हुंडेकर, भास्कर गौंड, हावगी स्वामी, व्यंकटराव खटके, पुंडलिकराव डवळे, शेषेराव आडे, चंद्रकांत वाघमारे, राजाराम राठोड आदी उपस्थित होते.

# रेणापूर तहसील कार्यालयासमोर काँग्रेसच्या वतीने निदर्शने

त.भा. वृत्तसेवा,

रेणापूर दि.१४ मार्च : केंद्र सरकारने केलेल्या घरगुती गॅस दरवाढीच्या निषेधार्थ तसेच बाजारपेठेत निमर्माण झालेल्या एलपीजी गॅस सिलेंडरच्या तुटवड्याविरोधात रेणापूर तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने तहसील कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली. यावेळी तहसीलदार प्रशांत थोरात यांना निवेदन देण्यात आले.

लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष तथा माजी आ. धिरज विलासराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली हे आंदोलन करण्यात आले. वारंवार होणाऱ्या गॅस दरवाढीमुळे सर्वसामान्य नागरिकांचे जीवनमान अधिक कठीण होत असून वाढत्या महागाईमुळे नागरिक अग-ोदरच त्रस्त झाले आहेत. त्यातच बाजारपेठेत एलपीजी गॅस सिलेंडरचा कृत्रिम तुटवडा निर्माण झाल्याने अनेक नागरिकांना वेळेवर गॅस उपलब्ध होत नसल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या पार्श्र्वभूमीवर केंद्र सरकारने घरगुती एलपीजी गॅस सिलेंडरच्या दरवाढीचा निर्णय तात्काळ मागे घ्यावा, बाजारपेठेत निर्माण झा-लेला तुटवडा दूर करावा आणि नागरिकांना गॅस सिलेंडर नियमित व सहज उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.या वेळी रेणापूर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रमोद कापसे, शहराध्यक्ष पदमसिंह पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती उमाकांत खलंग्रे, उपसभापती ॲड. शेषराव हाके, संचालक प्रकाशसूर्यवंशी, विश्र्वनाथ कागले, हनुमंतराव पवार, नगरसेवक सचिन मोटेगावकर, गजेंद्र चव्हाण, पंचायत समिती सदस्य बालाजी गोटके, तात्याराव वाघमारे, उद्धव जाधव, संतोष शिंदे, दिलीप उरगुंडे, केशव माने, गोविंद पवार, सचिन इगे, विलास राठोड, कैलास चव्हाण, दिग्विजय पाटील, बाळासाहेब करमुडे, बिभीषण कदम, संजय कांदे, महेश गरड, अजय चक्रे, शंकर भुरे, एम. पी. पडोळे, ज्ञानेश्र्वर मडके, गोविंद वीर, चैतन्य देशमुख, आत्माराम शिंदे, सुरज वंगाटे, अवधूत कातळे, प्रवीण सोमवंशी, अमरेश भिसे, रघुनाथ मदने, गणेश पांचाळ, दयानंद करमुडे, दत्तात्रय डिगोळे, गणेश कलाल यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर' मोठ्या उत्साहात संपन्न




त.भा. वृत्तसेवा,

उदगीर दि.१४ मार्च : तालुक्यातील हेर महसुल मंडळ विभागातील मौ करडखेल येथे सर्वसामान्य जनता व शेतकरी यांचे महसूल विभागांतर्गत क्षेत्रीय कार्यालयांशी संबंधित दैनंदिन प्रश्र्न सत्वर निकाली काढण्यासाठी शासनातर्फे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान टप्पा १ आयोजित करण्यात आला होता.

या शिबीराच्या अध्यक्षस्थानी सुशांत शिंदे उपविभागीय अधिकारी उदगीर प्रमुख पाहुने म्हणुन राम बोरगावकर,तहसिलदार उदगीर,जिल्हा परिषद सदस्य रामचंद्र तिरुके,माजी जिल्हा परीषद अध्यक्ष राहुल केंद्रे, माजी जिल्हा परिषद सदस्य शिवाजी केंद्रे,पंचायत समीती सदस्या काशीबाई सोनकांबळे, पंचायत समिती सदस्य भास्कर जाधव, पोलिस निरीक्षक राजकुमार पुजारी, सहायक गट विकास अधिकारी विवेक स्वामी,उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालयाचे किशोर कुमार कोरे, उपविभागीय कृषी अधिकारी श्री श्रेयश यादव,कृषी अधिकारी श्री संदीप वालकुंडे, तहसिल कार्यालयातील नायब तहसिलदार विलास सोनवणे,श्रीमती राजश्री भोसले,पुरवठा निरीक्षक श्रीमती सुमीत्रा इलमले सरपंच पार्वती मुसने मंडळ अधिकारी अनिता ढगे, हेर मंडळ विभागातील सर्व ग्राम महसुल अधिकारी तहसिल कार्यालयातील सर्व महसुल सहायक ग्राम पंचायत अधिकारी करडखेल, भोसले बेलुरे पोलिस पाटील एकनाथ कसबे यांच्या सह सर्व विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी विविध योजनेची माहिती सुशांत शिंदे उपविभागीय अधिकारी, तहसिलदार राम बोरगावकर, जि.प.सदस्य रामचंद्र तिरुके,श्रेयस यादव यांनी दिले. मध्यातुन नागरीकांच्या विविध महसुली अडचणी सोडवण्यासाठी प्रशासनाने थेट गावात येऊन सेवा दिली त्यांमुळे ग्रामस्थांनी मोठ्या प्रमाणावर उपस्थित राहुन विविध समस्यांचे निराकरण करुन घेतले शिबीराची सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमेचे पुजन करुन करण्यात आले.उपस्थीत मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलन करण्यात आले यावेळी महसुल विभागाचे अधिकारी तथा मंडळ अधिकारी तसेच ग्राम पंचायत पदाधिकारी उपस्थित होते. प्रशासनाच्या या उपकृमामुळे नागरीकांना तालुक्याच्या ठिकाणी जाण्याची गरज भासली नाही म्हणुन अनेक कामे गावात मार्गी लागले या समाधान शिबीरात शेतकरी यांना २७३ ७/१२ उता-यांचे वाटप करण्यात आले, ७/१२ दुरुस्ती बाबत ११ अर्जांची स्विकृती करुन त्यांचे निकारण करण्यात आले,शिबीरामध्ये११९फेरफार नोंदी निकाली काढण्यात आले,विविध प्रकारचे प्रमाणपत्रे(उत्पन्न,रहीवाशी,नॅशनॅलीटी,नॉन क्रिमीलेअर,जात प्रमाणपत्र इ)४८३ प्रमाणपत्रांचे वाटपक करण्यात आले.एक खिडकी व्यवस्थे अंतर्गत ३३२ प्रकरणे निकाली काढण्यात आले.जमीण मोजणी संदर्भातील तक्रारी, शेत रस्त्याच्या तक्रारीचे ३२ अर्ज प्राप्त करुन घेण्यात आले व त्याबाबत मंडळ अधिकारी व संबंधीत ग्राम महसुल अधिकारी यांना जायमोक्यावर जाऊन नियमानुसार रस्ते खुले करण्याचे आदे-शीत केले. कृषी विभागामार्फत ४० शेतकरी यांना पी.एम.किसान योजनेबाबत माहिती देण्यात आली व त्यांचे समाधान करण्यात आले, ठिबक सिंचना-चा लाभ मिळण्यासाठी ५शेतकरी यांचे ऑनलाईन अर्ज घेण्यात आले,तुशार सिंचनासाठी १० शेतकरी यांचे ऑनलाईन अर्ज घेण्यात आले,दुय्यम निबंधक कार्यालयामार्फत सलोखा योजना,मुद्रांक शुल्काबाबत, महिलांना घर खरेदीसाठी मुद्रांक शुल्क बाबत सवलत,एक जिल्हा एक नोंदणी या सर्व बाबींची माहिती देण्यात आली. उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालयाअंतर्गत शारहरलहींाळ या एकाच पोर्टलवर सर्व सुविधा उपलब्ध असल्याचे श्री कोरे यांनी सांगीतले व माहिती दिली. अशा प्रकारचे शिबीरे नियमीत पणे आयोजित करण्यात यावीत अशी मागणी नागरीकांनी यावेळी केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हणमंत म्हेत्रे यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित अधिकारी व मान्यवरांचे आभार मानण्यात आले.

प्रशासन व ग्रामस्थांच्या सहकार्यामुळे मौजे करडखेल येथे आयोजित 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर' यशस्वीपणे संपन्न झाले. नागरिकांनी अशा प्रकारची शिबिरे नियमितपणे आयोजित करण्यात यावीत अशी अपेक्षा यावेळी व्यक्त केली.

## संस्थेचा नावलौकिक वाढविण्यासाठी प्रयत्नशील रहावे : प्राचार्य डॉ. यादव

त.भा. वृत्तसेवा,

रेणापूर दि.१४ मार्च : जेएसपीएम शिक्षण संस्थेच्या ३७ युनिटच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना घडविण्याचे कार्य केले जाते. या वाटचालीमध्ये जेएसपीएम संचालित शिव-ाजी कनिष्ठ महाविद्यालय रेणा-पूर या युनिटचे योगदान मोलाचे आहे. या महाविद्यालयाच्या माध्यमातून अध्यात्म, विज्ञान व व्यावसायिकतेवर आधारित तेजस्वी तरुण घडवण्याचे कार्य केले जाते. संस्थेच्या योगदानाबरोबरच विद्यार्थ्यांच्या जडणघडणीमध्ये पालक व शिक्षकांचे योगदान मोला-चे आहे. त्यामुळे जेएसपीएम संस्थेने व महाविद्यालयाने दिलेल्या संस्कारातून विद्यार्थ्यांनी आपला आणि संस्थेचा नावलौकिक वाढविण्याचे कार्य करावे, असे प्रतिपादन शिव-ाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीश यादव यांनी केले.

यावेळी ते जेएसपीएम संचालित शिवाजी कनिष्ठ महाविद्यालयामध्ये आयोजित विद्यार्थी पालक मेळाव्यात बोलत होते. यावेळी या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.नारायणराव देशमुख, उपप्रा-चार्य डॉ.प्रकाश शिंदे, उपप्राचार्य डॉ.गणेश नागरगोजे, उपप्राचार्य डॉ.एम.बी.जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

# गॅस दरवाढ विरोधात कॉंग्रेसचे आंदोलन




त.भा. वृत्तसेवा,

निलंगा दि.१४ मार्च : केंद्र सरकारकडून वारंवार घरगुती एल-पीजी गॅस सिलेंडरच्या किमतीत वाढ करण्यात येत असून यामुळे सर्वसामान्य नागरिकांना जीवन जगणे अत्यंत कठीण झाले आहे. आधीच महागाईच्या वाढत्या ओझ्याखाली सामान्य नागरिक, महिला व कुटुंबचे-कुटुंब त्रस्त असताना गैस दरवाढ ही त्यांच्यावर आणखी एक आर्थिक भार ठरत आहे. गॅस दरवाढ तात्काळ मागे घ्यावी या मागणीसाठी कॉग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांच्या सूचनेनुसार निलंगा तहसील कार्यालयासमोर कॉग्रेसच्या वतीने आंदोलन करुन निवेदन देण्यात आले.

निवेदनात सध्या बाजारपेठेत एलपीजी गॅस सिलेंडरचा कृत्रिम तुटवडा निर्माण झाल्याचे दिसून येत आहे. अनेक ठिकाणी नागरिकांना वेळेवर गॅस सिलेंडर उपलब्ध होत नसल्यामुळे त्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या परिस्थितीमुळे सर्वसामान्य जनतेत तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

त्यामुळे केंद्र सरकारकडे तात्काळ घर-गुती एलपीजी गॅस सिलेंडरच्या दरवाढीचा निर्णय तात्काळ मागे घ्यावा, बाजारपेठेत निर्माण झा-लेला सिलेंडरचा कृत्रिम तुटवडा तातडीने दूर करावा, सर्वसामान्य नागरिकांना सिलेंडर सहज व नियमित उपलब्ध होईल यासाठी योग्य ती उपाययोजना करावी अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

यावेळी तालुकाध्यक्ष विजयकुमार पाटील, जिल्हा उपाध्यक्ष सुधाकर पाटील, शहराध्यक्ष तथा नगरसेवक अजित नाईकवाडे, नगरसेवक डॉ गजेंद्र तरंगे, सिराज देशमुख, जि.प. सदस्य शाहीद पटेल, प्रमोद मरुरे, प.स.सदस्य किरण पाटील, अभिजित उसनाळे, बालाजी गोमसाळे, माधवराव पाटील, विठ्ठल पाटील, अजगर अन्सारी, महेश देशमुख, राजप्पा वारद, तुषार सोमवंशी आदी उपस्थित होते.

# शिरूर अनंतपाळ बसस्थानकातून लांब पल्लयाच्या गाड्या सोडा



त.भा. वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि.१४ मार्च : शिरूर अनंतपाळ येथील नागरिकांकडून आगार प्रमुख यांना निवेदन देऊन मागणी करण्यात आलेली आहे. तालुक्यातून राज्यातील विविध शहरांकडे जाणाऱ्या लांब पल्लयाच्या एसटी बस सेवा सुरू कराव्यात, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे. याबाबत विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ लातूर यांना निवेदन देण्यात आले आहे.विषेश म्हणजे तालुका होण्याच्या अगोदर या शिरूर अनंतपाळ मार्गावर निलंगा आगाराच्या अनेक बसेस धावत होत्या यात निलंगा मुखेड, निलंगा परभणी, निलंगा वसमत, निलंगा भोकर, नांदेड आशा बसेस धावत होत्या परंतु तालुका होवून २६ ते २७वर्षे झाली त्यातली एकच बस चालु आहे ती म्हणजे निलंगा नांदेड.शासनाच्या वतीने तालुका निर्मिती केली परंतु बससेवा बंद केलंय असं येथील नागरिकांतून बोलले जात आहे.या सर्व बसेस चालू करण्यासाठी अनेक वेळा शिवनेरी महाविद्यालयाच्या व श्री अनंतपाळ नुतन विद्यालयाच्या वतीने आगार व्यवस्थापक यांना निवेदन देण्यात आले होते.परंतु कर्मचाऱ्यांची संख्या कमी असल्याने व बसेसची संख्या कमी असल्याने बसेस चालू करण्यासाठी आम्ही काहीही करू शकत नाही असे आगारप्रमुख यांनी सांगितले होते.अशी बातमी सोलापूर तरुण भारत या वृत्तपत्राने छापली होती.

आता सामाजिक कार्यकर्ते धनंजय देवंगरे व, संदिप धुमाळे यांनी लातूर येथील मुख्य कार्यालयास भेट देऊन अधिकाऱ्यांना निवेदन दिले आहेत.

निवेदनात म्हटले आहे की, शिरूर अनंतपाळ तालुक्यातून पुणे, संभाजीनगर , परभणी, ला-तूर, मुंबई, नाशिक आदी ठिकाणी जाण्यासाठी सध्या थेट एसटी बस सेवा उपलब्ध नाही. त्यामुळे नागरिक, विद्यार्थी, नोकरी करणारे तसेच व्यापारी वर्गाला प्रवास करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

विशेषतः शिरूर अनंतपाळ येथून पुणे, संभाजीनगर, परभणी, मुखेड, मुंबई व नाशिक या मार्गावर लांब पल्लयाच्या एसटी बस सेवा सुरू केल्यास तालुक्यातील हजारो प्रवाशांना मोठा दिलासा मिळेल. सध्या प्रवाशांना खाजगी वाहनांचा आधार घ्यावा लागत असून त्यामुळे आर्थिक भार वाढत आहे. तसेच सुरक्षेच्या दृष्टीनेही अनेक अडचणी निर्माण होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या पार्श्र्वभूमीवर संबंधित मार्गांवर लवकरात लवकर एसटी बस सेवा सुरू करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. यावेळी शिरूर अनंतपाळ येथील नागरिकांनी स्वाक्षरी करून निवेदन सादर केले.तालुका होण्याच्या अग-ोदर परभणी,मुखेड, वसमत, नांदेड,भोकर या पुर्वी धावणाऱ्या जुन्या बसेस आहेत या तर चालु झाल्याच पाहिजेत परंतु छ.संभाजी नगर, नाशिक, मुंबई या सुध्दा बसेस या मार्गावर चालु झाल्या पाहिजेत नाही झाल्यास शिरूर अनंतपाळ तालुक्याच्या वतीने तिव्र आंदोलन छेडण्यात येईल अशी चर्चा शिरूर अनंतपाळ तालुक्यातील नागरिकातुन ऐकावयास मिळत आहे.

या निवेदन सादर करताना देवंगरे संदीप धुमाळे हे सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

# रमजान ईद सणाला सुका मेवाच्या दरवाढीचा तडका

तभा वृत्तसेवा

औसा दि. १४ मार्च- मुस्लिम समाज बांधवांचा एक महिना उपवास असलेला वर्षातील सर्वात मोठा सण रमजान ईद आठवडाभरावर आला आहे. या वर्षी आखाती देशातील युध्दामुळे या सणात लागणाऱ्या वस्तूच्या दरात ऐनवेळी वाढ झाली आहे.याचा मोठा फटका बसला आहे. यावर्षी सुका मेवा च्या दरात तब्बल सव्वापटीने वाढ झाली असून यंदा सण कसा साजरा करावा.याची चिंता मुस्लिम बांधवातून दिसून येत आहे.

लहान, मोठ्या व्यवसायाच्या माध्यमातून कुटुंबाची उपजिवीका भागवर्णाय़ा मुस्लिम समाजाचे वर्षात दोन मोठे सण आहेत. एक वर्षाच्या तिर्सय़ा महिन्यात रमजान ईद तर दु-सरा सण पहिल्या सणानंतर दोन महिन्यांनी येतो तो बकरी ईद.रमजान ईद सणात लहानापासून ते वयोवृध्दापर्यंतचे समाजबांधव तब्बल एक महिना उपवास करतात.बारा महिने नमाज पढणारे बांधव या महिन्यात दिवसभरात पाच वेळा नमाज पढतात. तर तरावीची नमाज रात्री ९ ते १० च्या दरम्यान एक तास होते.

या महिन्यात पहाटे ५.१५ ते रात्री ६. ४० या तेरा तासाच्या काळात पाणी न पिता पुर्णपणे कडक उपवास करतात. यानंतर दिवसभराचा उपवास सोडण्याची परंपरा आहे.या महिन्यात सलग १३ तास उपवास करीत पुरुष मंडळी रमजान ईद साजरी करण्यासाठी व्यवसाय करतात.परंतू या वर्षी ईद साजरी करण्यासाठी लागर्णाय़ा सुका मेवाच्या दरात सव्वा पट वाढ झाल्याने सण साजरा करण्यासाठी लागणारे बजेट पार कोलमडले आहे

गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी २५% दरवाढ झाली आहे.

| सुका मेवा | २०२५ | २०२६ |
|---|---|---|
| काजू | ८०० | १००० |
| बदाम | ९०० | १००० |
| पिस्ता | २००० | २५०० |
| सेवया | १०० | ११० |
| आक्रोड | १००० | १२०० |
| चारोडी | २००० | २४०० |
| मनुके | ३०० | ६०० |
| टरबुज बी | ८०० | १००० |
| खरबुज बी | १००० | १२०० |

या प्रमाणात दरवाढ झाली असून खोबर आणि खजूर यामध्ये वाढ झाली नाही.मात्र यंदा युध्दाच्या भडक्यामुळे झालेल्या या दरवाढीत गोरगरीब कुटुंबाचे कंबरडे मोडले आहे.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# वाहतूक पोलीसांच्या वसुलीला खा. आष्टकरांनी लावला 'ब्रेक'

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. १४ मार्च-**

हदगाव - उमरखेड कडे जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावरती वाहतूक पोलीस कर्मचाऱ्यांचे वाढलेल्या मुजोरीस व निजामी वसुलीस कंटाळलेल्या जनतेच्या अनेक तक्रारी प्राप्त होताच हिंगोलीचे खा.नागेश पाटील आष्टीकर यांनी जाय मोक्यावर जाऊन परिस्थितीचा आढावा घेतला असता त्या ठिकाणी चार-पाच वाहनधारकांना विनाकारण अडवून त्रास देण्याचा प्रकार होत असताना खा. आष्टीकर हे संबंधित अधिकाऱ्यांवर चांगले संतापले होते त्या ठिकाणीहुन वरिष्ठांना सक्त सुचना वजा तंबी देत यापुढे असले प्रकार सहन करणार नसल्याचे सांगितले असून समाज माध्यमांवर हे चित्रफित प्रसारित झाल्यामुळे



वाहनधारकांमध्ये मात्र खा.आष्टीकरांच्या या कृतीबद्दल समाधान व्यक्त होत आहे.

हदगाव तालुक्यातील नागरिकांचा विदर्भाशी कामानिमित्त नेहमीच संपर्क येतोफ उमरखेडकडे जाताना तेथील वाहतूक कर्मचारी हदगावहून जाणाऱ्या रस्त्यांवरती थांबून विनाकारण वाहनधारकांना त्रास देण्याचा काम करीत आहेत. याचा फटका मात्र वाहनधारकांना बसत होता. त्याची तक्रार खा.आष्टीकर यांच्याकडे जाताच त्यांनी परिस्थितीचा आढावा घेत एका ठिकाणी सहा - सहा वाहतूक कर्मचारी कसे काय ठेवू शकता ? असा जाब वरिष्ठांना भ्रमणध्वनी वरून विचारला असून एक - दोन दिवस मोहीम असू शकते हे समजू शकतो पण दररोज अशीच होणारी अडचण आता यापुढे खपवून घेतली जाणार नसल्याची तंबी ही त्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिली असून यापुढे वाहतूक पोलीस कर्मचाऱ्यांनी वाहनधारकांशी संयमाने व सौजन्याने वागावे अशी तंबी देखील यावेळेस दिली.

# आदिवासींच्या न्याय्य हक्कासाठी आमदार भीमराव केराम सरसावले; प्रमुख मागण्यांसाठी राज्यपालांकडे धाव

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. १४ मार्च-**

आमदार भीमराव केराम यांनी आता राज्यातील आदिवासींच्या प्रश्नांवर निर्णायक लढा पुकारला आहे. आदिवासी विकास विभागातील धोरणात्मक निर्णय आणि प्रशासकीय दिरंगाईमुळे अडकलेले प्रश्न मार्गी लावण्यासाठी त्यांनी राज्यातील प्रमुख आदिवासी लोकप्रतिनिधींची मोट बांधली असून, त्यांच्याच पुढाकाराने नवनियुक्त राज्यपाल मा. श्री. विष्णू देव वर्मा यांची भेट घेऊन ६ महत्त्वाच्या मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.



या शिष्टमंडळाने सादर केलेल्या निवेदनात प्रामुख्याने २०१३ पासून प्रलंबित असलेली जनजाती सल्लागार परिषदेची बैठक तातडीने बोलावणे, सर्वोच्च न्यायालयाच्या ७ जुलै २०१७ च्या निर्णयानुसार अधिसंख्य पदांमुळे रिक्त झालेल्या १२,५०० मूळ पदांवर नवीन पात्र उमेदवारांची युद्धपातळीवर विशेष भरती करणे, नाशिक येथे घोषित करण्यात आलेल्या आदिवासी विद्यापीठाचे काम तातडीने सुरू करणे, अनुसूचित जमाती जात पडताळणी प्रक्रियेत पारदर्शकता आणून कामकाजाला वेग देणे, बंजारा समाजाच्या अनुसूचित जमातीमधील समावेशाबाबत स्थापन करण्यात आलेल्या समितीच्या स्वरूपावर फेरविचार करणे आणि आदिवासी क्षेत्रातील विकास निधीचे प्रलंबित प्रश्न तातडीने निकाली काढणे या ६ कळीच्या मुद्द्यांचा समावेश आहे. आदिवासींच्या घटनात्मक अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी हे निर्णय घेणे ही काळाची गरज आहे, अशी आग्रही भूमिका यावेळी आमदार केराम व अन्य लोकप्रतिनिधींनी मांडली.

या निवेदनावर विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, माजी मंत्री डॉ. विजयकुमार गावित, धर्मरावबाबा आत्राम, प्रा. अशोक उईके यांच्यासह १५ हून अधिक आमदारांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

**आदिवासींच्या हक्कासाठी शेवटपर्यंत लढणार : आ. केराम**

किनवट-माहूर मतदारसंघासह राज्यातील तमाम आदिवासी बांधवांचे प्रश्न अनेक दिवसांपासून प्रलंबित आहेत. विशेषतः भरती आणि जात पडताळणीतील अडचणींमुळे आमचा तरुण वर्ग हवालदिल झाला आहे. महामहिम राज्यपालांनी या विषयात स्वतः लक्ष घालून तातडीने कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले आहे. आदिवासी समाजाला न्याय मिळेपर्यंत आणि नाशिकमधील विद्यापीठाचे स्वप्न प्रत्यक्षात उतरेपर्यंत आमचा हा पाठपुरावा सुरूच राहील असे आश्वासन आ. केराम यांनी दिले.

# कर भरा अन्यथा दुकान सील! देगलूर नगरपरिषदेची थकबाकीदारांवर धडक मोहीम

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. १४ मार्च-**

शहरातील थकबाकीदारांकडून कर वसुलीसाठी देगलूर नगरपरिषदेने धडक मोहीम सुरू केली असून कर न भरलेल्या व्यापाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येत आहे. दि १२ मार्च २०२५ रोजी नगरपरिषदेकडून मालमत्ता कर व इतर करांच्या थकबाकीदारांविरुद्ध विशेष वसुली मोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेदरम्यान दीर्घकाळापासून कर न भरलेल्या व्यापाऱ्यांना अनेकदा नोटीस देऊनही प्रतिसाद न मिळाल्यामुळे नगरपरिषदेच्या पथकाने शहरातील विविध भागात पाहणी करून कारवाई केली. अंतिम सूचना देऊनही कर न भरल्यामुळे एकूण ६ दुकाने सील करण्यात आली. तसेच काही व्यापाऱ्यांनी तत्काळ थकबाकीची रक्कम भरून कारवाई टाळली. नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी श्रीमती नीलम कांबळे यांनी सर्व व्यापारी व नागरिकांना आवाहन करताना सांगितले की, देगलूर शहरातील मालमत्ता धारकांना थकीत कर भरण्यास प्रोत्साहन देण्यासाठी अभय योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत थकबाकीवरील शास्ती (दंड) मध्ये ५० टक्के माफी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ही योजना ३१ मार्च २०२६ पर्यंत लागू असून सर्व करदात्यांनी लवकरात लवकर थकीत कर भरून या योजनेचा लाभ घ्यावा, असे त्यांनी सांगितले.



सदर मोहिमेत स्वाती वाकोडे, विजया यलगुलवार, नारायण इंगोले, रमाकांत बाच्छे, गौस सय्यद, विजय इटकापले, अक्षय पल्लेवाड, गौरवकुमार जाधव, रत्नदीप सूर्यवंशी, गणेश भोकरे, अभंग गायकवाड, सुमित देबडवार, अजय कडलवार, संकेत कंतेवार, शंकर रोयलावार, विशाल धनवे, तुकाराम पाडदे, रवी सोनकांबळे, लक्ष्मण कंधारे, चमेले, कागणे, नागनाथ चीनमलवाड आदी कर्मचारी सहभागी होते. ही कर वसुली मोहीम पुढील काही दिवसही सुरू राहणार असून, कर न भरल्यास संबंधितांवर नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे नगरपरिषद प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# वझरगा-तुपशेळगांव रस्त्याला काटेरी झुडूपांचा विळखा

**तभा वृतसेवा**
**आदमपूर, दि. १४ मार्च-**

देगलूर तालुक्यातील वझरगा ते तुपशेळगाव या मार्गावर सध्या काटेरी झाडे आणि झुडुपांनी साम्राज्य पसरवले असून, हा रस्ता वाहनधारकांसाठी मृत्यूचा सापळा बनत चालला आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी वाढलेल्या या झाडीमुळे समोरील वाहन दिसतच नाही. ज्यामुळे भीषण अपघाताची शक्यता वेळोवेळी निर्माण होत आहे.



तुपशेळगाव हद्दीत अनेक ठिकाणी अगोदरच जीवघेणी वळणे आहेत. त्यात काटेरी झुडपे इतकी वाढली आहेत की, समोरून येणाऱ्या भरधाव वाहनाचा अंदाजच येत नाही. नजर हटी दुर्घटना घटी या म्हणीप्रमाणे दुचाकी स्वारांना आणि पादचाऱ्यांना अनेकदा या झुडुपांचा गंभीर अपघातासह मार सहन करावा लागत आहे. तसेच, विरुद्ध दिशेने वाहन आल्यास बाजूला होण्यासाठी जागाच उरली नसल्याने वाहन कडेला उभे करणेही कठीण झाले आहे. या मार्गावरून शाळेत जाणारे विद्यार्थी आणि दररोज प्रवास करणाऱ्या नागरिकांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहे.झुडुपांमुळे रस्ता अरुंद झाला असून, रात्रीच्या वेळी तर प्रवास करणे म्हणजे आपले जीव मुठीत घेऊन चालण्यासारखे झाले आहे.प्रशासनाने या गंभीर समस्येकडे त्वरित लक्ष देऊन रस्त्यावरील काटेरी झुडपे तात्काळ तोडावीत. कोणतीही जीवितहानी होण्यापूर्वी

हा मार्ग मोकळा करण्यात यावा, अशी आग्रही मागणी तुपशेळगांवमधील नागरिक व विद्यार्थ्यांनी केली आहे. शिवाय जोपर्यंत अपघात किंवा घटना घडत नाही तोपर्यंत प्रशासनाचे डोळे उघडत नाहीत अशीच आज पर्यंत भूमिका राहिली आहे, म्हणूनच की काय इथे सुद्धा अपघातातून एखाद्याचे जीव गेल्याशिवाय प्रशासन

काम करणार नाही की काय? असा सवाल नागरिकांतून उपस्थित होत आहे.आता चेंडू सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरबारात असून, सार्वजनिक बांधकाम

विभाग चेंडू कशा पद्धतीने टोलवेल याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. प्रशासन मोठ्या अपघाताची वाट न पाहत काटेरी झाडी व झुडपांची व्यवस्था तात्काळ करण्यात यावी.अशा मागणीने परिसरात जोर धरला आहे.

## शिवराज होटाळकरांना 'महाराष्ट्र भूषण सन्मान'

**नायगाव-** जिल्ह्यातील ग्रामीण भागातील शिक्षण व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे शिवराज पाटील पवार होटाळकर यांना प्रतिष्ठेचा 'महाराष्ट्र भूषण सन्मान २०२५' जाहीर झाला आहे. 'व्हॉईस ऑफ मीडिया', 'व्ही. ओ.एम. इंटरनॅशनल फोरम' आणि महाराष्ट्र शासनाच्या 'आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र समिती' यांच्या संयुक्त विद्यमाने हा राज्यस्तरीय सन्मान प्रदान करण्यात येणार आहे. येत्या १५ मार्च रोजी मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे आयोजित राज्यस्तरीय कार्यक्रमात राज्याचे कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री मंगलप्रसाद लोढा यांच्या हस्ते शिवराज पवार होटाळकर यांचा गौरव करण्यात येणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षपद आयुष्यमान भारत मिशनचे अध्यक्ष ओमप्रकाश शेटे भूषवणार असून 'व्हॉईस ऑफ मीडिया'चे संस्थापक अध्यक्ष संदीप काळे सह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या सन्मानाबद्दल प्रतिक्रिया देताना शिवराज पाटील पवार होटाळकर म्हणाले,हा सन्मान माझा एकट्याचा नसून ग्रामीण भागातील अनेक होतकरु विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि सहकाऱ्यांचा आहे. ग्रामीण भागातील मुलांना शिक्षणाची संधी मिळावी, यासाठी पुढेही अधिक जोमाने काम करण्याची प्रेरणा या सन्मानामुळे मिळाली आहे.



## भाजपच्या पंचायत राज व ग्रामविकास प्रकोष्ठ अध्यक्षपदी मनोहर पाटील शिंदे

**नवीन नांदेड-** भारतीय जनता पार्टी नांदेड महानगरच्या वतीने माजी जि.प. सदस्य मनोहर पाटील शिंदे यांची पंचायत राज व ग्रामविकास (प्रकोष्ठ) अध्यक्ष पदावर माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण त्यांनी एका नियुक्ती पत्राद्वारे नियुक्ती करण्यात आली आहे. याबाबतचे नियुक्तीपत्र महानगर जिल्हाध्यक्ष आ. अमरनाथ राजूरकर यांनी दिले. भारतीय जनता पार्टी नांदेड महानगरच्या वतीने दिनांक १४ मार्च २०२६ रोजी देण्यात आलेल्या या नियुक्तीपत्रात नमूद करण्यात आले आहे की, मनोहर शिंदे यांनी पक्षाच्या कार्यात सक्रिय सहभाग घेतल्याने त्यांची या पदावर निवड करण्यात आली आहे. या नियुक्तीबद्दल माजी जि.प.सदस्य मनोहर शिंदे यांचे विविध स्तरांतून अभिनंदन होत असून त्यांनी पक्षाने दिलेल्या जबाबदारीचे प्रामाणिकपणे पालन करण्याचा संकल्प व्यक्त केला आहे. सदरील नियुक्ती बद्दल पक्षातील कार्यकर्ते व मित्रमंडळी यांनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.



## न्याहाळी येथे पोचम्मा देवी मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे आयोजन

**मुदखेड-** मुदखेड शहरातील न्याहाळी येथे नूतन बांधण्यात आलेल्या पोचम्मा देवी मंदिर व मूर्ती प्राणप्रतिष्ठा (स्थापना) सोहळा व त्यानिमित्त भव्य महाप्रसाद कार्यक्रमाचे आयोजन दि. १५ आणि १६ मार्च रोजी करण्यात आले आहे. या धार्मिक उत्सवासाठी ग्रामस्थांनी जय्यत तयारी केली असून परिसरात उत्साहाचे वातावरण आहे. कार्यक्रमाची सुरुवात दि. १५ मार्च रोजी सायंकाळी ५:०० वाजता देवीच्या 'आळंका' कार्यक्रमाने होईल. त्यानंतर रात्री ८:०० वाजेपासून पहाटे ५:०० वाजेपर्यंत देविदास आनंदा सूर्यतळ पोतराज यांचा देवीचा विशेष कार्यक्रम सादर केला जाणार आहे. तसेच सोमवार, दि. १६ मार्च रोजी सकाळी ८:०० ते ११:०० या वेळेत श्री मारोती महाराज कालेजी देवी (मुदखेड) यांच्या उपस्थितीत 'होम हवन' विधी संपन्न होईल. सकाळी ११:०० वाजता देवीची आरती झाल्यानंतर लगेचच महाप्रसादाला सुरुवात केली जाईल.या सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणून सोमवार, दि. १६ मार्च रोजी रात्री ८:०० ते ११:०० या वेळेत सुप्रसिद्ध भागवताचार्य ह.भ.प. सुनील महाराज आष्टीकर यांचे कीर्तन होणार आहे. तसेच या कार्यक्रमात व्यंकटी गोमस्कर (हलगी वादक) यांची साथ लाभणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन दगडू कोंडिबा आऊलवार,संजय दगडू आऊलवार,विजय दगडू आऊलवार,मारोती कोंडिबा आऊलवार, माधव मारोती आऊलवार, विजय दगडू आऊलवार, शिवाजी मारोती आऊलवार व समस्त न्याहाळी ग्रामस्थ मंडळानी केले आहे.

# डोंगरगाव येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. १४ मार्च-**

मुदखेड तालुक्यातील मौजे डोंगरगाव येथे दरवर्षीप्रमाणे यावर्षी अखंड हरिनाम सप्ताह, ज्ञानेश्वरी पारायण सोहळा तसेच भागवत कथा व गाथा भजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.या धार्मिक सोहळ्यात गावात पहिल्यांदा दि. २० मार्च रोजी श्री विठ्ठल-रुक्मिणी (माऊली) मूर्तीची प्राणप्रतिष्ठा ह.भ.प.दशरथ महाराज अंभोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार असून या कार्यक्रमास प्रारंभ होणार आहे.



या अखंड हरिनाम सप्ताहात दररोज काकडा भजन,ज्ञानेश्वरी पारायण,गाथा भजन,भागवत कथा,हरिपाठ, हरिकीर्तन तसेच हरिजागर असे विविध धार्मिक कार्यक्रम होणार असून सप्ताहाची सांगता दि.२७ मार्च रोजी होणार आहे. सप्ताहाच्या शेवटच्या दिवशी सकाळी ज्ञानेश्वरी पारायण व भागवत कथा पूजन होईल.तसेच सायंकाळी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमात युवा कीर्तनकार ह.भ.प.मनीषाताई पांढरे कोंडगावकर,ह.भ.प.बालाजीमहाराजभाटेगावकर, ह.भ.प.पल्लवीताई लढे मेंढलेकर,ह.भ.प. माधव महाराज बोरगडीकर ह.भ.प. पंजाबराव महाराज चालगणीकर, शिवचरित्रकार ह.भ.प.भाग्यश्रीताई मोहिते पाटील धानोरकर,ह.भ.प.कल्याणजी महाराज वारे मुरुंबेकर, ह.भ.प.दशरथ महाराज अंभोरे आदी कीर्तनकार व प्रवचनकार सहभागी होणार आहेत.

# सफाई कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी सेवेत घ्या ; नगरसेवक साहेबराव गायकवाड यांचे निवेदन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १४ मार्च-**

नांदेड-वाघाळा महानगरपालिका हद्दीत अनेक वर्षांपासून कंत्राटी व तात्पुरत्या स्वरूपात काम करणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी सेवेत समाविष्ट करावे तसेच समान वेतन समान काम या तत्वानुसार वेतन देण्यात यावे, या मागणीसाठी नगरसेवक साहेबराव सुमनबाई लक्ष्मणराव गायकवाड यांनी महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे मा. अध्यक्ष यांच्या नांदेड दौऱ्यादरम्यान निवेदन सादर केले.



यावेळी दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले की, शहरातील स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, नालेसफाई व सार्वजनिक आरोग्य व्यवस्था सुरळीत ठेवण्यात सफाई कर्मचाऱ्यांचा मोठा वाटा असूनही अनेक कर्मचारी वर्षानुवर्षे कंत्राटी पद्धतीने काम करत आहेत. कायम सेवा नसल्यामुळे त्यांना सेवा सुरक्षा, वेतन स्थैर्य, निवृत्तीवेतन, वैद्यकीय सुविधा तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळत नाही. तसेच कायम कर्मचाऱ्यांप्रमाणेच काम करूनही कंत्राटी कर्मचाऱ्यांना कमी वेतन दिले जात असल्यामुळे समान वेतन समान काम या तत्वाची अंमलबजावणी करणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.

नांदेड-वाघाळा महानगरपालिका हद्दीतील सर्व कंत्राटी / तात्पुरते सफाई कर्मचारी यांचा सविस्तर अहवाल मागवावा, अनेक वर्षांपासून सातत्याने सेवा देत असलेल्या पात्र सफाई कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी सेवेत समाविष्ट करावे, समान वेतन समान काम या तत्वानुसार वेतन देण्याबाबत शासन स्तरावर आदेश द्यावेत, सफाई कर्मचाऱ्यांच्या सेवा सुरक्षिततेसाठी राज्य सफाई कर्मचारी आयोगामार्फत विशेष पाठपुरावा करावा, शहरातील स्वच्छता व्यवस्था सक्षम ठेवण्यासाठी कायमस्वरूपी पदनिर्मिती करावी, आदी मागण्या नगरसेवक साहेबराव गायकवाड यांनी आयोगाच्या अध्यक्षांकडे केल्या. यावेळी महापौर व उपमहापौर यांची प्रमुख उपस्थिती होती तसेच स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. सदर निवेदन स्वीकारून आयोगाच्या अध्यक्षांनी संबंधित बाबीची दखल घेऊन योग्य त्या स्तरावर पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले.

## लेफ्टनंट रमनज्योत सिंग सद्दर यांचा शाळेकडून सत्कार

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १४ मार्च-**

आंध्र समिती तेलुगू हायस्कूल, नांदेड येथील माजी विद्यार्थी रमनज्योत सिंग सद्दर यांची भारतीय सैन्यात लेफ्टनंट पदावर नियुक्ती झाल्याबद्दल शाळेच्या वतीने त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर जागतिक महिला दिनानिमित्त शाळेत विशेष कार्यक्रमाचे आयोजन करून महिला शिक्षिका व महिला कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमादरम्यान माध्यमिक व प्राथमिक विभागातील महिला शिक्षिका तसेच महिला कर्मचाऱ्यांचा पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. या उपक्रमामुळे शाळेतील वातावरण उत्साहपूर्ण झाले होते.

यावेळी बोलताना संस्थेचे अध्यक्ष जि. नागय्या यांनी महिला सक्षमीकरणाचे महत्त्व अधोरेखित केले. एक महिला आदर्श कुटुंब घडवू शकते; मात्र सर्व महिला एकत्र आल्यास त्या संपूर्ण जग बदलण्याची ताकद ठेवतात, असे प्रेरणादायी विचार त्यांनी व्यक्त केले. त्यांच्या भाषणामुळे उपस्थितांना महिला सशक्तीकरणाचा संदेश मिळाला.

या कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष जि . नागय्या, सहसचिव आय. जयराज, खजिनदार नागभूषणम सामलेटी, संचालक पुलय्या, मुख्याध्यापक पद्माकर जोधंळे, पर्यवेक्षक बैस संदीप यांच्यासह शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# देविदास सूर्यवंशी यांच्या वतीने नरसी येथे इफ्तार पार्टी

**तभा वृतसेवा**
**नरसी, दि. १४ मार्च-**

पवित्र रमजान महिन्यानिमित्त नायगाव तालुक्यातील नरसी येथे अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद, नायगाव तालुका यांच्या वतीने मुस्लिम बांधवांसाठी इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. परिषदचे तालुका अध्यक्ष तथा पत्रकार देविदास सूर्यवंशी यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमामुळे सामाजिक ऐक्य व बंधुभावाचा सुंदर संदेश परिसरात पसरला.



रमजान महिन्यात मुस्लिम समाजातील बांधव दिवसभर कडक उपवास (रोजा) पाळतात आणि सूर्यास्तानंतर इफ्तारद्वारे तो सोडतात. या पार्श्वभूमीवर नरसी येथील नुरानी मस्जिद समोर शुक्रवारी दि. १३ मार्च रोजी सायंकाळी आयोजित करण्यात आलेल्या इफ्तार कार्यक्रमात मोठ्या उत्साहात मुस्लिम बांधवांनी सहभाग घेतला.

कार्यक्रमाच्या वेळी देविदास सूर्यवंशी यांनी उपस्थित मुस्लिम बांधवांचे प्रेमपूर्वक स्वागत केले. धर्म, जात किंवा पंथ न पाहता समाजात परस्पर स्नेह, जिव्हाळा आणि आपुलकी वाढविणे हीच खरी मानवतेची सेवा असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. समाजात सलोखा, ऐक्य आणि परस्पर आदर वाढावा, हा या उपक्रमामागचा मुख्य हेतू असून अशा सामाजिक आणि मानवतावादी कार्यात आम्ही पुढेही कायम सहभागी राहू, असेही त्यांनी स्पष्ट केले.

या प्रसंगी नुरानी मस्जिदचे सदर हाजी उस्मानसाब, हाजी रज्जाक बागवान, शेख नवाबसाब, नरसीचे पोलीस पाटील इब्राहिम बेग पटेल, शेख चाँदसाब, माजी उपसरपंच नजीर बागवान, ग्रा. पं. सदस्य नजीर मामु, शेख सलीम औराळकर, माजी सरपंच व्यंकटराव कोकणे, महात्मा गांधी गाव तंटामुक्त समितीचे अध्यक्ष गंगाधर वडगावे, ग्रामपंचायत सदस्य प्रभाकर गायकवाड, शेख मोहीयोदीन, जळबा सूर्यवंशी, दिनेश सूर्यवंशी, राजु सुर्यवंशी, मैनु कुरेशी, शेख मोसीन सांगीकर, शेख माजीद, इम्रान सय्यद, रफिक पटेल, शेख साजीद,अहेमद लगास, चंद्रकांत सुर्यवंशी, बबलू सुर्यवंशी, अंतेश्वर सुर्यवंशी सह स्थानिक पत्रकार तसेच नरसी मुस्लिम समाजातील बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

इफ्तार पार्टीच्या माध्यमातून विविध धर्मातील नागरिक एकत्र येत सौहार्द व बंधुभावाचे दर्शन घडल्याने उपस्थितांनी या उपक्रमाचे कौतुक केले. अशा उपक्रमांमुळे समाजात एकात्मता अधिक दृढ होत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# हिमायतनगर शिक्षण विभागात 'मलिदा गँग' चा धुमाकूळ ; मनसेचा गंभीर आरोप

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १४ मार्च-**

नांदेड जिल्हा परिषद अंतर्गत हिमायतनगर तालुक्यातील शिक्षण विभागात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार सुरू असल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष मोंन्टी सिंह जहागीरदार यांनी केला आहे. या संदर्भात जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी (उएज) यांना निवेदन देण्यात आले असून शिक्षण विस्तार अधिकारी केशव मेकले यांच्या कार्यपद्धतीची उच्चस्तरीय चौकशी करून त्यांना तात्काळ बडतर्फ करण्याची मागणी करण्यात आली आहे.

मनसेने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, हिमायतनगर शिक्षण विभागात केशव मैकाले यांनी काही शिक्षकांना हाताशी धरून वसुलीची टोळी तयार केली आहे. गणेश कोकुलवार, अरुण पाटील आणि पंडित तळेगाव कर यांच्यासह काही जणांकडून शिक्षक व कर्मचाऱ्यांकडून विविध कामांसाठी पैशांची मागणी केली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे.



निवेदनात पुढे नमूद करण्यात आले आहे की, काही शिक्षकांना अनेक वर्षांपासून एकाच ठिकाणी विविध पदांचा पदभार देण्यात आला असून नियमांचे उघडपणे उल्लंघन होत आहे. तसेच निवृत्तीच्या उंबरठ्यावर असलेल्या शिक्षकांच्या पेन्शन फाईल्स अडकवून त्यांच्यावर दबाव टाकण्याचे प्रकारही सुरू असल्याचे मनसेने म्हटले आहे.

या प्रकरणाची तात्काळ सखोल चौकशी करून केशव मेकले व संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी मनसेने केली आहे. अन्यथा येत्या आठ दिवसांत कारवाई न झाल्यास महाराष्ट्र नवनिर्माण सेना आक्रमक आंदोलन छेडेल, असा इशारा जिल्हाध्यक्ष मोंटी सिंह जहागीरदार यांनी दिला आहे.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# धनगरवाडी येथील विहीर घोटाळा प्रकरणी पथकांची नियुक्ती

## पथके मागील पाच वर्षातील विहीरींची स्थळ तपासणी करणार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ मार्च**

सेनगाव तालुक्यातील धनगरवाडी येथील विहीर घोटाळा प्रकरणी जिल्हा परिषदेने पाच पथकांची नियुक्ती केली असून मागील पाच वर्षात झालेल्या विहीरींच्या कामाची स्थळ पाहणी करण्यात येणार आहे. या पथकांनी प्रत्यक्ष ठिकाणांवर जाऊन विहीरींच्या परिस्थितीचा अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. शुक्रवारी शेतकऱ्यांनी एका विहीरीत उतरून आत्मक्लेश आंदोलन केले होते.

सेनगाव तालुक्यातील धनगरवाडी येथील रामचंद्र खडसे यांनी विहीर चोरीला गेल्याची तक्रार दिल्यानंतर जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी या प्रकरणाच्या चौकशीचे आदेश दिले होते. त्यानुसार नायब तहसीलदार नकुल वाघुंडे यांच्या पथकाने केलेल्या पाहणीत जागेवर विहीरच नसल्याचे स्पष्ट झाले. याशिवाय आणखी सात विहीरींपैकी चार विहीरी गायब असल्याचेही आढळून आले आहे.

या प्रकरणात दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर गुन्हे दाखल करून प्रकरणाचा तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे देण्याच्या मागणीसाठी शेतकऱ्यांनी शुक्रवारी विहीरीत उतरूण विहीर आत्मक्लेश आंदोलन सुरू केले आहे. या प्रकरणाची जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी गंभीर दखल घेतली असून तातडीने गाव भेट देऊन अहवाल सादर करण्याबाबत सूचना दिल्या होत्या. त्यानुसार उपमुख्य कार्यकारी अधिकारी केशव गड्डापोड, गटविकास अधिकारी सुरेश कांबळे, हमी योजनेचे गटविकास अधिकारी प्रदीप बोंढारे, उदय उपवर यांचय पथकाने दोन दिवसांपूर्वीच धरगरवाडी येथे भेट देऊन पाहणी केली. या पाहणीच्यावेळी शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने तक्रारी केल्या.

या तक्रारीनंतर आता एकट्या धनगरवाडी गावात मागील पाच वर्षात देण्यात आलेल्या विहीरींच्या चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यानुसार उपमुख्य कार्यकारी अधिकारी केशव गड्डापोड, गटविकास अधिकारी बोंढारे यांनी तातडीने पालक तांत्रिक अधिकारी व संगणक ऑपरेटर व ग्रामरोजगार सेवक यांची पाच पथके स्थापन केली आहेत. या पथकांना धनगरवाडीत मागील पाच वर्षात झालेल्या सर्व विहीरींच्या ठिकाणी भेट देऊन पाहणी करावी. त्याठिकाणी विहीरी आहेत का, कामे झालेली आहेत काय त्याचे मुल्यांकन झाले आहे काय याची सविस्तर माहीती सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. पुढील आठ दिवसात याबाबतचा सविस्तर अहवाल प्राप्त झाल्यानंतरच पुढील कारवाईचा निर्णय होणार आहे.

धनगरवाडी येथील विहीरींच्या अनुदान अपहार प्रकरणात गोरेगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. या गुन्ह्याचा तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आला असून याबाबतचे आदेश पोलिस अधीक्षक डॉ निलाभ रोहन यांनी काढले आहेत. त्यानुसार आता गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक मोहन भोसले, उपनिरीक्षक दिलीप मोरे यांचे पथक या प्रकरणाचा तपास करणार आहे.

# शिरड शहापूर येथे छत्रपती शिवाजी महाराजस्व अभियान संपन्न




**तभा वृत्तसेवा**
**औंढा नागनाथ, १४ मार्च**

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान दि १४ मार्च २०२६ रोजी शिरड शहापूर मंडळातील सर्व शेतकरी, महिला, विद्यार्थी आणि सर्वसामान्य जनतेचे दैनंदिन जीवन सुखकर करण्यासाठी महसूल प्रशासनातर्फे महा अभियान घेण्यात आले.

या शिबीरात प्रलंबित फेरफार मंजुरी, सातबारा उतारा मधील दुरुस्ती, डिजिटल स्वाक्षरीचे सातबारा आणि आठ उताऱ्याचे वाटप,उत्पन्न रहिवासी व जातीचे प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र, विद्यार्थ्यांसाठी सर्व प्रकारचे दाखले, पत्रके तयार करून गाव नोंदणी, ॲग्री स्टॅग व पी एम किसान नोंदणी मुख्यमंत्री बळीराजा शेत पानंद रस्ते योजना, अकृषिक परवानगी व सनद रद्द करण्याबाबतचे मार्गदर्शन, जमीन तुकड्यांच्या नियमितीकरणाची माहिती तसेच जन्म मृत्यू निर्गमित झालेल्या आदेश वितरित केले, विविध योजनांचे लाभ मंजूर करणे, मोजणी अर्ज, जलद मोजणीसाठी खाजगी सर्वेअरची मदत, कृत्रिम वाळू धोरणाबाबत माहिती घरांसाठी पट्टे वाटप इत्यादी बाबत महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागाचा माहिती देण्यात आली व सूचित करून अर्ज स्वीकार करण्यात आले. यावेळी उपविभागीय अधिकारी विकास माने, तहसीलदार हरिश गाडे, नायब तहसीलदार प्रवीण ऋषी, श्रीमती कोलगणे, शिवमूर्ती मुरटकर, पुरवठा अधिकारी हेमा खाडे, कल्याणी हटवार, महसूल अधिकारी इम्रान पठाण, दराडे, महसूल सहाय्यक शेख हमीद, अब्दुल सलीम शेख, मंडल अधिकारी सुरेश बोबडे, रंगनाथ मेहत्रे, तलाठी स्वामी, गोपाल मुकीर, अश्विनी भागडे, अश्वजीत गुडदे, एस एस वाघिले, ग्राम विकास अधिकारी कैलास देशमुख, अनिल कांबळे, सय्यद नाजेमा, विनोद साळवे, मधुकर काचगुंडे, सोनू लांडगे, आनंद ढेंबरे, शेख, गजानन अंतेवार, जबी पठाण, विशाल सागर, नसीर,कार्यालयातील संबंधित सर्व कर्मचारी उपस्थित होते यामध्ये विशेष म्हणजे तहसीलदार औंढा यांनी जन्म मृत्यू प्रकरणांमध्ये जिल्ह्यामध्ये सर्वात जलद गतीने प्रमाणपत्रावर अर्जावर कार्यवाही करून जेवढे होईल तेवढे लवकर जन्माचे प्रमाणपत्र आदेश निर्गमित केले आहे. या शिबीरात विविध प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. शिबीराला परिसरातील नागरिकांनी मोठा प्रतिसाद दिला आहे.

# औंढा नागनाथ येथे भारतीय जनता पक्षाचे पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ मार्च**

पंडित दीनदयाळ उपाध्याय महा अभियान औंढा नागनाथ येथील सद्गुरु मंगल कार्यालयात दोन दिवशीय दि १२ आणि १३ मार्च रोजी मोठ्या उत्साहात पार पडले. या प्रशिक्षण महाअभियानाच्या अध्यक्षस्थानी भाजपाचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार गजाननराव घुगे होते. त्यांनी महाअभियान प्रशिक्षणाबाबत सविस्तर माहिती देऊन मार्गदर्शन केले. भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष फुलाजी शिंदे, किसान मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष सुरजितसिंह ठाकूर, माजी शिक्षण सभापती पांडुरंग पाटील, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष दिनकर कोकरे यांनी प्रशिक्षण संदर्भात सविस्तर माहिती दिली. या वैचारिक प्रशिक्षण महा अभियानात इतिहास आणि विकास, वैचारिक अधिष्ठान, कार्यपद्धती, आपल्या सरकारची कामगिरी व अंमलबजावणी, बुथ व्यवस्थापन, सोशल मीडिया यांसारख्या विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले आहे. हे प्रशिक्षण महाअभियान भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांना पक्षबांधणीसाठी महत्त्वाचे ठरणार आहे. पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महा अभियान या माध्यमातून भाजपा पदाधिकारी कार्यकर्ते यांना भाजपाचे कार्य प्रवास ध्येय पक्षाची वाटचाल पक्ष उभारणी योगदान तसेच पक्षाने आतापर्यंत केलेली कामे इत्यादी बाबीचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांना या अभियानाद्वारे प्रशिक्षण देण्यात येत आहे.

या महाअभियान प्रशिक्षणास भाजपाचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार गजाननराव घुगे, माजी जिल्हाध्यक्ष फुलाजी शिंदे, किसान मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष सुरजसिंह ठाकूर, माजी शिक्षण सभापती पांडुरंग पाटील, जिल्हा उपाध्यक्ष दिनकर कोकरे, युवा ओबीसी जिल्हाध्यक्ष शशिकांत वडकुते, युवा जिल्हाध्यक्ष शिवाजी मुटकुळे, अनुसूचित जमाती जिल्हाध्यक्ष श्रीरंग हनवते, जिल्हा सरचिटणीस उमेश नागरे, जिल्हा उपाध्यक्ष सखाराम इंगळे, जिल्हा उपाध्यक्ष मिलिंद यंबल, माजी उपसभापती नारायण सोळंके,महिला जिल्हा उपाध्यक्ष दिपाली पाटील, शिक्षक सेल जिल्हाध्यक्ष प्रा गजानन कुटे,आयटी सेल जिल्हाध्यक्ष विलास काळे, युवा जिल्हा उपाध्यक्ष गोपीराज पडोळे, तालुकाध्यक्ष सर्जेराव दिंडे, शहराध्यक्ष बबन सोनूने, नगरसेवक गणेश पाटील, संजय लोंढे, शंकर गोरे, नवनाथ देशमुख, मंगेश गुरव, महेश जोशी, प्रकाश पोले, दिगंबर गिरी, ॲड गणेश ठाकूर, अनिल भांडे, राज लाटे, हनुमंतराव पोले, ॲड एस एस कदम, अश्विनी पाटील,रुक्मिनाबाई जळते, सिद्धबाराव करे, सुधाकर सावळे, माधव वानखेडे, सतीश यादव, गुलाबराव लोंढे, किसन शिंदे, उमराव सावळे, सुभाष सावळे, विनोद पोले नामदेव गिरी, देवराव पोले, पंकज जाधव, शंकर काळे, गणेश देशमुख, कचरू शेळके यांच्यासह या प्रशिक्षण महाअभियानास तालुकाप्रमुख बुथ प्रमुख, शक्ती केंद्रप्रमुख, सर्कल प्रमुख व भाजपा पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन गणेश पाटील तर तालुकाध्यक्ष सर्जेराव दिंडे यांनी सर्वांचे आभार मानले.


## संक्षिप्त वृत्त

### जीवन कौशल्य शिकणे गरजेचे- गायकवाड




हिंगोली-पी. एम. श्री. जि. प. प्रा. शा. पांगरी येथे व्यक्तिमत्व विकासाचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या व्याख्यानात विद्यार्थ्यांनी शालेय पाठ्यक्रमाबरोबर जीवन विषयककौशल्य आत्मसात करावी. जीवनातील कठीण प्रसंगाला न घाबरता यशस्वी जीवन जगण्यासाठी सामाजिक विकास, भावनिक विकास, आपल्यातील सुप्त गुणांचा विकास करावा असे निळकंठ गायकवाड यांनी याप्रसंगी प्रतिपादन केले. अभ्यास कसा करावा स्मरणशक्ती कशी विकसित करावी,भावनांवर नियंत्रण कसे ठेवावे, आपल्या सद्गुणांचा विकास कसा करावा याविषयी विशेष मार्गदर्शन त्यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक शिवाजी झाडे यांनी प्रास्ताविक केले. याप्रसंगी शाळेतील शिक्षक मारोतराव जगताप, संगीता खिल्लारे, वंदना कांबळे, शेवाळे, अमोल गिरी, विद्यार्थी व पालक मंडळी उपस्थित होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वंदना कांबळे यांनी केले तसेच कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन मारोतराव जगताप यांनी मानले.

### आर्ट ऑफ लिवींगतर्फे सत्संगाचे आयोजन



हिंगोली- आर्ट ऑफ लिविंग परिवाराकडून नेहरूनगर मध्ये सत्संगाचे आयोजन करण्यात आले. शिक्षक प्रज्ञेश भैया यांनी गुरुजींची सुदर्शन क्रिया याबद्दल अतिशय मोलाची माहिती दिली तसेच लवकरच हिंगोली मध्ये २४ मार्च ते २९ मार्च सह्याद्री हॉस्पिटल येथे सहा ते नऊ या वेळेमध्ये हॅप्पीनेस प्रोग्राम होणार आहे. यावेळी अनिता सावके, सुजाता पाटील, संगीता जाधव, ज्योती पतंगे, करुणा देशमुख, रेणुका पुरोहित, वंदना सावके, रूपाली केंद्रेकर, शितल सावके, पडोळे, पजई, सरनाईक, प्रणव, स्नेहलताई, रेणुका, मनीषा, वैष्णवी, शहाणे, शशिकांत, लीनाताई जाधव इत्यादी उपस्थित होते.

### १०० वाहन चालकांवर पोलिसांची कारवाई

हिंगोली- अवैध वाहतुक करणारे तसेच वाहतुकीचे उल्लंघन करणाऱ्या १०० वाहन चालकांवर पोलिसांनी विविध ठिकाणी कारवाई करीत त्यांच्याकडून १ लाख ३ हजार २०० रूपयांचा दंड वसूल केला आहे. दारूबंदी कायद्यांतर्गत जिल्ह्यात ५ ठिकाणी छापे मारून मुद्देमाल जप्त करीत आरोपींविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# जबरी चोरीचा १२ तासांत उलगडा, स्थानिक गुन्हे शाखेची धडाकेबाज कामगिरी, ३०० किलो स्टील केले जप्त



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, १४ मार्च**

शहरातील रेल्वे स्टेशन परिसरात सुरू असलेल्या बांधकाम साईटवर झालेल्या जबरी चोरीच्या घटनेचा अवघ्या १२ तासांत उलगडा करत स्थानिक गुन्हे शाखेने धडाकेबाज कारवाई केली आहे. या कारवाईत चोरीस गेलेले सुमारे ३०० किलो स्टील जप्त करण्यात आले असून एका आरोपीला अटक करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, वसमत रेल्वे स्टेशन परिसरात सध्या रेल्वे स्टेशनचे बांधकाम व दुरुस्तीचे काम सुरू असून त्या ठिकाणी लाखो रुपयांचे बांधकाम साहित्य ठेवण्यात आले आहे. साहित्याच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे तसेच २४ तास सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्यात आली आहे. दि. ११ मार्च रोजी रात्री सुरक्षा रक्षक कांबळे हे कर्तव्यावर असताना दोन अज्ञात चोरट्यांनी साईटवर प्रवेश करून त्यांच्या वर दगडफेक केली व जबरदस्तीने अंदाजे ३०० किलो स्टील चोरी करून नेले. या प्रकरणी वसमत शहर पोलीस ठाण्यात गु.र.नं. १४९/२०२६ अन्वये संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

या घटनेची गंभीर दखल घेत हिंगोलीचे पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांनी स्थानिक गुन्हे शाखेला तातडीने तपास करून आरोपींना अटक करण्याचे आदेश दिले. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक मोहन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि शिवसांब घेवारे यांच्या पथकाने तपासाची चक्रे वेगाने फिरवली. सीसीटीव्ही फुटेज व गोपनीय माहितीच्या आधारे आरोपींची ओळख पटवण्यात पोलिसांना यश आले. आरोपी अजय सतपाल चावरीया (वय ३५, रा. तथागत नगर, रेल्वे स्टेशनजवळ), दिलीपसिंग जोगनसिंग चव्हाण (रा. समीर नगर,) अशी त्यांची नावे आहेत. पोलिसांनी अजय सतपाल चावरीया याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. त्याच्याकडून चोरीस गेलेले सुमारे ३०० किलो स्टील, अंदाजे किंमत १६,२०० रुपये, असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन, अप्पर पोलीस अधीक्षक कमलेश मीना, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक मोहन भोसले व वसमत शहर पोलीस ठाण्याचे पोनि सुधीर वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि शिवसांब घेवारे, पोलीस अंमलदार भुजंग कोकरे, गजानन पाकळे, ज्ञानेश्वर गोरे, आकाश टापरे, नरेंद्र साळवे, साईनाथ कंठे तसेच वसमत शहर पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पथकाने पार पाडली.अवघ्या १२ तासांत जबरी चोरीचा गुन्हा उघडकीस आणून संपूर्ण मुद्देमाल हस्तगत केल्याने पोलीस अधीक्षकांनी पथकाचे विशेष कौतुक केले आहे.

# गॅस एजन्सी मालकांची बैठक

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ मार्च**

गॅस सिलेंडर तुटवड्याबाबत तसेच नागरिकांच्या तक्रारींची दखल घेत जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दि १४ मार्च रोजी जिल्ह्यातील सर्व गॅस एजन्सी चालक व मालकांची तातडीची बैठक जिल्हाधिकारी कक्षात बोलावली होती. यावेळी सहायक जिल्हाधिकारी योगेशकुमार मीना, निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यु बोधवड, जिल्हा पुरवठा धिकारी तसेच गॅस एजन्सीचे चालक, मालक यांची उपस्थिती होती. नियमानुसार गॅस ग्राहकांना सिलेंडर पुरवठा करावा तसेच काळ्या बाजारात विक्री केल्यास कठोर कारवाई करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.

# क्रिडा स्पर्धेतून कर्मचाऱ्यांच्या सूप्त गुणांना वाव मिळतो- गायकवाड




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ मार्च**

महसूल विभाग हा शासनाचा अत्यंत महत्त्वाचा विभाग असून कर्मचाऱ्यांवर कामाचा सतत ताण असतो. मैदानी खेळ केवळ शरीराला तंदुरुस्त ठेवत नाहीत, तर ते मनाला उभारी देतात. या स्पर्धांमुळे कर्मचाऱ्यांमध्ये आपुलकी आणि सांघिक भावना निर्माण होईल, ज्याचा फायदा पुढे जनतेची कामे अधिक कार्यक्षमतेने करताना होईल असे मत मुख्य कार्यकारी अधिकारी विवक गायकवाड यांनी व्यक्त केले.

येथील संत नामदेव पोलिस कवायत मैदानावर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांच्या हस्ते महसूल क्रीडा उद्घाटन करण्यात आले. यावेळी पोलिस अधीक्षक डॉ निलाभ रोहन, अप्पर जिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना, सहाय्यक जिल्हाधिकारी योगेश कुमार मीना, निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यु बोधवड, उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, उपविभागीय अधिकारी प्रतिक्षा भुते, उपविभागीय अधिकारी विकास माने, क्रिडा अधिकारी मारावार, हिंगोली तहसीलदार श्रीकांत भुजबळ, कळमनुरीचे तहसीलदार जीवकुमार कांबळे, औंढ्याचे तहसीलदार हरिश गाडे, तलाटि अनिल काळे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

१३ मार्च ते १५ मार्च २०२६ हा तिन दिवसीय जिल्हास्तरीय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत.

# नगर परिषदेत जागतिक महिला दिनानिमित्त आरोग्य शिबीर, धनादेश वाटप




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ मार्च**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून हिंगोली नगर परिषदेचा स्वच्छता विभाग आणि दीनदयाळ अंत्योदय योजना -राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी विशेष मार्गदर्शन व आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन नगराध्यक्षा सौ. रेखाताई श्रीराम दादा बांगर आणि मुख्याधिकारी अरविंद मुंढे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी शहरातील महिलांची मोठी उपस्थिती लाभली होती. यावेळी उपस्थित महिलांची तज्ज्ञ डॉक्टरांकडून आरोग्य तपासणी करण्यात आली आणि आवश्यक आरोग्यविषयक सल्ला देण्यात आला.

महिलांना स्वयंसहायता बचत गट, शासकीय योजना आणि स्वच्छतेचे महत्त्व यावर सविस्तर राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानांतर्गत पात्र ठरलेल्या बचत गटांना आणि वैयक्तिक लाभार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते धनादेशाचे वाटप करण्यात आले. यामुळे महिलांच्या हाताला काम मिळण्यास आणि त्यांच्या आर्थिक प्रगतीला मोठी मदत होणार आहे.

यावेळी बोलतांना नगराध्यक्षा रेखा बांगर म्हणाल्या की, महिलांनी केवळ घरातील कामापुरते मर्यादित न राहता प्रशासकीय आणि आर्थिक क्षेत्रातही पुढे यावे. नगर परिषद महिलांच्या आरोग्यासाठी आणि रोजगारासाठी नेहमीच पाठीशी उभी आहे.